नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ७३ * * अकोला * सोमवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंप

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :
गुरुवारी दिल्लीत भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपाचे केंद्र हरियाणातील झज्जर येथे होते. येथे तीव्रता रिश्टर स्केलवर ४.४ होती. त्यामुळे दिल्ली आणि एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. कोणत्याही नुकसानीचे वृत्त नाही. हरियाणातील जिंद आणि बहादुरगड व्यतिरिक्त, पश्चिम उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधील भागातही १० सेकंद भूकंपाचे धक्के जाणवले. गेल्या सहा महिन्यांत दिल्ली आणि एनसीआरमध्ये हा तिसरा भूकंप आहे. यापूर्वी १९ एप्रिल आणि १७ फेब्रुवारी रोजीही भूकंप झाले होते. तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. त्याचा फटका जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवला.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## जारे जारे, पावसा !

यंदा हवामान खात्याने चांगला पाऊस पडेल असे अनुमान व्यक्त केले होते. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे पाऊस चांगलाच पडला म्हणजे हवामान खात्याचा अंदाज चूक नाही पण जो पाऊस पडला तो विषम पडला. काही ठिकाणी पावसाने तांडव केले तर काही ठिकाणी तो तांडवापेक्षा कमी पण नुकसान होईल अशा पद्धतीने पडला. त्यामुळे राज्याच्या बऱ्याचशा भागांमध्ये या पावसाने असा काही तडाखा दिलेला आहे की, ज्यामुळे शेती उध्वस्त झाली आहे आणि शेतकरी अक्षरशा संपूर्ण उघडा पडलेला आहे. असे म्हणतात की, आता पडणारा पाऊस हा परतीचा पाऊस आहे म्हणजे आता यापुढे मान्सूनचा पाऊस संपणार आहे. यावेळी महाराष्ट्रातील काही भागांवर अतिवृष्टीने जो कहर केला आहे त्यामुळे खरीप हंगामाचे मोठेच नुकसान झालेले आहे. परवा आपले मुख्यमंत्री यवतमाळ शहरामध्ये मोरारी बापूंच्या रामकथेत हजेरी लावण्यासाठी गेले असता यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना आपली व्यथा ऐकवली होती. अति पावसामुळे नाशिक, अहिल्यानगर, हिंगोली, जालना, धाराशिव, भंडारा, गोंदियासह बुलढाणा व इतरही काही जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. हा पाऊस केवळ आपल्यावरच कोपला असे नाही तर पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर आणि उत्तराखंड या राज्यांनाही पावसाने दणका दिलेला आहे. यंदा आकाश फाटलेले आहे ते फाटलेले आकाश शिवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी शिवता येईल असे अजिबात वाटत नाही. पावसाचा हा इतका प्रकोप का झाला, याचा अभ्यास करणारे वेगवेगळी कारणे सांगताना दिसतात. आपल्या राज्यातील परिस्थितीचा विचार केला तर आपल्याला जे दिसते ते अतिशय चिंताजनक आहे. आपण विकासाच्या मोहापायी लक्षावधी झाडांची कत्तल केली आहे. गडचिरोली सारख्या घनदाट वनाच्या जिल्ह्यात आपण अनेक वृक्षांचा संहार केला. विकासासाठी शंभर शंभर वर्षांची जुनी झाडे आपल्याला निर्दयपणे तोडावी लागली. एवढेच नाही तर शेतीतून जास्तीत जास्त पीक निघावे यासाठी शेतीत रासायनिक खतांचा आपणच भडीमार केला. विषारी कीटकनाशकांचे आणि औषधांचे फवाऱ्यांवर फवारे आपणच मारले. सध्या आपण खातो त्या भाजीपाल्यावर किती प्रकारची औषधे शिंपडलेली असतील हे आपल्याला कळतही नाही आणि असा भाजीपाला खाल्ल्याशिवाय आपल्याला गत्यंतरही नाही. सेंद्रिय शेतीचा प्रयोग शेतकऱ्यांसाठी फारसा फायद्याचा ठरत नाही, हे वास्तव आहे. तरीही या पद्धतीने काही शेतकरी आजही निष्ठेने सेंद्रिय शेती करताना दिसतात, या शेतीत हे शेतकरी जे उत्पन्न काढतात त्याला जो खर्च लागतो तोही भरून निघत नाही. असा शेतकऱ्यांचा दावा आहे पण हे ओसिससारखे आहे. १९७२ सालामध्ये महाराष्ट्रात दुष्काळाची छाया पडली होती, तो हरितक्रांतीचा काळ होता. तेव्हा आपले तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक परंपरागत ज्वारी पेरण्याऐवजी 'आजचा नारा हायब्रीड पेरा' असे सांगत असत. त्या हरितक्रांतीमुळे आज गहू आणि तांदूळ यासारख्या पिकांची आयात बंद झालेली आहे. अन्यथा आताच्या प्रौढ पिढीला पीएल ४८० अंतर्गत येणाऱ्या अमेरिकेतील पशुखाद्य म्हणून वापरल्या जाणाऱ्या मिलो धान्याला आपल्या नित्याच्या जेवणासाठी वापरावे लागले होते. या मिलो गव्हाबरोबर जे गवत आले त्याला त्याकाळी काँग्रेस गवत म्हणत असत पण नंतरच्या काळात त्याला गाजर गवत असे नामाभिधान मिळाले. आपल्या हरित क्रांतीचा देशातील जनतेला अन्नधान्य आयातीच्या बाबतीत फायदा झाला पण यातील खरी गोम अशी आहे की, डाळी आणि तेल वाण हे आजही आपल्याला आयात करावे लागत आहेत. आज निसर्गाचे संतुलन पूर्णतः बिघडलेले आहे. आसेतू हिमालय सर्वत्र पावसाचा असमतोल मारा सुरू आहे. त्यामुळे कुठे अतिवृष्टी तर कुठे अनावृष्टी असा प्रकार सातत्याने दृष्टोत्पत्तीस येत आहे. ज्यांची ज्यांची हानी झालेली आहे, ज्यांच्या ज्यांच्या घरादाराची आणि शेतीची राखरांगोळी झालेली आहे. त्यांना कोणतेही सरकार फारशी मदत देऊ शकत नाही हे ज्वलंत सत्य आहे. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे आकाशाला शिवता येत नाही, नद्यांना अडवता येत नाही आणि सागराला बडवता येत नाही. आता तर असे म्हणावे लागते आणि पुढेही म्हणावे लागेल की गेलेले वर्ष बरे होते. हतबल मानवतेची ही व्यथा आणि शेतकऱ्यांची करूण कथा भविष्यातील भयावह स्थितीची दिशानिर्देशक आहे हेच खरे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# मी भगवान शिवाचा भक्त आहे

## आसाममधील सभेतून पंतप्रधान मोदींची पुन्हा काँग्रेसवर टीका

■ वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. १४ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पुन्हा एकदा काँग्रेसवर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदींनी आज आसामध्ये १८,५३० कोटी रूपयांहून अधिक किमतीच्या पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकास योजनांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. आसामच्या दरांग येथे पंतप्रधान मोदींनी सभेला संबोधित केले, यावेळी त्यांनी त्यांच्या दिवंगत आई हीराबेन मोदी यांच्याबद्दल झालेल्या शिवीगाळीवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवरून विरोधकांवर टीका केली. पंतप्रधान म्हणाले की ते भगवान शिवाचे भक्त आहेत आणि शिव्यांचे विष गिळून टाकतील.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, १९६२ मध्ये चीनबरोबर जे युद्ध झाले, त्यानंतर पंडीत नेहरू जे म्हणाले होते, नॉर्थ ईस्टच्या लोकांचे त्या जखमा आजही बऱ्या झालेल्या नाहीत. त्या जखमांवर काँग्रेसची सध्याची पिढी देखील मिठ चोळण्याचे काम करत आहे.



पुढे बोलताना पंतप्रधान म्हणाले की, मला कितीही शिव्या द्या. मी तर भगवान शिवाचा भक्त आहे. सर्व विष पिऊन टाकेन. मात्र लज्जास्पद पद्धतीने जेव्हा दुसऱ्या कोणाचा अपमान झाला तर मला राहावत नाही. तुम्ही मला सांगा की, भुपेन दा यांना भारतरत्न देण्याचा माझा निर्णय योग्य आहे की नाही? भूपेन दा यांना भारत रत्न दिला त्याचा काँग्रेसने अपमान केला हे चूक केलं की नाही? आज आसामच्या मुलाचा, भारताच्या सुपुत्राचा काँग्रेस असा अपमान करते खूप दुःख होतं, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

मला माहित आहे की, यांची संपूर्ण इकोसिस्टम माज्यावर तुटून पडेल आणि म्हणतील की मोदी पुन्हा रडत आहेत. माज्यासाठी तर जनता हीच माझे दैवत आहे. जर माज्या इश्वराकडे जाऊन माज्या आत्म्याची आवाज निघणार नसेल तर कुठे निघेल? हेच माझे मालक आहेत, हेच माझे पूजनीय आहेत. असे पंतप्रधान मोदी आसामच्या दरंग येथे अनेक प्रकल्पांचे उद्घाटन केल्यानंतर एका सभेत बोलताना म्हणाले.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित निवडणुक प्रचारादरम्यान आरजेडी-काँग्रेसच्या व्यासपीठावरून झालेल्या शिवीगाळ प्रकरणी पंतप्रधान मोदी काँग्रेसवर सातत्याने टीका करत आहे. तर यावर विरोधकांचे म्हणणे आहे की जेव्हा हे वक्तव्य करण्यात आले तेव्हा त्यांचा कोणताही नेता व्यासपीठावर नव्हता. त्यानंतर, काँग्रेसने पंतप्रधानांच्या आईचा एआय-जनरेटेड व्हिडिओ तयार करत पोस्ट केल्याने नवा वाद निर्माण झाला. पंतप्रधान मोदींनी सांगितले की, केंद्र सरकारने आसामचे महान गायक भूपेन हजारिका यांना भारतरत्न देण्याचा निर्णय घेतल्यानंतर, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी त्यांना काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांचे एक वक्तव्य दाखवले होते.

पंतप्रधान म्हणाले की, ज्या दिवशी भारत सरकारने या देशाचा महान सुपुत्र आणि आसामचा गौरव असलेले भूपेन हजारिका यांना भारतरत्न देऊन सन्मानित केले, त्याच दिवशी काँग्रेस अध्यक्षांनी, मोदी गायक आणि नर्तकांना हा पुरस्कार देत आहेत. खरगे यांनी हे विधान २०१९ मध्ये केले होते. वाद झाल्यानंतर त्यांनी याबाबत स्पष्टीकरण देखील दिले होते.

जयपूरमध्ये नाल्यात कार पडून

## सात जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. १४ :
जयपूरच्या शिवदासपुरा पोलीस स्टेशन परिसरातील प्रल्हादपुरा जवळ रिंग रोडच्या खाली असलेल्या पाण्याने भरलेल्या नाल्यात एक कार पडली. या अपघातात कारमधील सात जणांचा मृत्यू झाला. कारमधील सर्व लोक हरिद्वारहून अस्थी विसर्जन करून परतत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका तरुणाने नाल्याच्या पाण्यात एक कार बुडलेली पाहिली आणि पोलिसांना माहिती दिली. कार नाल्यातून बाहेर काढण्यात आली आणि मृतदेह शवगृहात ठेवण्यात आले. रिंग रोडवर कार अनियंत्रित झाली आणि सोळा फूट खाली असलेल्या अंडरपासमध्ये भरलेल्या पाण्यात पडली असे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

शिवदासपुरा पोलिस स्टेशनचे प्रभारी सुरेंद्र कुमार सैनी यांनी सांगितले की, अपघातात मृत्युमुखी पडलेले सर्व लोक हरिद्वारमध्ये अस्थी विसर्जन करून घरी परतत होते. मृतांमध्ये रामराज वैष्णव, त्यांची पत्नी मधु आणि मुलगा रुद्र आणि नातेवाईक काळुराम, त्यांची पत्नी सीमा आणि मुलगा रोहित आणि गजराज यांचा समावेश आहे. नचे प्रभारी सुरेंद्र कुमार सैनी यांनी सांगितले की, जयपूरच्या फुलियावास केकरी आणि वाटिका येथील रहिवासी काळुराम यांच्या वडिलांच्या निधनानंतर दोन कुटुंबातील सात जण हरिद्वारला गेले होते. अपघातात मृत्युमुखी पडलेले सर्व लोक हरिद्वारमध्ये अस्थी विसर्जन करून घरी परतत होते.

## काँग्रेस नेते राहुल गांधींचा पंजाब दौरा

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. १४ :
पंजाबमधील भीषण पुरामुळे बाधित झालेल्या भागांची स्थिती जाणून घेण्यासाठी काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी उद्या म्हणजेच सोमवारी पंजाबमध्ये पोहोचत आहेत. राहुल गांधींचा हा दौरा राजकीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल गांधी सकाळी ९:३० वाजता अमृतसर विमानतळावर उतरतील. विमानतळावरून ते थेट रामदास परिसरात जातील, जिथे ते पूरग्रस्त कुटुंबांना भेटतील आणि त्यांच्या समस्या ऐकतील. रामदासमध्ये, राहुल गांधी गुरुद्वारा बाबा बुधा साहिब जी येथे पूजा आणि प्रार्थना करतील. ते गुरुद्वारामध्ये सेवा करणाऱ्या भाविकांशी बोलतील आणि बाधित कुटुंबांच्या समस्या ऐकतील. यासोबतच, ते मदत कार्याचा आढावा घेतील आणि स्थानिक प्रशासन आणि संघटनांना भेटून मदत साहित्य आणि पुनर्वसन कायार्ची स्थिती यावर चर्चा करतील.

## एकही नकली व्यक्ती ओबीसीमध्ये येणार नाही

### विरोधकांच्या आरोपांवर फडणवीसांचा पुनरुच्चार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
राज्यातील ओबीसी समाजाला कुठलाही धोका नाही. एकही नकली व्यक्ती ओबीसींमध्ये समाविष्ट होणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नकली म्हणजे जो ओबीसी नाही, तो कधीच या प्रवर्गात समाविष्ट होणार नाही. त्यासाठी सरकारने जारी केलेल्या जीआरमध्ये स्पष्ट तरतूद केली आहे, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या आरोपांवर उत्तर देताना केला.

राज्य सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणसाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासंदभार्तील जीआर देखील काढला आहे. या जीआरमुळे कुणबी नोंदी असणाऱ्या मराठा समाजातील लोकांना कुणबी प्रमाणपत्र भेटणार असून, ओबीसीतून आरक्षणाचा लाभ भेटणार आहे.

या जीआरविरोधात ओबीसी संघटना आक्रमक झाल्या असून, यामुळे ओबीसींचे आरक्षण धोक्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसी आरक्षणाला धोका निर्माण होणार असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. त्या आरोपांना उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त पुनरुच्चार केला.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, २०१४ ते २०२५ या काळात ओबीसी समाजासाठी जितके निर्णय झाले, ते केवळ आमच्या सरकारकडूनच झाले आहेत. ओबीसी वेगळे मंत्रालय आणणारे आम्ही, ओबीसींसाठी योजना आखणारे आम्ही, महाज्योती स्थापन करणारे आम्हीच. ओबीसींसाठी ४२ नवीन वसतिगृहे देणारे आणि उद्धव ठाकरे सरकारने घालवलेले २७ टक्के राजकीय आरक्षण परत आणणारे आमचे सरकार आहे. मग ओबीसींचे खरे हित पाहणारे कोण, हे समाजाला उत्तम ठाऊक आहे.

## गुजरातच्या फॅक्टरीत आग २ मजुरांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, मेहसाणा, दि. १४ :
गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातून सध्या मोठी बातमी समोर येत आहे. रविवारी सकाळी येथील पानोली जीआयडीसीमध्ये असलेल्या एका कंपनीत भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा इतक्या भीषण होत्या की आकाशातून फक्त काळा धूर दिसत होता. त्याच वेळी आगीची भीषणता पाहून कोणीही जवळ जाण्याचे धाडस करू शकले नाही. आगीची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. दरम्यान, अग्निशमन विभागाला आगीची माहिती देण्यात आली, त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी १५ हून अधिक अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. सध्या या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

रविवारी पहाटे मेहसाणा जिल्ह्यात एका खत कारखान्याला आग लागली. या अपघातात दोन कामगारांचा जळून मृत्यू झाला. याशिवाय अनेक जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी दोघांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. मेहसाणा ग्रामीण पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले की, समीत्रा गावाजवळील प्लांटला पहाटे ३ वाजता आग लागली. त्यांनी सांगितले की, प्लांटमध्ये रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करणारे दोघे जण जळून मृत्युमुखी पडले. इतर दोघे जखमी झाले, ज्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले.

## जास्मिन लम्बोरियाने जिंकले सुवर्णपदक

■ वृत्तसंस्था, स्पोर्ट्स डेस्क, दि. १४ :
लिव्हरपूल (यूके) येथे खेळल्या जाणाऱ्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप-२०२५ मध्ये भारताच्या जास्मिन लम्बोरियाने सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. ५७ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात, जास्मिनने पोलंडच्या ज्युलिया झेरेमेटाचा ४-१ अशा विभाजित निर्णयाने पराभव केला.



कॉमनवेल्थ गेम्स (२०२२) मध्ये कांस्यपदक विजेती जॅस्मिनने पहिल्या फेरीत पराभव पत्करल्यानंतर शानदार पुनरागमन केले आणि सामन्यावर वर्चस्व गाजवले. ज्युलिया झेरेमेता ही पॅरिस ऑलिंपिक २०२४ मध्ये रौप्यपदक विजेती आहे. पॅरिस ऑलिंपिक-२०२४ मध्ये जास्मिनला एकही पदक जिंकता आले नाही. यानंतर तिने स्वतःला नव्याने तयार केले. अलिकडेच अस्ताना (कझाकस्तान) येथे झालेल्या जागतिक बॉक्सिंग कपमध्येही तिने सुवर्णपदक जिंकले. सुवर्णपदक जिंकल्यानंतर प्रशिक्षक आणि संघातील सदस्यांसह जास्मिन लांबोरिया (उजवीकडून तिसरी). सुवर्णपदक जिंकल्यानंतर प्रशिक्षक आणि संघातील सदस्यांसह जास्मिन लांबोरिया (उजवीकडून तिसरी). नुपूरला रौप्य, पूजाला कांस्यपदक त्याच जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये, भारताच्या नुपूर शेओरनने ८० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत पराभव पत्करल्यानंतर रौप्य पदक जिंकले, तर पूजा राणीने कांस्य पदक जिंकले.

## महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे मुंबईत आगमन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :
महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे पत्नी दर्शना देवी यांच्या समवेत आज मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील राज्यपाल देवव्रत यांचे स्वागत केले. कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार, राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, रेल्वे पोलीस महासंचालक प्रशांत बुरुडे, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आँचल गोयल तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत हे १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पदाची सूत्रे स्वीकारून त्यांचा शपथविधी समारंभ होणार आहे.

## नितीन गडकरींना गीताधर्मव्रती मोहना चितळेंना ताई आपटे पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १४ :
शताब्दी वर्षानिमित्त गीता धर्म मंडळाच्या वतीने नितीन गडकरी यांना आज गीताधर्मव्रती विशेष पुरस्कार गीताधर्म मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मुकुंद दातार यांच्या हस्ते, तर राष्ट्र सेविका समिती, नागपूरच्या वतीने देण्यात येणारा वंदनीय ताई आपटे पुरस्कार प्रख्यात निरुपणकार मोहना चितळे यांना नितीन गडकरी यांच्या हस्ते बालगंधर्व रंगमंदिर येथे प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर राष्ट्रसेविका समितीच्या अखिल भारतीय सहप्रमुख चित्रा जोशी, गीताधर्म मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मुकुंद दातार, कार्यवाह विनया मेहेंदळे आणि कार्यकारणी सदस्य शैलजा कात्रे उपस्थित होते.




नितीन गडकरी म्हणाले की, आज आपल्या आजुबाजूला विचार नसणारी आणि दिशा नसणारी माणसे मोठ्या प्रमाणावर दिसतात. हीच विचारशून्यता समाजातील मोठी समस्या आहे. अशा पार्श्वभूमीवर आपली संस्कृती आणि आपला विचार खूप महत्त्वाचा आहे. भविष्यात समाज आणि देश चांगल्या दिशेने जाण्यासाठी मूल्याधिष्ठित जीवनपद्धती ही मोठी ताकद ठरणार आहे. जीवनाला प्रस्थापित करणारे तत्त्वज्ञान भगवद्गीतेत आहे.

## आसाममध्ये ५.८ तीव्रतेचा भूकंप

■ वृत्तसंस्था, दिसपूर, दि. १४ :
आसाममधील गुवाहाटी येथे आज, रविवारी (१४ सप्टेंबर) भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले आहेत. संध्याकाळी ४:४१ वाजता गुवाहाटीमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ५.८ रिश्टर स्केलवर नोंदवली गेली आहे. आसाम व्यतिरिक्त, या भूकंपाचे धक्के भुटान आणि पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील भागांमध्ये देखील जाणवले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपाचे केंद्रस्थान आसाममधीलच उदलगुडी जिल्ह्यात, जमिनीपासून ५ किलोमीटर खोलीवर नोंदवले गेले. ता भूकंपाचे धक्के भुटान आणि बांगलादेशच्या उत्तरेकडील भागांपर्यंत पोहोचले आहेत. सुदैवाने, या भूकंपात कुणीही जखमी झाल्याची किंवा कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही.

## जहाल नक्षलवादी पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. १४ :
राष्ट्रीय तपास यंत्रणेला हवा असलेल्या जहाल नक्षलवाद्याला अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. शंकर भिमा महाका (वय ३२, रा. परायणार, ता. भामरागड) असे अटक करण्यात आलेल्या नक्षल्याचे नाव असून पोलिसांनी भामरागड तालुक्यातील तिरकामेटा जंगल परिसरातून त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर दोन लाखांचे बक्षीस होते.

शनिवारी (१३ सप्टेंबर) ताडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत विशेष अभियान पथक नक्षलविरोधी मोहीम राबवत असताना जवानांना एक संशयित व्यक्ती दिसून आला. त्याला ताब्यात घेऊन अहेरी येथील प्राणाहिता पोलीस उपमुख्यालयात आणण्यात आले. चौकशीत त्याची ओळख शंकर महाका अशी पटली. तो भामरागड दलमचा सदस्य असून, घातपाताच्या उद्देशाने तिरकामेटा जंगलात रेकीसाठी गेला होता, असे तपासात स्पष्ट झाले.



२१ जानेवारी २०२२ रोजी भामरागड तालुक्यातील धोडराज-इरेर मार्गावरील पेनगुंडा रस्त्याच्या कामावर असलेली तब्बल १९ वाहने नक्षल्यांनी पेटवून दिली होती. सुमारे २ कोटी रुपयांच्या या जाळपोळ प्रकरणात शंकर महाकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. तो २०१६ ते २०२२ या काळात नक्षल्यांच्या जनमिलिशियामध्ये कार्यरत होता. नंतर त्याने भामरागड दलममध्ये प्रवेश केला. जानेवारी २०२२ पासून आतापर्यंत गडचिरोली पोलिसांनी १०९ नक्षल्यांना अटक करण्यात यश मिळवले आहे.

१ नोव्हेंबर २०२३ रोजी लाहेरी येथील दिनेश पुसू गावडे याचा पेनगुंडा येथे नक्षल्यांनी धारदार शस्त्रांनी खून केला होता. या गुन्ह्यात धोडराज पोलिसांनी काही आरोपींना अटक केली होती. पुढे ऑक्टोबर २०२४ मध्ये हा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग करण्यात आला. त्यानंतर या खटल्यात चार आरोपींविरुद्ध विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. शंकर महाका हा त्याच प्रकरणातील वॉंटेड आरोपी होता. नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्राणाहिता) सत्य साई के., पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे आणि भामरागडचे प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अजय कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## पंतप्रधान मोदींचे मणिपूरबद्दलचे वक्तव्य म्हणजे 'क्रूर थट्टा': ॲड. प्रकाश आंबेडकर



**मुंबई :** मणिपूरमधील सुरू असलेल्या हिंसाचारावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारवर तीव्र हल्लाबोल केला आहे. मोदींनी मणिपूरला "भारताच्या मुकुटातील रत्न" असे संबोधले होते. या विधानावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आंबेडकरांनी ते "क्रूर थट्टा" असल्याचे म्हटले आहे. आंबेडकरांनी आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून सात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करत भाजप सरकारवर जातीय शुद्धीकरण, सत्य दडपणे आणि न्यायाकडे दुर्लक्ष करण्याचे गंभीर आरोप केले. त्यांनी माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ख्रिश्चन कुकी समाजावर अन्याय केल्याचे सांगितले. तसेच लीक झालेल्या ऑडिओ टेप्समध्ये बिरेन सिंग हेच हिंसाचाराचे मुख्य सूत्रधार असल्याचे स्पष्ट झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# कोणतीही कमिटी एका जातीची नको समाजाची करा

## सामाजिक ऐक्य हवे, त्यात अंतर नको : शरद पवार

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १४ :

राज्यात सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून वाद सुरू आहे. मनोज जरांगेंच्या आंदोलनानंतर सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर जारी केला. मात्र, याला ओबीसी संघटनांचा तीव्र विरोध आहे. यामुळे ओबीसी आरक्षण संपुष्टात येईल, असा दावा ओबीसी संघटनांकडून करण्यात येत आहे. आता या वादावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सरकारने एका जातीची समिती न करता, सर्वसमावेशक समिती तयार करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. "सरकार कोणत्याही एका जाती-धमार्चे नाही, ते सर्वांचे असायला हवे," असेही शरद पवार म्हणालेत.




मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याची तयारी दर्शवली, ज्याला ओबीसी समाजाने तीव्र विरोध केला आहे. या जीआरच्या वैधतेबद्दल विचारले असता, शरद पवार म्हणाले की, "एक समिती एका मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, तर दुसरी दुसऱ्याच्या अध्यक्षतेखाली आहे. सरकारने असे करणे योग्य नाही. सरकार कुठल्याही जातीधमार्चे नाही, सरकार सर्वांचे असावे, सरकार व्यापक असावे. कोणतीही कमिटी एका जातीची करू नका, समाजाची करा. माझा सांगण्याचा उद्देश हाच आहे की सामाजिक ऐक्य हवे, त्यात अंतर नको, असा सल्लाही शरद पवार यांनी सरकारला दिला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासाठी शरद पवारांचा पाठिंबा असल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपांवरही शरद पवारांनी स्पष्टीकरण दिले. "ज्याचा आमच्याशी कवडीचाही संबंध नाही, त्यावर बोलण्याची गरज नाही. हे आरोप सत्यावर आधारित नाहीत," असे म्हणत त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले.

ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी काही लोकांच्या दादागिरीमुळे मराठा नेते बोलायला तयार नाहीत असे वक्तव्य केले होते. त्यावरही शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. एका जातीचे राजकारण आम्हाला शोभत नाही. अंतर वाढेल असे भाष्य करणे योग्य नाही. सामाजिक ऐक्य हवे. आम्हाला व्यापक दृष्टीकोन पाहिजे. असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

याशिवाय, शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींच्या मणिपूर दौऱ्याचे स्वागत केले आहे. मोदींनी मणिपूरला जावं अशी मागणी होत होती. त्यामुळे ते तिकडे गेले ते चांगले झाले, असे ते म्हणाले. तर आज दुबईत भारत विरुद्ध पाकिस्तानचा सामना खेळला जाणार आहे. या सामन्याला ठाकरेंच्या शिवसेनेकडून तीव्र विरोध केला जात आहे. याबाबत शरद पवार यांना विचारले असता, भारत-पाकिस्तान सामन्यासारख्या "एक दिवसाच्या प्रश्नावर" अधिक चर्चा करण्याची गरज नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## देवा भाऊंची जाहिरात मेघा इंजिनिअरिंगने दिली का? रोहित पवार

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. १४ :



मोदी साहेबांचा फोटो जरूर लावा, पण सोबतच गेली सात वर्षे अव्वाच्या सव्वा वसूल करून देशातील जनतेची लाखो कोटी रुपयांची पाकीट मारी केल्याबद्दल माफी असावी, अशी तळटीप ही फोटोखाली देणार आहात का? असा सवाल शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी वर पोस्ट करत विचारला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रोहित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोंच्या वापरावरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. पंतप्रधान मोदींचा फोटो लावण्यासोबतच जीएसटीमुळे जनतेची आर्थिक फसवणूक झाल्याची 'तळटीप'ही लावावी, असे त्यांनी म्हटले आहे. रोहित पवार म्हणाले की, राज्यातील प्रत्येक तालुक्यातील आमदाराला सांगण्यात आलं होतं देवाभाऊ जाहिरात लावा. मात्र नाव कुठेच छापल नव्हतं. आमची जाहिरात बघा, आम्ही आमच नाव छापलं आहे. त्यांनी नाव छापलेले नाही, याचा अर्थ मेघा इंजिनियरिंग कंपनीने जाहिरात दिली का? असा सवालही त्यांनी केला आहे.

रोहित पवार यांनी '' वर पोस्ट करत म्हटले आहे की, मोदी साहेबांचा फोटो जरूर लावा, पण सोबतच ह्यगेली सात वर्षे अव्वाच्या सव्वा जी एसटी वसूल करून देशातील जनतेची लाखो कोटी रुपयांची पाकीट मारी केल्याबद्दल माफी असावी अशी तळटीपही फोटोखाली देणार आहात का?

## गरज असते तिथे राहुल गांधी नेहमीच दांडी मारतात : अनुराग ठाकूर



**पुणे :** विरोधी पक्ष भरकटलेल्या अवस्थेत आहे. संसदेचे अधिवेशन सुरू असताना विरोधी पक्षनेते तिथे नसतात. स्वातंत्र्य दिनाच्या समारंभात ते नसतात. नुकत्याच झालेल्या उपराष्ट्रपतींच्या शपथविधी सोहळ्याला विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दांडी मारली. १० वर्षे विरोधी पक्षनेतेपद रिकामे होते. या वेळी त्यांना विरोधी पक्ष होण्याची संधी मिळाली. मात्र ते देशाला गरज असते तिथे उपस्थित नसतात. भारताचा विरोध करण्यासाठी मात्र राहुल गांधी आघाडीवर असतात, अशी टीका माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी केली. पुणे ऑन पेडल्स सायकल रॅली व पुणे वॉकेथॉनचे उद्घाटन केल्यानंतर अनुराग ठाकूर माध्यमांशी बोलत होते. प्रसंगी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, क्रिकेटपटू केदार जाधव उपस्थित होते. उपराष्ट्रपतींच्या शपथविधीला राहुल गांधी गैरहजर असल्याच्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनीही भारताने पाकिस्तानशी क्रिकेट खेळू नये, असे नमूद केले. भारत-पाकिस्तान सामन्यावर बोलताना अनुराग ठाकूर म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्पर्धा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) किंवा आशियाई क्रिकेट परिषद (एसीसी) घेत असते.

## भारत-पाक मॅचमागील 'पैशाचा खेळ' : संजय राऊत



**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना त्यांच्या मुलाला देशभक्ती शिकवता आली नाही त्यांनी आम्हाला देशभक्ती शिकवू नये. तुमचा मुलगा दुबईत बसून भारत-पाकिस्तान मॅचचे आयोजन करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांना पदावरून जावे लागेल त्यांनी आम्हाला देशभक्ती शिकवू नये असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. खासदार संजय राऊत म्हणाले की, अजित पवारांच्या अंगात पाकड्यांचे रक्त वाहत आहे. अजित पवार अर्धे पाकिस्तानी आहेत. महाराष्ट्राचा मंत्री जर भारत-पाकिस्तान सामना पाहण्याची भाषा वापरत असेल तर ती राष्ट्रभक्त नागरिकाची भाषा नाही. पहलगाम येथे मृत्यूमुखी पडलेल्या 26 लोकांमध्ये तुमच्या घरातील कुणी असते तर तुम्ही असे बोलला नसतात. जर त्या 26 लोकांमध्ये तुमचा एखादा ठेकेदार जरी असता, तरी तुम्ही हे बोलला नसता खासदार संजय राऊत म्हणाले की, तुम्ही जनतेच्या भावनांशी खेळत आहात. म्हणून आपल्या देशात नेपाळ सारखी परिस्थिती होईल हे मी वारंवार सांगत आहे. अमित शहा आम्हाला बाळासाहेब शिकवत आहेत. बाळासाहेब असते तर हे झाले नसते ते झाले नसते असे म्हणणाऱ्या शहा यांना सांगतो की बाळासाहेब असते तर आजचा मॅच झाला नसता.

## जरंडेश्वरच्या गळतीमुळे तिळगंगा नदी प्रदूषित

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. १४ :

चिमणगाव (ता. कोरेगाव) येथील जरंडेश्वर शुगर मिल्स आणि मिल्सच्या डिस्टिलरी विभागातून तिळगंगा नदीपात्रात वारंवार मळी आणि रसायन (केमिकल)मिश्रित सांडपाणी सोडले जात असल्याने नदीचे पाणी दूषित होऊन नदीकाठचे नागरिक व शेतकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कुमठे (ता. कोरेगाव) ग्रामपंचायतीच्या वतीने वेळोवेळी शासनाच्या अनेक विभागांना व जरंडेश्वर शुगर मिलला वारंवार कळवूनही जरंडेश्वर शुगर मिल्स आणि डिस्टिलरी विभाग मळी आणि रसायनयुक्त टाकाऊ पाणी मोठ्या प्रमाणामध्ये तिळगंगा नदीपात्रात सोडत आहे. या मळी व रसायनयुक्त (केमिकलयुक्त) टाकाऊ पाण्यामुळे कुमठे गावालगतच्या बंधाऱ्यातही मळीयुक्त पाण्याचा मोठा साठा झालेला आहे. कुमठे गावाला पाणीपुरवठा करणारी पाण्याची सार्वजनिक विहीरही या बंधाऱ्यापासून जवळ १० ते १३ फूट नदीलगत आहे. त्यामुळे सध्या या बंधाऱ्यातून मळीयूक्त पाण्याचा पाझर सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत मोठ्या प्रमाणावर होत आहे. ही बाब कुमठे ग्रामपंचायतीच्या वतीने वारंवार जरंडेश्वर शुगर मिल प्रशासनास कळवण्यात आली आहे.

मात्र, मिल प्रशासन त्याकडे गांभीयार्ने पाहत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सातारा येथील उपप्रादेशिक अधिकारी अमीर सातपुते हेही जरंडेश्वर शुगर मिल्सच्या व्यवस्थापनास पाठीशी घालून सर्वसामान्य जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळत आहेत. ग्रामपंचायतीने याबाबत सर्व विभागांना पत्रव्यवहार करून कळवूनही यावर कोणीही काहीही सहकार्य करत नाही. आपण तातडीने जरंडेश्वर शुगर मिल प्रशासनास सूचना देऊन कुमठे गावाचा दूषित पाण्याचा प्रश्न सोडवावा असे निवेदन देण्यात आले आहे. याबाबत कुमठे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष गुलाब चव्हाण यांनी पुणे येथील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या उपप्रादेशिक अधिकाऱ्यांना एक निवेदन दिले आहे.

याबरोबरच उपमुख्यमंत्री अजित पवार, पुणे येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, नवी दिल्ली येथील केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी व जरंडेश्वर शुगर मिलच्या सरव्यवस्थापक यांनाही पाठवण्यात आले आहे.

# पश्चिम महाराष्ट्रात युती स्थानिक पातळीवरच

## उद्धव ठाकरे यांनी मुंबईत दिले पदाधिकाऱ्यांना संकेत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

व ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील वाढलेल्या जवळिकीमुळे आगामी निवडणुकांमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यात युती होण्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या चर्चांना पूर्णविराम देत उद्धव ठाकरेंनी पश्चिम महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सावध भूमिका घेतली आहे. सूत्रांनुसार, त्यांनी युतीचा निर्णय पूर्णपणे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर सोपवला आहे.



जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता राज्यभर निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांसाठी आगामी निवडणुकीत युती करण्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाविकास आघाडीसोबत (मविआ) किंवा मनसे युती करायची की नाही याचा निर्णय स्थानिक कार्यकर्त्यांनी घ्यावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यासोबत जागावाटपावर चर्चा करून अंतिम निर्णय घ्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, उबाठा आता महाविकास आघाडीत राहते की नाही हेदेखील पाहणे येणाऱ्या काळात महत्त्वाचे ठरणार आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत गेलेल्या उद्धव ठाकरेंनी आता स्थानिक निवडणुकांमध्ये मात्र वेगळी रणनीती आखल्याचे दिसते. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने भाजपने मनसेसह महायुतीचा झेंडा फडकावण्याचा प्रयत्न केला होता. त्यासोबतच शिवसेना एकनाथ शिंदे यांनीसुद्धा राज ठाकरे यांच्याशी संपर्क करून भेटी वाढवल्या होत्या. मात्र, हिंदी भाषेच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्याने महायुतीचे समीकरण बिघडल्याचे दिसून आले.

## काँग्रेसकडून पंतप्रधानांच्या मातोश्रींचा अपमान : कार्यकर्त्यांकडून तीव्र निषेध

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १४ :

काँग्रेस पक्षाने बिहार निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्रींचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने शनिवारी पुणे शहरात जोरदार आंदोलन केले. "स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी" या भारतीय संस्कृतीचा आणि




मातृशक्तीचा अवमान करणाऱ्या काँग्रेसच्या विचारधारेचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले असे महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषा लडकत यांनी सांगितले.

या आंदोलनात स्मिता खेडकर, राजेश्री शिळीमकर, वृषाली चौधरी, अनिता शहाणे, लता धायगुडे, सुचेता भालेराव, सोनल कोद्रे, मोना गद्रे, अनिता तलाठी, सीमा लिमये, थोरविणा येणपुरे, गौरी शिरोळे, ज्योती गारवे, विद्या चव्हाण, रोहिणी रहाणे, आदी पदाधिकारी आणि महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. पुणे शहरातील अलका चौकात हे आंदोलन करण्यात आले.

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १४ :



सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. १ ते ४ जानेवारी या कालावधीत शाहू स्टेडियम येथे हे संमेलन होणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. महामंडळाच्या घटक, समाविष्ट आणि संलग्न संस्थांनी विश्वास पाटील यांचे नाव अग्रक्रमाने सुचविले होते. त्यामुळे त्यांची निवड करण्यात आली. एकमताने निवड झाल्याने बैठकीत मतदान घेण्याची वेळ आली नाही, अशी माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेने संमेलनाचे आयोजन करणे असल्याने पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने अध्यक्षपदासाठी कोणाचेही नाव सुचविले नाही, असे जोशी यांनी स्पष्ट केले.

## गणेशोत्सवात सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. १४ :

एखादे मंगल कार्य पार पाडण्यासाठी शेकडो हात अहोरात्र राबत असतात. कार्य पार पडले की मात्र, बऱ्याचदा त्या हातांचा विसर पडतो पण असे न होता ज्यामुळे कार्य पार पडले त्यांचा विचार ठेवून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे ही भारताची संस्कृती आहे. ही संस्कृती जपण्याचं काम भोई प्रतिष्ठान गेली 21 वर्ष करीत आहे ही अत्यंत वेगळी आणि समाधानची गोष्ट आहे. भोई प्रतिष्ठान सारख्या संस्था पोलिसांच्या सोबत आहेत म्हणूनच गणेशोत्सवा सारखा मोठा उत्सव निर्विघ्नपणे पार पडला असे प्रतिपादन पुण्याचे सहपोलिस आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी व्यक्त केले.

गणेशोत्सवात अहोरात्र राबून गणेश भक्तांची सेवा करणाऱ्या पुणे अग्निशमन दल, जीव रक्षक, आपत्कालीन वैद्यकीय मदत पथकातील डॉक्टर्स आणि रुग्णवाहिका चालक, नागरी संरक्षण दल आदी संस्थांचा भोई प्रतिष्ठान तर्फे कृतज्ञता सन्मान देऊन गौरव करण्यात आला प्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सोलापूरमध्ये झालेला डीजे मुक्त गणेश उत्सवचे अनुकरण पुणेकर पुढच्या वर्षी नक्की करतील असा मला विश्वास आहे. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, महाराष्ट्र पोलिस तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.के. भागवत, जेष्ठ पत्रकार राजीव सावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलेने केलेल्या फसवणुकीमुळे तरुणाची आत्महत्या

**पुणे :** प्रेमाचा बहाणा करून पैशांसाठी त्रास दिल्याने एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना धायरी भागात घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून एका महिलेला अटक करण्यात आली. या प्रकरणी महिलेच्या मुलीविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या महिलेची मुलीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मृत तरुणाच्या पत्नीने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या केलेला तरुण विवाहित होता. आरोपी महिला धायरी परिसरात राहायला आहे. आरोपीने तरुणाला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर त्याला धमकावून पैसे उकळण्यास सुरुवात केली. महिला, तिची मुलगी यांनी तरुणाला वारंवार त्रास दिला. त्यांच्या त्रासामुळे शनिवारी (१३ सप्टेंबर) तरुणाने राहत्या घरात आत्महत्या केल्याचे त्याच्या पत्नीने पोलिसांकडे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# महायुतीसोबत रिपाइं, पण मुंबईत हवे २७ जागा : रामदास आठवले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १४ :

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला महायुतीने २७ जागा सोडाव्यात, अशी मागणी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शनिवारी कांदिवलीमध्ये पार पडलेल्या पक्षाच्या जिल्हा कार्यकर्ता मेळाव्यामध्ये केली. यावेळी भाजप आमदार प्रवीण दरेकर, गोपाल शेट्टी, रिपाइंचे गौतम सोनवणे, सिद्धार्थ कासारे, सीमा आठवले उपस्थित होते.




मुंबई महापालिकेवर महायुतीची सत्ता येणार असून रिपाइंला उपमहापौर पदाची संधी आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तयारीला लागावे, अशा सूचना आठवले यांनी केल्या. नागालँडमध्ये पक्षाचे दोन आमदार असून आसाममध्ये पक्षाला चांगली मते मिळाली आहेत. लवकरच राष्ट्रीय पक्ष म्हणून रिपाइंला मान्यता मिळेल. त्यानंतर भाजप हा छोट्या पक्षाला संपवणारा नसून वाढवणारा पक्ष असल्याचे सिद्ध होईल, असे आठवले म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संविधान आणि लोकशाही अधिक मजबूत केली आहे. दलित, ओबीसी आणि मुस्लीमांना मोदी यांच्यामुळे न्याय मिळतो आहे. रिपाइ पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व असून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे आम्ही राष्ट्रीय स्तरावरचे एक मजबुत घटक आहोत, असा दावा आठवले यांनी मेळाव्यात बोलताना केला.

## तरुणावर कोयत्याने हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १४ :

पुण्यातील विमाननगर परिसरात गुरुवारी पहाटे एका 33 वर्षीय आयटीमध्ये काम करणाऱ्या तरुणावर दोन तरुणांनी कोयत्याने हल्ला केल्याची घटना घडली. म्हाळुंगे येथील तरुण (मूळ पश्चिम बंगाल) आपल्या होणाऱ्या पत्नीला आयटी कंपनीतून घरी नेण्यासाठी तिच्या कंपनीच्या बाहेर उभा असताना हा प्रकार घडला. या हल्ल्यात तरुणाच्या उजव्या हाताला फ्रॅक्चर झाले असून पाठ आणि डोक्यावरही जखमा झाल्या आहेत. दरम्यान, हा हल्ला चुकीच्या व्यक्तीवर झाला असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुण हा विमाननगर परिसरातील एका आयटी कंपनीबाहेर गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास त्याच्या होणाऱ्या पत्नीची वाट पाहत दुचाकीवर उभा होता. त्याचवेळी आरोपी बालाजी शिवाजी मुंडे आणि सिद्धार्थ ईश्वर डालिया (दोघेही वय १९, रा. हडपसर) हे तिथे आले आणि त्यांनी तरुणावर कोयत्याने हल्ला केला. सुदैवाने हल्ल्यावेळी कोयत्याचा धारदार भाग न वापरल्याने तरुणाला गंभीर दुखापत टळली.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर येरवडा पोलिसांनी प्रकरणाची दखल घेत गुन्हा दाखल केला. घटनेनंतर केवळ सहा तासांत दोन्ही आरोपींना हडपसर परिसरातून अटक करण्यात आली.

# अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली.

पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते.

अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# मूकबधिर मुलीवर राहत्या घरात विनयभंग

## तोंडावर रुमाल दाबून गळा दाबला

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातून एक अतिशय धक्कादायक घटना समोर येत आहे. अल्पवयीन मुलीला चाकूचा धाक दाखवत तिच्यावर अत्याचार केल्याची घटना ताजी असतानाच आता मूकबधिर मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाला. शेजारील राहणाऱ्या ३८ वर्षीय तरुणाने मूकबधिर मुलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. अकोला गणेश विसर्जनाच्या दिवशी अकोल्यात एक दुःखद घटना घडली होती. डाबकी रोड भागात हिंदू समाजातील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणा मुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली. विरोधी पक्षांच्या आमदारांसह सत्ताधाऱ्यांनी या प्रकरणातील आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली. तर 'सकल हिंदू समाज' देखील आक्रमक होता. घटनेच्या निषेधार्थ भव्य असा 'हिंदु जन आक्रोश' मोर्चा काढण्यात आला. हजारो संख्येने महिला पुरुष या मोर्चात सहभागी झाले होते. हे प्रकरण ताज असतानाच आता मूकबधिर मुलीवर तिच्या राहत्या घरात अत्याचाराचा प्रयत्न अर्थातच विनयभंग करण्यात आला. शहरातल्या मोठी उमरी भागातील ४० कॉटर परिसरात ही घटना घडली. नितीन रामकृष्ण खंडारे (वय ३८ वर्ष) असं मूकबधिर मुलीचा विनयभंग करणाऱ्या तरुणाचं नाव आहे.

तारीख १० सप्टेंबर, नितीन खंडारे हा पीडित मुलीच्या राहत्या घरात शिरला, यादरम्यान मायलेकी गाढ झोपलेल्या होते. यावेळी त्याने मूकबधिर असलेल्या मुलीच्या जवळील रुमालाने तिचं तोंड दाबलं. त्यानंतर घराचा दरवाजा आणि खिडक्या बंद करून घेतल्या. तसेच तिचा गळा देखील दाबला. त्यानंतर तिचा श्वास गुदमरला, ती घाबरली. तिने तोंडावरील रुमाल काढून फेकला, लागलीच दरवाजा उघडून घराबाहेर पळत सुटली. त्याचवेळी खंडारे देखील घरातून पळ काढला. त्यानंतर मूकबधिर मुलीने खानाखुणा करून नातेवाईकांना संपूर्ण घडलेला प्रकार सांगितला. अशा तक्रारीवरून सिव्हिल लाईन पोलिसांनी नितीन खंडारे विरुद्ध ७४, ७५ (१), ३३३ या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली. याप्रकरणी अधिक तपास 'पोलीस उपनिरीक्षक निकम' करीत आहेत.

## ७ लाखांची थकीत वसुली

अकोला : अकोलावासीयांकडे १०० कोटींपेक्षा अधिक पाणी बिल थकलेले असून थकबाकीदारांकडून बिल वसुली सुरू करण्यात आली आहे. यासाठी महापालिकेकडून झोननिहाय विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत. दक्षिण झोन मध्ये शिबिराच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये सुमारे १५० नळ कनेक्शन धारकांकडून ७.२५ लाख रुपयांची थकबाकी वसूल करण्यात आली. अकोला महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पाणी बिल भरणे सोपे व्हावे आणि बिलाशी संबंधित कोणत्याही तक्रारींचे निराकरण करता येण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार दक्षिण विभागांतर्गत शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये १५० नागरिकांनी पाणी बिल भरले. पाणीपुरवठा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ज्या भागात ६० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी बिल थकले आहे, तिथे पाणी पुरवठा केला जाणार नसल्याची माहिती आहे. परिणामी ४० टक्के पाणी बिल भरणाऱ्यांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.

## औरंग्या दुग्धाभिषेक विरुद्ध शुद्धीकरण व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन



▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

अकोला जिल्हा शिवसेनाच्या वतीने आज दिनांक १४/९/२०२५ रोजी, कन्हैया ड्रेसेस समोर तिलक रोड अकोला येथे ज्या ठिकाणी धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाज कंटकांनी क्रूर औरंग्याला दुग्ध अभिषेक केला त्याच ठिकाणी अकोला जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हा प्रमुख अश्वीन नवले यांच्या नेतृत्वात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला गंगा जलाभिषेक करून धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाज कंटकांनी केलेल्या कृत्यचा निषेध करण्यात आला. यावेळी मंत्रोपचार करून गंगाजल छिडकून त्या जागेला पवित्र करण्याचे काम शिवसैनिकांनी केले. शिवसैनिकडून क्रूर औरंग्याच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.यावेळी उपजिल्हा प्रमुख शशी चोपडे, महानगर प्रमुख योगेश अग्रवाल, शहर प्रमुख रमेश गायकवाड, निवासी उपजिल्हा प्रमुख अविनाश मोरे, शहर प्रमुख पप्पू मोरवाल,शहर संघटक सागर पूर्णेये महिला उपजिल्हा प्रमुख संगीताताई शुक्ल, अल्पसंख्यांक महिला जिल्हा प्रमुख ममताताई जैन, जयश्रीताई धारपवार,शीतल गिरी, उज्वला इंगळे, पं. लोकेश तिवारी, पं. देवेंद्रजी शर्मा, पं. राजेशजी सुरोलिया, पं. धीरजजी तिवारी, विमुक्त भटक्या जाती सेल जिल्हाप्रमुख मधुकर सोनारगण, प्रसिद्धी प्रमुख गोपाल नागापुरे, रवी देशमाने उपस्थित होते.

## आदिवासी समाजाचे बंजारा आरक्षणाविरोधात निवेदन

▪पातुर,दि १४ (प्रतिनिधी) :

पातुर तालुक्यातील आदिवासी समाज बांधवांनी बंजारा समाजासह कोणत्याही इतर समाजाला आदिवासी आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी आज तहसील कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले. शासकीय विश्राम गृह येथून निघालेल्या शांततामय पायी मोर्चात सुमारे चारशे आदिवासी बांधव सहभागी झाले होते. या निवेदनाला तब्बल आठशे लोकांच्या स्वाक्षऱ्या असून महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती.हैदराबाद गॅझेटचा आधार घेत बंजारा समाज आरक्षणाच्या मागण्या पुढे करत असला तरी हा प्रयत्न चुकीचा व निषेधार्ह असल्याचे आदिवासी समाजाने स्पष्ट केले. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील ४७ जमातींना संविधानाने आदिवासी म्हणून मान्यता दिली असून त्याअंतर्गतच आरक्षणाचा लाभ मिळत आहे. त्यामुळे इतर कोणत्याही जातीची घुसखोरी आदिवासी समाजाला मान्य



नाही. शासनाने असे प्रयत्न केल्यास प्रचंड आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.या आंदोलनात प्रीतम खुळे, हरिदास करवते, विष्णू हांडे, सुधाकर शिंदे, वनदेव चवरे, सौ. अर्चना शिंदे (सरपंच, ग्रामपंचायत शिर्ला), सौ. कल्पना जटाळे, राजाराम डाखोरे, संजय लोखंडे (माजी सभापती), विजय झ्याटे (उपसरपंच, गट ग्रामपंचायत जांब), संतोष ससाने, सुहास देवकर, गजानन भोकरे, राम लठाड, अशोक ठाकरे, संतोष गीरे, समाधान गाढवे, बबन डुकरे, विश्वनाथ जामकर, दामोदर करवते, अजय भोकरे, मनोहर शिंदे आदींसह आदिवासी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी वक्त्यांनी सांगितले की, आदिवासी समाजाला मिळालेले आरक्षण हा त्यांच्या अस्तित्वाचा व हक्काचा प्रश्न आहे.

## आजपर्यंत प्रारूप प्रभाग रचना वर एकुण २४ हरकती प्राप्त

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) : – अकोला महानगरपालिकेची आगामी काळात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी महानगरपालिकेची प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी ३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे.

या अनुषंगाने आज दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी, माळीपुरा, जंगममठ, भगतसिंग चौक या भागाचा परिसर व ईतर लगतच्या प्रभागामध्ये समाविष्ट करू नये, प्रभाग ११ ची रचना २०१७ चे रचनेनुसार ठेवण्यात यावी याबाबत १ हरकती प्राप्त झाली असून आजपर्यंत एकुण एकुण २४ हरकती प्राप्त झाल्या आहेत.

## ओझोन रक्षणार्थ ग्रिनझोन निर्मिती हवी : विश्वभारती

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

१६ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस सर्वदूर साजरा करताना पृथ्वीवरील प्रत्येक मानवी जीवाने भविष्याचे भान ठेवून वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड वायूचा ताण कमी करण्यासाठी आपला प्राण पणाला लावण्याची वेळ आली आहे. १९८७ च्या मॉन्ट्रियल प्रोटोकॉल नुसार आवश्यक ती बंधने पाळणे महत्त्वाचे असून, चढाओढीच्या या जागतिक स्पर्धेत अनेक नियमांना बगल देत केवळ स्वार्थासाठी अनर्थाकडे सुरू झालेली वाटचाल आपल्याच हाताने आपल्याच पायावर दगड पाडून घेण्यासाठी धजावत आहे. अनंत विश्वाच्या पसाऱ्यात आपली एक आकाशगंगा आणि त्यातील एका सूर्यमालेतील एक आपली विविध गुण वैशिष्ट्यांनी युक्त अशी आपली पृथ्वी असंख्य सजीवांचे पालनपोषण करताना निसर्गाचा




समतोल सांभाळतानाचा भार कमी अधिक होत आहे. मानवाच्या अवाजवी गरजांचा भार दिवसेंदिवस वाढत आहे, पृथ्वीचे संरक्षक कवच म्हणून ओळखल्या जाणारे ओझोन वायूचे प्रमाण कमी होत असल्याने जागृत मानवी जीवाला मोठी काळजी असुन काही लोक मात्र सूस्त राहून मस्त जीवन जगत आहेत.या मंडळींनी काळाचे भान राखून भविष्याची जाण ठेवून वागायला हवे.

पृथ्वीचे संरक्षक कवच ओझोन वायू अबाधित ठेवण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू करून, भस्म ासुरा प्रमाणे वाढणारे प्रदुषण वेळीच कमी करायला हवे. पृथ्वीला लागून असलेला तपांबर व स्थितांबराचे थराचे मध्ये पृथ्वी संरक्षक ओझोन वायूचा थर कमी होत असल्याने सूर्याची अतिनील किरणे सरळ पृथ्वीवर येऊन विविध प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत.या संकटाची चाहूल वेळीच लक्षात घेऊन कार्बन डायऑक्साइड व सी.एफ.सी चे प्रमाण आटोक्यात ठेवण्यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

## थोडक्यात

### तरुणाची रेल्वेखाली आत्महत्या !

**अकोला :** सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत काल रात्री उशिरा घडलेल्या एका धक्कादायक घटनेत व्याजाच्या ओझ्याला व दारूच्या नशेला कंटाळून एका २३ वर्षीय तरुणाने रेल्वे खाली येऊन जीवनयात्रा संपविली. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत सूरज मोहन अंभोरे (२३), रा. गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला हा मजुरीवर आपला उदरनिर्वाह करीत होता. दारू पिण्याचा त्याला पक्का ध्यास होता. याशिवाय, त्याने गावातील काही लोकांकडून व्याजाने पैसे घेतले होते. व्याजाच्या तगाद्यामुळे व नशेच्या आहारी गेल्याने तो काही दिवसांपासून मानसिक तणावात होता. १२ सप्टेंबर रोजी रात्री तो 'कामावर जातो' असे सांगून घराबाहेर पडला. मात्र बराच वेळ लोटला तरी तो परत न आल्याने त्याचा भाऊ आकाश मोहन अंभोरे (फिर्यादी) यांनी त्याला फोन लावला. पण फोन उचलला गेला नाही. त्यानंतर मामेभाऊ सतीश निवृत्ती मोटे यांनी फिर्यादीस कळवले की सूरजने यावलखेड, गुडधी येथील रेल्वे पटरीवर आत्महत्या केली आहे. तत्काळ जीएमसी अकोला येथे धाव घेतली असता सूरज मृतावस्थेत आढळून आला.

### बुद्ध आणि धर्म ग्रंथ वाचल्यामुळे मनाला शांती मिळते

कान्हेरी: 'बुद्धआणित्याच्या धम्म' ग्रंथ वाचल्यामुळे मनाला शांती मिळते. या पवित्र धम्म ग्रंथाचा मूळ गाभा पूर्वज कुळ जन्म आणि असित मुनीचे आगमन, या विषयावर राहुल इंगळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कान्हेरी गवळी येथील विश्वज्योती बुद्ध विहारात सुरू असलेल्या' बुद्ध आणि त्यांच्या ग्रंथ पठण कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभा अकोल्यासह बाळापूर तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांनी भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाबाई व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पुतळ्याला पुष्प धूप दिप देऊन पूजा केली. ग्रंथ वाचक कमलेश तेलगोटे, सुनील तेलगोटे, संतोष सिरसाट, गौतम सिरसाट यांच्या प्रमुख पाहुण्यांनी सत्कार केला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे ता. अध्यक्ष राहुल वानखडे, दादाराव वानखडे, पं.स. सदस्य निलेश इंगळे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी अरुण तेलगोटे, निशा तेलगोटे, चंद्रकला तेलगोटे, भुणाबाई तेलगोटे, सुनिता तेलगोटे यांच्यासह अनेक उपासक उपासिका यांनी परिश्रम घेतले.

## हिंदी पंधरवड्यानिमित्त अकोल्यात राज्यस्तरीय कवि संमेलनाचे आयोजन

### प्रसिद्ध कवींच्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध होणार

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या वतीने हिंदी पंधरवडा निमित्त एक भव्य राज्यस्तरीय कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा साहित्यिक कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता, श्री अकोला गुजराती समाज भवन, बी. आर. हायस्कूलच्या मागे, अकोला या ठिकाणी होणार आहे.

या कवि संमेलनात राज्यभरातील ख्यातनाम कवींनी आपल्या रचना सादर करून रसिकांची मनं जिंकण्याची तयारी केली आहे. विशेष म्हणजे, प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आलेला असून सर्व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर ॲड. आशिष शेलार मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य, हे आहेत तर उपस्थित कवीगण पुढीलप्रमाणे आहेत प्रा. घनश्याम अग्रवाल, डॉ. रामप्रकाश वर्मा, डॉ. प्रमोद शुक्ल, डॉ. शैलेन्द्र दुबे, डॉ. दीपक मोहले, श्री. अभिषेक जैन, श्री. हितेश सोनी, श्री. दत्ता शेळके, श्री. प्रशांत असनारे, प्रा. नारायण कुळकर्णी–कवठेकर, डॉ. पूनम मानकर पिसे, श्री. सुनील देशपांडे, श्री. महेश शुक्ल, श्री. महेंद्र मालवीया, श्री. सतीश वाडेकर तसेच श्री. सुरेश लालवाणी यांच्या कवितांचे सादरीकरण रसिकांसाठी आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमाचे संचालन श्री. कृष्ण कुमार शर्मा हे करणार आहेत कार्यक्रमाचे संयोजक श्री. श्याम पी. शर्मा आणि श्री. विजय जानी हे असुन कार्यक्रमाचे निमंत्रक श्री. सचिन निंबाळकर डॉ. किरण कुलकर्णी (भा.प्र.से.) – सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन सहसंचालक व सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी हे आहेत अधिक माहितीसाठी मो ह्या नंबर वर ०२२–२२६७२५३८, ारहरीरहळींूं.ीस संपर्क साधावा

## रिंग रोड परिसरात निघाली भव्य भागवत कलश शोभायात्रा

### भागवतची रचना जगत कल्याणसाठी– पु शिवदत्त महाराज

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

भागवत हे अनादी काळापासून सकल प्राणिमात्रांवर कृपा वर्षाव करीत आहे.या भागवत ची रचनाच मुळी भगवंताने जगत कल्याणसाठी केली असून भक्तांनी आपल्या समवेत इतर प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी पावन भागवतचे नित्य श्रवण करून जीवन सफल करण्याचा हितोपदेश पु सद्‌गुरुदेव सुधांशु महाराज यांचे शिष्य आचार्य,पु शिवदत्त महाराज यांनी केला. पितृपक्षाच्या पावन पर्वावर पितृसेवा भागवत कथा आयोजन समितीच्या वतीने रविवार पासून रिंग रोड येथील जानोरकर मंगल कार्यालयात सात दिवसीय श्रीमदब भागवत व किर्तन उत्सव प्रारंभ झाला.यात पु शिवदत्त महाराज भागवतचे प्रथम पुष्प गुंफत होते.यात त्यांनी भागवतची आवश्यकता या पितृ पक्षात का आहे याचे सुंदर विवेचन केले.दरम्यान कथा प्रारंभी सकाळी जानोरकर मंगल कार्यालय पासून टेलिफोन कॉलोनी परिसर पर्यंत भव्य ग्रंथ दिंडी व कलश शोभायात्रा काढण्यात आली.यात



पीत वस्त्र धारण केलेल्या मातृशक्तीनी डोक्यावर कलश धारण करीत यात सहभाग घेतला.यात ढोल ताशा व भजनी मंडळांनी सहभागी होऊन रामकृष्ण च्या गजराने संबंध रिंगरोड निनादून गेला होता. आकर्षक रथात पु शिवदत्त महाराज यांनी विराजमान होऊन कथा यजमान यांनी डोक्यावर भागवत ग्रंथ धारण करीत ही शोभायात्रा परत जानोरकर मंगल कार्यालयात विसर्जित करण्यात आली.या नंतर सामूहिक आरती होऊन दुपारी भागवत कथा सत्र प्रारंभ झाले.या उत्सवात पं अभिषेक तिवारी खामगाव व पं विमल व्यास यांच्या मार्गदर्शनात २७ यजमानाचे आपल्या कुटुंब प्रमुखांच्या स्मृतीत पोथी वाचन ठेवले असून यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दि २० सप्टेंबर पर्यंत नित्य दु २ ते साय ५ वाजेपर्यंत भागवत कथा होणार असून रात्री ८ वाजता निरनिराळ्या कीर्तनकारांचे भव्य कीर्तने होणार आहेत. याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या उत्सवात समितीचे अध्यक्ष रामलाल अग्रवाल, कार्याध्यक्ष मनोहरराव खरापकार, वरीष्ठ उपाध्यक्ष पुरुषोत्तम वानखडे, उपाध्यक्ष प्रदीपसिंह गौर,दिगंबर सपकाळ,विक्रम जानोरकर,सचिव विश्वजित सिसोदिया, सहसचिव सुधाकर फुलारी, कोषाध्यक्ष जगदीश जोशी, सहकोषाध्यक्ष संजय भारसाकळे, सल्लागार अंबादास चुकेवार, श्यामलाल अग्रवाल,सदस्य रामेश्वर सुरते, विनायकराव टेकाडे,रामदास बोरोडे, अशोक बोरकर, प्रकाश चिकार, गणेशराव वळतकर वैभव माळी, मधुकर लंगोटे,विलास अनासने, सुधाकरराव फुलारी, कुलदीपसिह ठाकूर,भालचंद्र सुरते,महिला समितीच्या सौ विद्या जोशी सहभागी झाले होते.

## लोक अदालतमध्ये १० हजार ९८१ करणांपैकी ४ हजार ३०६ प्रकरणे निकाली

**अकोला :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक १३ सप्टेंबर रोजी जिल्हयातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच कामगार न्यायालय, सहकार न्यायालय,कौटुंबीक न्यायालय, औद्योगिक न्यायालय व जिल्हा ग्राहक तकार आयोग, अकोला येथे राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन करण्यात आले.अकोला जिल्हयातील सर्व न्यायालयात प्रलंबित प्रकरणापैकी एकूण १०,९८१ प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतमध्ये तडजोडीकरीता ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकुण १,६५९ प्रलंबित प्रकरणात व एकुण २६४७ दाखलपूर्व प्रकरणात समेट घडुन आला. अशी एकुण ४,३०६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

यामध्ये मुख्यत्वे दिवाणी, फौजदारी, वैवाहीक बाद स्वरूपाची तसेच मोटार वाहन अपघात प्रकरण व कलम १३८ एन. आय. ॲक्ट आणि ग्रामपंचायतचे घरपट्टी/पाणीपट्टी तसेच महावितरण व बँकांची खटलापूर्व प्रकरणात तडजोड होउन रक्कम रूपये ३५ कोटी ०८ लक्ष ५६ हजार २३० रूपये ची तडजोड झाली. महत्वाची बाब म्हणजे दिव्यांग पक्षकाराकरिता पॅनल प्रमुख मा. जिल्हा न्यायाधीश श्रीमती एस. आर. पहाडे, व सदस्य त्याचे गाडीजवळ जवळ जाउन आपसी समेट घडवून आणला. या पक्षकाराचा रोपटे देउन एस. बी. कचरे अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अकोला, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव/न्यायाधिश आर. एन. बंसल व इतर माननीय न्यायाधीशांनी त्या पक्षकाराचे अभिनंदन केले. लोक न्यायालय यशस्वी होणेकरीता एस. बी. कचरे अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अकोला यांचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हयात कार्यरत सर्व न्यायाधिश, न्यायालयीन कर्मचारी, वकील वृंद यांचे योगदान लाभले.

## बुधवारी बौद्ध महासभेच्या वतीने बौद्ध स्थळे मुक्तिसाठी जन आक्रोश आंदोलन

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

देशात अनेक वर्षापासून बौद्ध समाजावर विविध कारणाने अन्याय अत्याचार केल्या जात आहे.देशातीलच नव्हे तर जगातील बौद्ध धर्मियांचे पवित्र स्थळ असणारे बिहार राज्यातील महाबोधी महाविहार हे अन्य धर्मियांच्या जोखडात असून त्यांच्या मर्जीने व बौद्ध धर्माला सोडून कारभार केल्या जात आहे.त्याचप्रमाणे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी मध्यप्रदेश राज्यातील महू स्थान हे बुद्धांच्या नियंत्रणात नाही.

त्याचप्रमाणे लाखो बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असणारी नागपूरची दीक्षाभूमी ही अपवित्र केल्या जात असून दीक्षाभूमीचा कारभार ही वेगळ्या पद्धतीने चालविल्या जात आहे बौद्ध धर्मीयांचे हे तिन्ही श्रद्धास्थान असणारे क्षेत्र बौद्धांच्या ताब्यात देऊन ते मुक्त व्हावेत यासाठी भारतीय बुद्ध महासभेच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर जन आक्रोश आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भारतीय बौद्ध महासभेचे अकोला जिल्हाध्यक्ष पी.जे.वानखडे यांनी दिली. रविवारी अशोक वाटिका सभागृहात संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा महासचिव नंदकुमार डोंगरे,कोषाध्यक्ष विजयकुमार जाधव,रमेश गवई गुरुजी,संजय गवई,पंचशील गजघाटे आदी उपस्थित होते.वरील विषया अन्वये बौद्ध समाजाच्या न्याय हक्कासाठी बुधवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता अशोक वाटिका येथून जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंत जन आक्रोश आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे.राष्ट्रीय स्तरावरील हे जन आक्रोश आंदोलन देशभरातील सर्व मंत्रालय व प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयावर एकाच वेळी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.बौद्धांचे जागतिक श्रद्धास्थान व जेथे भगवान बुद्धांना बुद्धत्व प्राप्त झाले, त्या बुद्धगयातील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे (१८९१) आद्य प्रणेते अनागरीक धम्मपाल यांच्या जयंती दिनानिमित्त तसेच दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे द्वितीय राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती दिनानिमित्त महाबोधी महाविहार बोधगया मुक्ती, महू जन्म भूमी.

## मधुवत्सल गोसेवा केंद्रात भव्य सामूहिक श्राद्ध, तर्पण व पिंडदान सोहळ्याचे आयोजन

### पितृपक्षानिमित्त मोफत धार्मिक विधी नोंदणी सुरू

▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :

अखिल विश्व गायत्री परिवारच्या अंतर्गत पितृ पक्षाचे औचित्य साधून, यावलखेड रस्त्यावरील मधुवत्सल गोसेवा केंद्रात रविवार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता मोफत सामूहिक श्राद्ध, तर्पण व पिंडदान संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन आचार्य डॉ. सुरेश राठी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, पितृ दोष निवारण व आयुष्य, पुत्र, यश, कीर्ती, बल, लक्ष्मी, सौख्य, धन, पशु व धान्य प्राप्तीसाठी हे धार्मिक विधी करण्यात येणार आहेत. या मोफत सोहळ्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून, इच्छुक साधकांनी खालील स्वयंसेवकांशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे – हभप तुलसीदास महाराज मसने,



गिरीश तोष्णीवाल, ओमप्रकाश गावंडे, मधुसूदन अग्रवाल, भरत मिश्रा, सुनील करनानी, अनिल शिंदे, सुनील कांबळे, जानराव वानेटकर, रामभाऊ आदनाक, रमेश चांदुरकर, विजय सांगळे, नरहटे गुरुजी, राजूभाऊ वानखडे, संतोष काजे, मधुकरराव गावंडे, रमेश मुरूमकर, पुरुषोत्तम पागृत, गोविंदराव गावंडे.. पितृपक्ष हे आपल्या पूर्वजांचे स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचे पवित्र पर्व आहे. या धार्मिक आयोजनाचा लाभ घ्यावा.

## राष्ट्रीय लोक अदालतीत १ कोटी ८८ लाखाची वसुली

**अकोट:** अकोट येथे दिनांक १३/०९/२०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले.बी.एम. पाटील जिल्हा न्यायाधीश - १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती अकोट यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या लोक अदालतीमध्ये एकूण ०४ पॅनल ठेवण्यात आले.यावेळी दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात प्रकरणे,बँकेची प्रकरणे,दाखलपूर्व प्रकरणे,दाखलपूर्व बँकेचीप्रकरणे, एम.ए.सी.बी.बि.एस.एन. ग्रामपंचायतचे घर टॅक्स,पाणीपटटीची व घरकुलाची प्रकरणे ठेवण्यात आली.

यावेळी पॅनल प्रमुख म्हणून बी. एम. पाटील जिल्हा न्यायाधीश- १ अकोट एम. एस. काळे दिवाणी एम.एस.काळे न्यायाधीशव.स्तर अकोट, आरिफ हारुन शेख, सह दिवाणीन्यायाधीश क. स्तर अकोट तसेच ए.ए. माळी २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर अकोट यांनी काम पाहीले.विधीज्ञ म्हणून ए.एस. वडाळकर, जी. आर. पानझडे, सुमित सांगोले आणी श्रीमती व्ही. ए. वानखडे यांनी सहकार्य केले. तसेच समाजसेवक विजय जितकर व विधी स्वयंसेवक पंत मॅडम यांनी सहकार्य केले.सदरहू लोक अदालतीमध्ये एकूण १४५ दिवाणी व फौजदारी प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

## आरोग्य मंत्र्याच्या निर्देशानंतरही सर्वोपचार परिसरात अस्वच्छता

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**

आरोग्य आबिटकर अकोला येथे असताना मंत्री देखील दुर्गंधीयुक्त रुग्णालय परिसर. थुंकीच्या खुणांनी विद्रूप झालेल्या भिंती होत्या. रुग्णालय प्रशासनाने स्वच्छतेचे कंत्राट स्मार्ट कंपनीला दिले आहे. परंतु स्मार्ट कंपनी फक्त नावालाच असून देखावा करून स्वच्छता करत आहोत असे दाखवले जाते. प्रत्यक्षात रुग्णालयाच्या आत मधील वार्डात अस्वच्छता दिसते, असा आरोप रुग्ण व त्यांच्यानातेवाईकांकडून केला जात आहे. रुग्णालय परिसरात जैविक कचरा कुजत पडलेला असूनत्यामुळे रुग्णालयात दुर्गंधी पसरली आहे. वॉर्ड मधील खिडक्या लाल गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी विद्रूप झालेल्या आहेत. या गंभीर प्रकाराकडे आहे.प्रशासनाचे दुर्लक्ष स्वच्छतेच्या कामावर लाखो रुपयाचा खर्च प्रशासन करत आहे परंतु स्वच्छता केल्याचे फक्त फोटो काढून वरिष्ठ अधिकाऱ्यांना व शासनाला दाखविले जातात. स्वच्छता चांगल्या प्रकारे



केली जात नाही. रुग्णालयात पर्मनंट सफाई कर्मचारी व स्मार्ट कंपनीचे स्वच्छता कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल परिसरात टाइमपास करताना दिसतात. काही जण मोबाईल मध्ये व्यस्त राहतात. याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

## अकोला शहरात डेंगू-चिकनगुनियाचा कहर; रुग्णालये भरली

### मनपा प्रशासनावर कारवाईचा दबाव-निलेश देव यांची तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**

अकोला शहरात सध्या डेंगू व चिकनगुनियाच्या साथीचा गंभीर प्रादुर्भाव झाला असून, आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण आला आहे. शहरातील जवळपास सर्वच दवाखाने रुग्णांनी गच्च भरले असून, १०० टक्के खाटा व्यापलेल्या आहेत. खाजगी तसेच सरकारी दवाखाने रुग्णांनी फुल्ल असून, नागरिकांना उपचारासाठी जागा मिळणेही कठीण झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून डासांच्या प्रचंड वाढलेल्या उत्पातामुळे आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. पावसाळ्यामुळे साचलेल्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने डासांच्या प्रजननाला खतपाणी मिळाले आहे. परिणामी शहरातील जवळपास प्रत्येक प्रभागात डेंगू व चिकनगुनियाचे रुग्ण आढळून येत आहेत.या परिस्थितीतही अकोला महानगरपालिका यंत्रणा ठोस पावले उचलताना दिसत नाही. शहरातील अनेक भागांत गटारे साफ न झाल्या



मुळे व पाणी साचल्यामुळे डासांची पैदास वाढली आहे. नागरिकांना जंतुनाशक फवारणी व नियमित स्वच्छता मोहीम न झाल्याची तीव्र खंत आहे.या गंभीर पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक निलेश देव यांनी आज पत्रकारांशी बोलताना संताप व्यक्त केला. विशेष आरोग्य ड्राईव्ह राबवून ताप असलेल्या नागरिकांची तपासणी करून त्वरित औषधोपचार करण्यात यावेत. मनपाच्या आरोग्य योजना तातडीने सक्रिय करून मोफत तपासणी व औषधोपचार उपलब्ध करून द्यावेत.सध्या जवळपास प्रत्येक कुटुंबात एखादा तरी सदस्य तापाने त्रस्त असल्याचे चित्र आहे. खाजगी रुग्णालयांत मोठ्या प्रमाणावर गर्दी असून खर्च परवडणारा नाही. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांवर उपचाराचा प्रचंड आर्थिक भार पडत आहे.

काही प्रकरणांत गंभीर रुग्णांना नागपूर, अमरावतीकडे हलवावे लागत आहे.जर महानगरपालिका व आरोग्य विभागाने तातडीने कठोर उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिकांचा संताप उसळेल. प्रशासनाच्या निष्क्रियतेला जनता जबाबदार धरेल. परिस्थिती हाताबाहेर गेली तर मनपाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा निलेश देव यांनी दिला.

## शहरात पावसाने अकोलेकर गारेगार....

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**

शहरात विश्रांती घेतलेल्या पावसाचे दुपारी सुमारे अर्धातास, रात्री विजांच्या कडकटासह आगमन झाले. ग्रामीण भागातही जोरदार पाऊस झाल्याने शेतात पाणी साचले. बाळापूर तालुक्यात अनेक ठिकाणी पाऊस झाल्याने शेत जमिनीला तलावाचे स्वरुप झाले. दगडपारवा प्राप्त प्रकल्पातून विसर्ग केला. दरम्यान जिल्ह्यात पुढील चार दिवस पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाच्या नागपूर कार्यालयाकडून प्रादेशिक वर्तवला. आज सकाळी देखील शहरात पाऊस पडला. दरम जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी विजांच्या कडकडाट, ढगांच्या गडगडाटासह दीड ते दोन तास धुवाधार बरसलेल्या पावसामुळे अकोलेकरांची धांदल उडाली होती. दुपारी चारच्या सुमारास आकाशात ढग भरुन आले आणि तासभर पाऊस झाला. अर्ध्या तासाच्या



विश्रांतीनंतर पुन्हा साडेपाच ते सायंकाळी सात असा दीड तास जोरदार पाऊस कोसळला होता. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात रिमझिम का होईना पाऊस हजेरी लावली. मात्र काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली. उकाडाही वाढला होता. पारा ३२ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नोंदवला. अखेर शुक्रवारी शुक्रवारी आगमन झालेल्या पावसाने शनिवारीही हजेरी लावली. हातरुण शिवारात असे पाणी साचले होते. शनिवार, रविवार सलग दोन दिवस पावसाचे आगमन झाले.बाळापूर शहर व तालुक्यात पाऊस झाला. रात्री ८ वाजताच्या सुमारास शहरात विजांचा कडकडाटासह पाऊस सुरू झाला. रात्री उशिरापर्यंत कधी रिमझिम तर कधी जोराचा पाऊस पडणे सुरु होते. दगडपारवा प्रकल्प १०० टक्के भरला शनिवारी सकाळी दगडपारवा लघु प्रकल्पाची पाणी पातळी ३१७.२०० मी. असून, त्याचा साठा १०.१९ द.ल.घ.मी. झाला आहे. प्रकल्प १०० टक्के भरला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असून, वक्रद्वार क्र. १ व ४ हे सकाळी प्रत्येकी २० से. मी. उंचीने उघडून १६.५६ घ.मी. से एवढा विसर्ग नदीपात्राम ध्ये सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नदी काठच्या गावांतील नागरिकांनी सावध राहावे, नदी पात्र ओलांडू नये. नदीकाठावरील गावांना आपल्या स्तरावरून सतर्क करावे.

## पाणी पुरवठा देयका संबंधी आणि पाणीपट्टी कराचा भरणा करण्यासाठी विशेष शिबीराचे आयोजन

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नळ जाडणी धारकांना आपले पाणी पट्टी कर भरणे तेसच बिला संदर्भातील काही तक्रार असल्यास (ज्यामध्ये नळाच्या बिलाची दुरूस्ती, बिल जास्त आल्यास त्यावरील तक्रारी, नळ जोडणी असतांनाही बिल न येणे आदि) त्यांचे निराकरण करणे अधिक सोईचे व्हावे याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये जलप्रदाय विभागाद्वारे विशेष शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे.

यामध्ये दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत पुर्व झोन अंतर्गत रोकडे मंगल कार्यालय, महसूल कॉलोनी, प्रभाग क्रं. १२ येथे एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत पुर्व झोन अंतर्गत मनपा जुनी शाळा क्रं. १५, पुर्व झोन कार्यालय, अकोला येथे एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी त्या भागातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपला थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी देयके अदा करून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा जलप्रदाय विभागाचे कार्यकारी अभियंता केले आहे.

## थोडक्यात

### नीरजसिंग ठाकूर बॉक्सिंग स्पर्धेत विजेता



**अकोला:** अकोला, अकोला शहरातील बॉक्सिंग क्षेत्रासाठी एक अभिमानास्पद आणि ऐतिहासिक कामगिरी नीरजसिंग ठाकूरने केली आहे. तामिळनाडूतील पुदुच्चेरी येथे झालेल्या राष्ट्रीय प्रोफेशनल बॉक्सिंग स्पर्धेत, त्याने देशात नववे स्थान पटकावत अकोल्याचे नाव उंचावले आहे. त्याच्या या यशाने क्रीडा प्रबोधिनी आणि संपूर्ण अकोला शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.वसंत देसाई क्रीडा मैदानातील क्रीडा प्रबोधिनी, जेथे अनेक युवा बॉक्सर सतीशचंद्र भट यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाले, त्या परंपरेत नीरजसिंगने आणखी एक यशस्वी अध्याय जोडला आहे. अकोल्यातून व्यावसायिक (प्रो फाईट) बॉक्सिंगमध्ये प्रवेश करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे, ज्यामुळे त्याने एक नवीन मापदंड स्थापित केला आहे. या स्पर्धेतील लढतीत, नीरजसिंगने आपल्या प्रतिस्पर्धकावर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. सहा फेऱ्यांच्या रोमांचक सामन्यात, त्याने पाच फेऱ्या जिंकून आपले कौशल्य आणि ताकद सिद्ध केली. हा विजय त्याच्या कठोर परिश्रमाचे आणि समर्पणाचे प्रतीक आहे. २४ ऑगस्ट रोजी झालेल्या लढतीत त्याने यश प्राप्त केले. जिल्हा क्रीडा प्रबोधिनीचा निरजसिंग खेळाडू आहे. त्याला जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, तेजस पाटेकर यांचे मार्गदर्शन लाभले. निरजसिंग यांना यापूर्वी झालेल्या स्पर्धेत अनेक पुरस्कार मिळाले आहेत. बॉक्सिंग मध्ये उत्तम यश प्राप्त करून अकोला जिल्ह्याला लौकिक मिळवून देण्याचा त्यांचा मानस आहे. 'आपल्या या यशाचे श्रेय नीरजसिंगने नम्रपणे त्याचे आई-वडील आणि विशेषतः त्याचे मार्गदर्शक तेजस पटेकर यांना दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि आशीर्वादांमुळेच हे यश संपादन करणे शक्य झाले, असे त्याने सांगितले. नीरजसिंगची ही कामगिरी नवोदित बॉक्सरसाठी प्रेरणादायी असून, अकोल्याच्या बॉक्सिंग परंपरेला आणखी बळकटी देणारी आहे. तामिळनाडू पुडुचेरी येथे झालेल्या राष्ट्रीय प्रोफेशनल बॉक्सिंग फाईट नाईट मध्ये अकोल्याचा आतापर्यंतचा एकमेव प्रोफेशनल बॉक्सिंग पटू निरजसिंग मंगलसिंग ठाकूर यांनी सहा फेरीच्या लढतीत पाच फेरी जिंकून विजेतेपद पटकावले.

### भाजपा महिला आघाडीचे निषेध आंदोलन!

**अकोला** - मातृशक्ती अपमान करण्याची परंपरा काँग्रेसची असून राहुल गांधी यांनी आणित्यांच्या सहकार्यांनी पंतप्रधान यांच्या आईचा अपमान आम्ही सहन करणार नाही, अशा शब्दात भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध आंदोलन करून काँग्रेस आणि त्यांचे सहकारी तेजस्वी यादव, उभाठा, सेना निषेध व्यक्त केला.संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोटेकर, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, जयंत मसने, विजय अग्रवाल, सुमन गावंडे, कुसुम भगत, वैशाली निकम, चंदा शर्मा, जयश्री फुंडकर, राधा तिवारी, रूपाली काकड, गीतांजली शेगोकार, वैशाली शेळके, मोनिकागावंडे यांच्यानेतृत्वात खुलेनाट्यगृह चौकात निदर्शने करून राहुल गांधी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.या आंदोलनात मातृशक्तीने खासदार राहूल गांधी यांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत काँग्रेस आणि राहूल गांधी यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. या आंदोलनात भाजपच्या महिला आघाडीतून सर्व पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी महानगर अध्यक्षा वैशाली शेळके, चंदा शर्मा, जिल्हाध्यक्ष जयश्री फुंडकर, सुमन गावंडे, सुनीता अग्रवाल, रश्मी कायंदे, रंजना विंचनकर, छाया मिश्रा, ज्योती शर्मा, रविता शर्मा, ज्योती मानकर, राखी तीहिले, वंदना पंचोली, संध्या लोहकरे, आरती घोगलीया, अनिता चौधरी, अनिता गिरी, जान्हवी डोंगरे, शकुंतला जाधव, प्रणिता सम रीतकर, जयमाला खेडकर, चंदा ठाकूर, मनिषा भन्साली, सारिका जयस्वाल, वर्षा गावंडे, गीतांजलजी शेगोकार, साधना येवले, संगीता जानोरकर, भाग्यश्री मापारी आदींच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने मातृशक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## खडकीच्या महसुल कॉलनीतील विहीरीवर जाळी बसवणे आवश्यक

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**

खडकी विभागात असलेल्या न्यू महसुल कॉलनीमध्ये मोठी विहीर ही उन्हाळ्यात रहिवाशांना वापरासाठी उपलब्ध असते. विहीरीमध्ये परिसरातील लोकांनी पुर्वी गणपती, देवी विसर्जन केल्याने विहीरीत प्रचंड गाळ निम र्ण झालेला आहे. येथील चारही माजी नगरसेवकांना वारंवार सांगीतले परंतू त्यांनी जाणून बुजून दुर्लक्ष केले असा आरोप आहे. ग्राम पंचायत होती तेंव्हा सरपंच, सदस्य लगेच धावून यायचे व समस्या मार्गी लावायचे. जेंव्हापासून महानगर पालिका झाली विकास काम 'शुन्य' आहे. येथे नाल्या नाहीत, रोडवर खड्डेच खड्डे पडलेले आहेत. खांब्यावर लाईट नाहीत व नळयोजना ग्राम पंचायतने टाकलेल्या पाईपलाईनद्वारे सुरु आहे. सर्वांचे



पाणी झाल्यावर आमच्या १५ ते २० घरांना शेवटी नळाला पाणी येते व दरवर्षी उन्हाळ्यात येथील महिलांना पाण्यासाठी पान २ वर पायपीट करावी लागते, म्हणून ही विहीर सोयीची आहे. परंतु विहिरीची सुरक्षितता म्हणून त्यावर जाळी बसवावी अशी मागणी केली जाते आहे. विहीर ४० फुट खोल असून त्यामध्ये ३० फुट जवळपास गाळच असावा. महानगर पालिकेला विहीरीतील गाळ काढून देण्याबाबत व विहीरीवर जाळी बसविण्याबाबत विनंती केली.

## पी एम श्री जिल्हा परीषद उच्च प्राथमीक मुलांची शाळा सोनाळा येथे संतगाडगेबाबा सेवा समिती कडुन शिक्षकाचा संत्कार



**▪हिवरखेड,दि १४ (प्रतिनिधी) :**

संत गाडगेबाबा सेवा समीती कडुन शिक्षक दिनाचे औचीत्य साधुन बुलढाणा जिल्हातील नामाकींत आदर्श शाळा शोभनारी पि.ऐम श्री जिल्हा परीषद मराठी ऊच्च प्राथमिक मुलांची शाळा सोनाळा येतील शाळेतील विद्यार्थी पट संख्या चारशेचेवर असून आजचा विद्यार्थि हा ऊद्याचा भारताचे भवीष्य घडवीनारा आहे चांगली शिक्षण प्रणाली राबनारी शाळा म्हनुन नावलौकीक असलेल्या शाळेचे शिक्षक हे खरोखर विद्यार्थासाठी छडी लागे छम छम वीद्या येई घमघम असे मनलावून शिकवनारे शिक्षक आजच्या या मोबाइल यूगात कॉनवेन्ट सस्कृती पेक्षा चागंली शाळा जिल्हापरीषद च्या मराठी शाळाच आहेत शिक्षकाना शासनाकडुन नको तितके कामे सागुन ठेवुन त्याच्यामनावरील तान कमी व्हावा ह्या हेतुने त्यांना ही समाजाकडुन काही देने लागते हि सस्कृती जपत त्यांचा सत्कार करताना प्रमुख अतीथी म्हनून बोलताना गाडगेबाबा सेवा समिती हिवरखेडचे बाळासाहेब नेरकर कार्यक्रम प्रसंगी बोलले या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष शंकरराव कान्डेलकर, केद्र प्रमूख भिमराव वानखडे कर्मयोगी श्री संत गाडगे महाराज जयंती उत्सव समिती अध्यक्ष गोपाल केनेकर प्रकाश पिंजरकर गणेश गोतमारे आयोजक मुख्याध्यापक कु शिला ज्यंबकराव बोपटे ह्या होत्या प्रथम मान्यवराकडुन वैराग्यमुर्ती गाडगेबाबा शिक्षक सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे प्रतीमा पुजन करन्यात आलेत यावेळी सर्व शाळेतील सर्व शिक्षकाचा हिवरखेड संतगाडगेबाबा सेवा समिती हिवरखेड व सोनाळा येथील गाडगेबाबा जयती ऊत्सव समीती कडुन केद्र प्रमुख भिमराव वानखडे मुख्याध्यापक कु शिलाताई बोपटे, मेघा बाळकृष्ण बगाडे, विजय पातुर्डे, निलेश घाटोळ मोहन बोदडे विवेक ननीर संदींप कचाले आदि उपस्थित होते.

## श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे सायबर सुरक्षा या विषयावर कार्यशाळा संपन्न



**▪तेल्हारा,दि १४ (प्रतिनिधी) :**

श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांसाठी ऑगस्टला ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेमध्ये ८ ते १० चे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यशाळे करिता शंकरलाल खंडेलवाल म हाविद्यालयाच्या सायबर वॉरियर साक्षी फाटकर आणि हर्षा बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटच्या चुकीच्या वापरा मुळे सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहेत या विषयावर त्यांनी महत्त्वाची माहिती सांगितली या विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटचा चुकीचा वापरामुळे म्हणजे की मोबाईल मध्ये व्हाट्सअप इंस्टाग्राम फेसबुक तसेच मोबाईल म ध्ये गेम खेळल्यामुळे वाईट परिणाम कसे होतात हे वेबसाईटच्या माध्यमातून फसवणूक कशी होते आणि आपण यापासून कसे सुरक्षित रहावे. याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले त्यांनी विद्यार्थ्यांना सेटिंग सांगितले जसे की टू स्टेप वेरिफिकेशन आणि तू फॅक्टर अर्थेंतिफिकेशन करावे सर्टिफिकेट असलेल्या वेबसाईटला विजिट करावे अशा प्रकारे विद्यार्थ्यांना सुरक्षित सांगितल्या विद्यार्थ्यांना काही शंका होत्या तेही त्यांनी दूर केले.

तसेच श्री शिवाजी हायस्कूल तेल्हाराचे प्राचार्य श्री व्हि. जी.गावंडे यांच्या परवानगीने ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेमध्ये विद्यालयातील प्राचार्य श्री व्हि. जी.गावंडे आणि सर्व टिचर स्टाफ उपस्थित होते. हे कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाचे प्राचार्य डॉक्टर जे .एम. साबू सर समन्वयक डॉक्टर दीप्ती पेठकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली व क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल यांच्या सहाय्याने आणि तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पातुर येथे राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ७५ प्रकरणांचा निपटारा




**▪पातुर,दि १४ (प्रतिनिधी) :**

पातुर येथील न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये एकूण ७५ प्रकरणांचा निपटारा करून न्यायालयीन तोडगा काढण्यात आला. या माध्यम ातून पक्षकारांमध्ये ३१ लाख ४४ हजार २६१ रुपयांची तडजोड साधली गेली. त्यामुळे अनेक वाद, गुन्हे व प्रकरणे परस्पर संमतीने मार्गी लागून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.या राष्ट्रीय लोक अदालत प्रक्रियेसाठी न्यायाधीश पी. एस. ठाकरे व न्यायाधीश संदीप मोरे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. त्याचबरोबर पोलीस अमलदार मोहम्मद नियाज (पोलीस स्टेशन पातुर) व पोलीस अम लदार राजेश चव्हाण (पोलीस स्टेशन चांन्नी) यांनी कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यालयीन कामकाजात विठ्ठल खोटरे, संतोष ठाकरे, अमित म धळकर, सुनील इंगळे, वैभव इंगोले, देविदास भिरड, विशाल वाहने, शेषराव गोतरकर, रवी मसने यांनी परिश्रम घेतले. तसेच कायदेशीर मार्गदर्शनासाठी ॲड. भारती देशमुख व ॲड. महेंद्र मृग यांनी विशेष योगदान दिले.राष्ट्रीय लोक अदालतच्या माध्यमातून अल्पावधीत परस्पर संमतीने अनेक प्रकरणांचा निपटारा झाल्याने पक्षकारांना दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेपासून दिलासा मिळाला. ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करत न्यायालयीन अधिकारी, कर्मचारी व वकील यांच्या कार्याचे कौतुक केले.


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्री**कृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# दे भाषण, घे राशन!

हा लेख केवळ स्वतः ला आंबेडकरवादी समजून चळवळ मीच करतो, गावात पोस्टमनला घर जरी सापडत नसेल तरीही राष्ट्रीय अध्यक्ष मीच असतो, स्वतः स्मशानाच्या दिशेने वाटचाल करणारे पण तरुणांना नेतृत्व न देणाऱ्या, कार्यक्रम कोणताही असो अध्यक्ष मीच असायला पाहिजे, अध्यक्षाच्या नावाला चिटकून बसणाऱ्या स्वंयघोषित आंबेडकरवादी नेत्यांसाठी आहे. आज एकही नेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने मार्गक्रमण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित काम करत नाही. जर जो व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काम करत नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अंगिकारून विचारावर चालत नाही त्याला आंबेडकरवादी कसे म्हणायचे?

---------------

चळवळ किंवा नेता म्हणजे केवळ दे भाषण घे राशन हा कार्यक्रम मुळीच नाही. भाषण देऊन भाषणाचे पैसे घेऊन, चळवळीच्या नावाखाली पिडीत व्यक्तीच्या बाजूने उभे राहण्याचे नाटक करून मांडवली करून स्वतः चे घर भरणारे लोक कोणत्या दृष्टीने आंबेडकरवादी आहेत हाच प्रश्न आहे.

भाषण, चळवळ, आंदोलन, परिवर्तन शब्द वापरून स्वतः कडे पैसा गोळा करणे, पैशाचा हिशोब न देणे, जनतेला भावनिक बनवून पैसा घेणे, त्या पैशावर अय्याशी करणे, निवडणूक काळात लाचार होऊन कोणाचेही गुणगान गाने अशा लोकांना आंबेडकरवादी तर सोडा पण यांना बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा तरी अधिकार आहे का? हा प्रश्न जनतेच्या मनात आहेत.

निळा रुमाल गळ्यात टाकून अनेक राष्ट्रीय अध्यक्ष तयार झाले, कोणी कट्टर आंबेडकरवादी तर कोणी बहुजन नेता म्हणून स्वतःच मिरवत आहेत. या राष्ट्रीय अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय आध्यक्षांची ताकत एवढी आहे की ते स्वतः च्या व स्वतः च्या संघटनेच्या नावावर ग्रामपंचायतचा सदस्य सुद्धां निवडून आणू शकत नाहीत. तरीही प्रत्येक नेत्याने चार पाच भक्त मंडळी चहापाण्यावर पाळलेली असतेच.

प्रत्येक भक्तांना वाटतं आमचा नेता म्हणजेच चळवळ, आमचा नेता म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसदार, आमचा नेताच सत्ता परिवर्तन, व्यवस्था परिवर्तन करू शकतो, आमचा नेताच संविधानाचे रक्षण करू शकतो अशी भक्तांची मानसिकता आहे. बर भक्त यावरच थांबत नाही ते याही पुढे जाऊन बोलत आमच्या नेत्याचा समाजासाठी त्याग खुप मोठा आहे. आता भक्तांना अक्कल नावाची गोष्ट नसते म्हणून त्यांना नेता सोडून काहीच दिसत नाही.

नेत्याचा समाजासाठी काय त्याग आहे हे आपण बघितले तर कोणतेही काम न करता घरखर्च चालवणे, गाडीने फिरणे, आणि भक्तांना चहापाण्यासाठी खर्च करणे हा पैसा नेमका कोणत्या त्यागातून येतो. आयुष्यभर मरमर काम करणाऱ्या कष्टकऱ्यांना, नोकरी करणाऱ्या नोकरददारांना मुलांचे शिक्षण, घर आणि गाडी घेणे जिवनातील सर्वात मोठे यश मानले जाते. तेथे अध्यक्ष लोक कोणतेही काम धंदा न करता आपला उदरनिर्वाह कसा करतात? दिवसभर इकडे तिकडे फिरायला पैसा कुसा येतो?



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर.
जि. बुलढाणा.
9130979300

मांडवली करून, लोकांची दिशाभूल करून, लोकांना भावनिक करून स्वतः ची झोळी भरणे म्हणजे त्याग असेल तर मग बुद्धीच्या गुणवत्तेची तसापणी करणे आवश्यक आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची कमाई, स्वतः ची जवानी, स्वतः चे ज्ञान, स्वतः चा संसार सर्व काही समाजासाठी अर्पण केले.

येथील माणूस व देश मजबूत होण्यासाठी व्यवस्था निर्माण केली त्याच महान बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करणारा पोटभरु लाचार माणूस नेता सोडा पण एक वैचारिक माणूस म्हणायच्या तरी लायकीचा आहे का?

बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल तिळमात्र अभ्यास नसताना केवळ बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंदीस्त करून द्वेषात्मक मांडणी करणे, बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचा संबध सरळ एकाच जातीसोबत जोडणे म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी बेईमानी करणे होय.

काही लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहूजन समाजाचा उद्धार केला हे सांगतात खरे, संविधानाने हक्क अधिकार देऊन आम्हाला सर्वप्रकारचे स्वातंत्र्य दिले असे भाषणात बोलतात, बोलण्याचे पैसे ही खुप घेतात. आंदोलनाच्या नावाखाली समाजातुन पैसे गोळा करतात पण आंदोलन होत नाही आणि हिशोब दिल्या जात नाही.

स्वतः चे घरे भरून अय्याशी केली जाते आणि भक्त त्याला त्याग म्हणतात. एवढेच नाही तर संविधानाने आम्हाला बोलण्याचे, अभिव्यक्त होण्याचे स्वातंत्र्य दिले हे भाषणात बोलणारे लोक नेत्यांना प्रश्न विचारला तर वैयक्तिक पातळीवर येऊन तुम्हाला प्रश्न विचारण्याचा अधिकारच नाही असे असंविधानीक बोलून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान यांच्या पासून किती दुर आहेत आणि नेत्याची भक्ती करण्यात किती लाचार आहेत हेच दिसुन येते.

आजची चळवळ म्हणजे केवळ भाषण देणे, मांडवली करणे आणि स्वतः ची झोळी भरून घेणे एवढीच आहे. कारण हे फक्त बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारसदार असल्याचे नाटक करून बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात काम करतात.

बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः जवळचे सर्व काही समाजासाठी खर्च करून समाजाला शिक्षण, रोजगार, पत्रकारिता, स्वाभिमान, त्याग ह्या गोष्टी दिल्या. सर्वात जास्त पगार असुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन आर्थिक अडचणी मध्ये गेले कारण खर्च समाजासाठी होता. मग आज ज्याचे उत्पन्न शुन्य आहे त्याची आर्थिक भरभराट कशी?

या प्रश्नाचे उत्तर शोधले तर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन आज समाजात लोक लाचारी, गुलामी करून बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत बेईमानी करत आहेत. जेवढेही राष्ट्रीय (स्वंयघोषित)अध्यक्ष आहेत त्यापैकी कोणीच शिक्षण, रोजगार, पत्रकारिता, स्वाभिमान यासाठी लढत नाही किंवा सहकार्य करत नाही. प्रत्येक जन अध्यक्षासाठी नटून बसुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला संदेश पायदळी तुडवत आहेत.

तो संदेश म्हणजे शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा. जेथे अध्यक्ष संघटीतच होत नाहीत तिथे बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कसे असतील हा मुख्य प्रश्न आहे. राष्ट्रीय अध्यक्ष समजातून पैसे गोळा करत असतील, मिरवणूक, सभेसाठी पैसा खर्च करत असतील तर अशा किती अध्यक्षांनी आजपर्यंत शिक्षणासाठी, रोजगारासाठी किंवा पत्रकारिता साठी मदत केली?

शिक्षण, रोजगार आणि पत्रकारिता यावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात जास्त वेळ व पैसा खर्च केला जर आजचे अध्यक्ष खरचं बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे असतील तर त्यांचे कार्य कुठे आहे? राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेतांना स्वतःचा ग्रामपंचायत सदस्य ही नाही असे बोलले तर म्हणतात ईव्हीएम मध्ये घोळ आहे.

मान्य आहे ईव्हीएम मध्ये घोळ आहे. मग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी मदत करत नाहीत, राष्ट्रीय अध्यक्ष असले तरीही तुमच्या गावात तुमच्या विचाराचा तुम्ही पेपर सुरू करू शकले नाही तरीही तुम्ही राष्ट्रीय अध्यक्ष झालेचे कसे हेच समजले नाही.

बरं ज्या लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित वर्तमानपत्र सुरू केले त्यांना तुम्ही किती मदत केली? मदत सोडा राष्ट्रीय अध्यक्ष आहात तर किती वाचक दिले? याचे उत्तर एकही नाही. असेल तर त्या अध्यक्षापेक्षा सर्वसामान्य व्यक्ती चांगला जो विचार तरी पेरत राहतो.

अध्यक्ष चळवळ करत नाहीत ते फक्त स्वतः चे पोट भरून अय्याशी करतात तर मग चळवळ संपली आहे का? तर मुळीच नाही चळवळ आजही जिवंत आहे आणि ती चळवळ सर्वसामान्य लोक चालवत आहेत. आजही अनेक लोक स्वतः च्या उत्पन्नातील कमाई गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी देत आहेत, आरोग्यासाठी देत आहेत, बेरोजगार तरुणांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी म्हणून फुल ना फुलाची पाकळी एकत्र करून व्यवसाय उभारणी साठी प्रामाणिक व बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे वैचारिक वारसदार आपले काम करत आहेत.

हे करणारे लोक राष्ट्रीय अध्यक्ष नाहीत तर सर्वसामान्य माणसं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहेत. बरेच लोक मदत करतात आणि नावही जाहीर करत नाहीत हे खरे बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आहे. नेते तर अध्यक्ष पदासाठी एकमेकांवर चिखल फेक करून स्वतः झोळीत किती येईल हाच स्वार्थ बघत आहेत.

म्हणून जे स्वतःला राष्ट्रीय नेते समजून मीच खरा नेता आहे मीच चळवळ चालवत आहे अशा भ्रमात आहे अशा सगळ्या नेत्यांना एकच सांगणे आहे. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पायदळी तुडवून स्वतः चे भक्त तयार करणे म्हणजे चळवळ नाही, जनतेच्या पैशावर जगणे म्हणजे चळवळ नाही.

त्या साठी स्वतः जवळचे समाजासाठी खर्च करावे लागते. पण आजही नेत्याची परिस्थिती म्हणजे दे भाषण घे राशन एवढीच झाली आहे.

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

**वाचक लिहितात**

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. तरी आपल्या देशाच्या एका भागावर (हैदराबाद संस्थान) निजामाचे राज्य होते आणि तो निजाम कोणत्याही परिस्थितीत आपले राज्य भारतात विलीन करायला तयार नव्हता. किंबहुना त्याला वेगळे राष्ट्र हवे होते. आपल्या देशात स्वातंत्र्याची पहाट उजळली, पण निजामाच्या रूपाने एक काजळी मात्र राहिली होती. भारतात लोकशाही नांदण्यासाठी ही सरंजामशाही संपणे गरजेचे होते.

हैदराबाद राज्य हे इंग्रजांच्या राजवटीच्या अस्ता पर्यंत टिकून होते. उत्तर आणि दक्षिण भारतातल्या मधोमध हैदराबाद संस्थान पसरले होते. त्या संस्थांनचे स्वतंत्र राहणे म्हणजे भारताच्या एकसंधतेला कमकुवत करणारे होते. हैदराबाद संस्थानात आताचे तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटकाचे दोन जिल्हे आणि महाराष्ट्रातील आठ जिल्हे म्हणजे संपूर्ण मराठवाडा होते.

एवढे मोठे संस्थान हे निजामाच्या एकछत्री अधिपत्याखाली होते. कल्पना करा, जर हे संस्थान भारतात विलीन करून घेतले नसते, तर आज शत्रू आपल्या अंगणात असता. एकीकडे पाकिस्तानच आपल्याला डोईजड झाला आहे, तर या निजामाने काय काय गुण उधळले असते? संस्थानातील जनता भारतीय स्वातंत्र्याचाच आपण भाग आहोत असे समजत होती. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने ऑपरेशन 'पोलो' अंतर्गत तत्कालीन हैदराबाद राज्य भारतात विलीन करून घेतले. रजाकरांनी प्रचंड ताकदीने विरोध केला. मराठवाड्यातील संपूर्ण एक गावच रझाकारांनी जाळून टाकले. हैदराबाद मुक्तिसंग्रामाची अखेर पोलिस कारवाईत झाली.

निजामाची लढाई 109 तासात संपुष्टात आली. 1948 च्या 13 सप्टेंबरला 'पोलो' ऑपरेशन सुरू केले आणि 17 सप्टेंबर 1948 ला हैदराबादचा निजाम भारत सरकारला शरण आला. आणि हैदराबाद, मराठवाडा भारतात विलीन झाले .मराठवाडा मुक्ती संग्राम चे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले होते. सैनिकी ताकद आणि जनतेच्या प्रचंड विरोधामुळे जुलमी निजाम शरण आला. आणि तिथे सोनेरी पहाट उगवली.

हा राष्ट्ररक्षणाचा, राष्ट्राविषयी समर्पणाचा इतिहास आपल्या मुलांना शाळा, महाविद्यालयातून आवर्जून शिकवला तर आपल्या सैन्याविषयी, राष्ट्राविषयी त्यांच्या मनात आदरभाव वाढून, त्यांच्यात राष्ट्राप्रती समर्पणाची वृत्ती निश्चितच निर्माण होईल.

● सौ. माधवी पत्की
नागपूर.

**नेपाळच्या उद्रेकापासून बोध घेण्याची गरज**

नेपाळ या एकमेव हिंदू राष्ट्रात सत्ताधारी नेत्यांच्या भ्रष्टाचाराविरोधात तरूण एकवटले आणि दोन दिवसात नेपालची सत्ता या जेन झेड तरूणांनी उलथवून टाकली. विश्वात आजवर जे घडले नाही ते या छोट्याशा देशात घडले. केवळ धर्माच्या नावावर उभारले जाणाऱ्या राष्ट्राची काय गत होते? सर्वधर्म समभावाचा पुरस्कार हाच महत्वाचा आहे.

● विशाल बारई, नागपूर.

## बुद्ध शोपीस नाहीत...त्यांचा सन्मान करा, कचराकुंडीपासून वाचवा!



आजच्या समाजात एक वेदनादायी वास्तव दिसून येते. या बदलत्या जीवनशैलीत घराची सजावट, सौंदर्यवर्धन आणि दिखाऊपणा याला मोठे महत्त्व दिले जात आहे.

घर-सजावटीसाठी बुद्धांच्या मूर्ती मोठ्या उत्साहाने विकत घेतल्या जातात. या सजावटीत अनेकदा भगवान बुद्धांच्या मूर्तीचा समावेश केला जातो. घराच्या ड्रॉइंगरूममध्ये, बागेत किंवा ऑफिस टेबलावर बुद्धाची मूर्ती ठेवली की शांती आणि सकारात्मकता मिळेल, असे मानले जाते. दुर्दैवाने या मूर्तींच्या खऱ्या अर्थाचा, त्यांच्या आध्यात्मिक संदेशाचा विचार अनेकदा होत नाही.

शोपीस म्हणून घेतलेल्या या मूर्ती कालांतराने तुटल्या, मळकटल्या किंवा नकोशा झाल्या की त्या सरळ कचराकुंडीत टाकल्या जातात. अशा मूर्ती कचराकुंडीत टाकणे म्हणजे संस्कृतीहीनतेचे लक्षण म्हणावे लागेल. हे दृश्य अत्यंत वेदनादायी आणि अपमानकारक आहे. हा केवळ मूर्तींचा नव्हे, तर बुद्धांच्या शिकवणीचा अपमान आहे.

भगवान बुद्ध हे केवळ बौद्ध धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते संपूर्ण मानवजातीसाठी शांततेचा मार्ग दाखवणारे महापुरुष होते. भगवान बुद्ध हे शांततेचे, करुणेचे आणि समतेचे जागतिक प्रतीक असुन त्यांनी करुणा, दया, समता, मैत्री आणि अहिंसा यांचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या शिकवणींनी केवळ भारतालाच नाही, तर जगभरातील लाखो-कोट्यवधी लोकांना जीवनाचा खरा मार्ग दाखवला. त्यांची प्रतिमा ही केवळ सजावटीची वस्तू नसून जीवनातील विवेक व मूल्यांची आठवण करून देणारे प्रतीक आहे.

अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या मूर्तीला सजावटीचा शोपीस मानणे आणि त्याचा अनादर करणे ही आपली सांस्कृतिक अधोगतीच म्हणावी लागेल. हे मान्य करावे लागेल की अंधश्रद्धा, फेंगशुई किंवा लक यासाठी मूर्ती ठेवली जाते. परंतु खरेतर मूर्ती ठेवण्यामागे श्रद्धा आणि आदर असणे आवश्यक आहे. शोपीस म्हणून मूर्ती ठेवून तिचा अपमान करणे म्हणजे भगवान बुद्धांच्या विचारांचा, तत्त्वज्ञानाचा आणि इतिहासाचा अपमान होय.



**प्रविण बागडे**
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

समाजाने या बाबतीत संवेदनशील होणे आवश्यक आहे. मूर्ती तुटली तर ती योग्य धार्मिक संस्थांना सुपूर्द करावी किंवा सन्मानपूर्वक विसर्जित करावी. माध्यमे, शाळा व सामाजिक संघटनांनीही जनजागृती करणे गरजेचे आहे. बुद्धांचा खरा सन्मान मूर्ती ठेवण्यात नसून त्यांच्या करुणा, दया आणि विवेक या शिकवणी आचरणात आणण्यात आहे.

म्हणूनच लक्षात ठेवू या. भगवान बुद्ध शोपीस नाहीत आणि त्यांच्या प्रतिमा कचराकुंडीकरिता तर अजिबातच नव्हेत. त्यांच्या प्रतिमेचा सन्मान राखणे हेच आपल्या संस्कृतीचे खरे लक्षण आहे. तर चला, बुद्धांना कचराकुंडीपासून वाचवू या; आणि त्यांच्या शिकवणीला आपल्या हृदयात स्थान देऊ या.

■ ■ ■

## अष्टाक्षरी

कसे गळते कळे ना
साता जन्मांचेही भय
काळ्या चोळीत दाटते।
काळ्या सजणाची सय।

काळ्या सजणाची सय
सखे अनिवार झाली
लाज पाठीस बांधून
माझी पावले निघाली।

माझी पावले निघाली
ठायी काट्यांची वर्दळ
त्याची साद झाली घंटा
माझ्या देहाचे राऊळ।

माझ्या देहाचे राऊळ
कसे कोण उजळतो
त्याची सय प्रकाशते
मनगाभारा भरतो ।

मनगाभारा भरतो
मोह तमाचा उरे ना ।
मग मी-तू पण सखे
कसे गळते कळे ना।

**वीणा डोंगरवार**
नागपूर.

# कायद्यापुढे ना मॅन पावर चालतो, ना मनी पावर!

ज्या घरामध्ये युवकांची, तरुणांची आणि वयस्कर माणसांची संख्या भरपूर आहे, ज्यांच्या घरातील बहुतांश सदस्य शासकीय व निमशासकीय पदावर विराजमान आहेत, भरपूर पगारीचे हक्कदार आहेत. त्यांच्याकडे भरपूर जमीन जुमला तसेच गाडी व बंगला आहे. अशा श्रीमंत व मॅन पावर असणाऱ्या म्हणजेच पैशाने व जनशक्तीने मोठ्या असणाऱ्या घराच्या नादी लागायला गावातील माणसे घाबरतात आणि वादविवाद करायला टाळतात.

गावातील कोणत्याच माणसाची त्यांच्या वाटेला जायची हिंमत होत नाही. अशा सर्व बाजूंनी म्हणजेच साम, दाम, दंड, भेद यांनी भक्कम व मजबूत असणाऱ्या घराच्या नादी लागणे म्हणजे स्वतःचा पराभव करून घेण्यासारखे आहे. असे बहुतांश लोकांचे धोरण झालेले आहे. म्हणून आजकालची माणसे मॅन पावर व मनी पावर बघूनच भांडण तंटे करायला निघतात.

पैशाने व जनशक्तीने समोरची पार्टी मजबूत व भक्कम असेल तर माणसे माघार घेणेच पसंत करतात. त्यांना असे वाटते की, आपण जर अशा धनदांडग्या व श्रीमंत घराच्या नादी लागलो तर आपला पराभव निश्चितच आहे. आपण पोलीस स्टेशन मध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा जरी नोंद केला तरी समोरची पार्टी पैशाच्या जोरावर अटकपूर्व जामीन घेऊन सुटते.

त्यांच्याकडे एकतर जनशक्ती असल्यामुळे बेदम मार खाऊन पराभव पत्करावा लागतो. आजकाल ज्यांच्याकडे मॅनपावर व मनी पावर आहे त्यांचाच विजय आहे. असे आज कालच्या लोकांचे ठाम मत झाले आहे. म्हणून आजकाल ज्या घरामध्ये धनशक्ती व जनशक्तीची सांगड आहे, त्याच घराचा दरारा गावामध्ये व समाजामध्ये आहे.

पण मित्रहो ज्या घरांमध्ये जनशक्ती व धनशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तुम्ही त्या घराला जर घाबरत असाल तर तुम्ही खरंच शिक्षण शिकून न शिकल्यासारखे आहात, असेच म्हणावे लागेल. तुम्ही एवढे शिकूनही जर तुम्हाला भारतीय संविधानाचा व कायद्याचा अभ्यास नसेल तर मग तुमच्या त्या शिक्षणाला काय चुलीत घालायचे आहे?

आपला भारत देश भारतीय संविधानावर चालतो. ज्याला भारतीय संविधानाचा व कायद्याचा परिपूर्ण अभ्यास आहे आणि जो भारतीय संविधान पूर्णपणे जाणतो तो कितीही मोठा वाघ असू द्या किंवा कितीही मोठा पहिलवान असू द्या, त्याला जराही न घाबरता त्याच्यासोबत कायदेशीर लढाई लढतो. ज्या माणसांना कायद्याचे नॉलेज नाही, ज्यांना कायदा म्हणजे काय आहे? हे अजूनही कळाले नाही. असे लोक मॅन पावर व मनी पावर असणाऱ्या धनशक्ती व जनशक्तीला घाबरतात.

त्यांना कायद्याचे परिपूर्ण नॉलेज नसल्यामुळे आणि कायद्यातील एकंदरीत कलमा माहित नसल्यामुळे ते अशा धनदांडग्या लोकांच्या विरोधात केस करायला घाबरतात. गावात फिरणे व जगणे मुश्किल करतील असे त्यांना वाटत असते. ही त्यांची चुकी नसून त्यांच्या अज्ञानाची व त्यांच्या अल्पशिक्षणाची चुकी आहे. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

शिक्षण शिकलेल्या माणसाला कायद्याचा थोडातरी अभ्यास असतोच. आणि त्या व्यक्तीच्या मागे भलेही मनी पावर किंवा मॅन पावर जरी नसला तरी ते पोलीस स्टेशनला, कोटीला व पेशा करायला कधीच घाबरत नाहीत. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत असेल, त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत असेल तर ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कोर्टात कायदेशीर लढायला लागतात आणि आरोपीला शिक्षा देण्यास भाग पाडतात. समोरच्या पार्टीकडे कितीही पैसा असू द्या पण फिर्यादी जर खंबीर व संविधानाचा अभ्यासक असेल आणि त्याला कायदा कानून माहीत असेल तर तो या लढाईत जिंकल्याशिवाय राहत नाही. कारण कायद्यापुढे ना पैसा कामाला येतो ना माणसे कामाला येतात. न्यायालयात न्यायाधीश भारतीय संविधानानुसार आरोपीला शिक्षा व अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय देऊन निर्दोष सुटका केली जाते.

कोर्टात व न्यायालयात पैसा कामाला येतो ना वशिला. आपण जाणून आहोत की, कायद्याच्या कचाट्यात अडकलेले मोठमोठे महारथी जसे की, सलमान खान, संजूबाबा, अजय देवगन, आसाराम बापू आणि इतर अनेक मोठ्या हस्ती तसेच मोठमोठे राजकारणी अब्जाधीश असून सुद्धा त्यांना जेलची हवा खावी लागत आहे. कायद्यापुढे पैसा कामाला येत असता तर ते पैशाच्या जोरावर कधीच सुटले असते.

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे ना धनशक्ती होती ना जनशक्ती होती, त्यांना पदोपदी जातीयतेचे विखारी चटके सहन करावे लागले. महार जातीचा असल्यामुळे त्यांचा अमानुष छळ केला गेला. काही समाज वगळता अख्खा देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब डगमगले नाहीत, जराही खचले नाहीत किंवा त्यांना घाबरून पळाले नाहीत. नित्यनेमाने व सातत्याने आपले काम करतच राहिले.

बाबासाहेबांना ना भावकी होती ना त्यांच्याकडे मुबलक पैसा होता. सगळा समाज बाबासाहेबांच्या विरोधात असताना सुद्धा बाबासाहेब इथल्या मनुवादी, जातीवादी व सनातनी विचारधारेच्या लोकांना कायद्याचा दणका देऊन समतावादी व मानवतावादी जीवन जगायला शिकवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकटेच होते आणि निम्म्याहून अधिक देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब जराही डळमळले नाहीत किंवा ध्येयापासून विचलित झाले नाहीत. मनुवादी, जातीवादी व धर्मांध लोकांच्या छाताडावर पाय देऊन या देशात सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून या देशाला जगात आदर्श व महासत्ता बनवले आहे...

-------------

■ बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी ता. अहमदपूर जि. लातूर.
7498715661

■ ■ ■

## अन्न पॅकिंगसाठी ॲल्युमिनियम फॉइल हानिकारक



आपण अन्न पॅकिंगसाठी ॲल्युमिनियम फॉइल किंवा बटर पेपर वापरतो. काही लोक अन्न पॅक करण्यासाठी ॲल्युमिनियम फॉइल वापरतात. यात अन्न गरम राहतं पण हे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. ॲल्युमिनियम फॉइलमध्ये असलेले काही कण अन्नात त्याच्या गरमपणामुळे त्या अन्नात मिसळू शकतात. जे तुमच्या आरोग्याला नक्कीच हानी पोहोचवू शकतात. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**आत्महत्या प्रतिबंध सप्ताह**

पुनरपी जन्मम्
पुनरपी मरणमूच्या
फेऱ्यातून सुटण्याची
मनुष्य योनीतच मिळते संधी
म्हणून आत्महत्येच्या विचारांना
मनी थारा देऊ नये कधी..

संकटे येतील जातील
हे जिवनचक्र आहे
संयमाने करावा सामना
यातच पुरुषार्थ किर्ती आहे . .

# चोवीस तासातील कामाचे तास बारा अन..

"पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून, ती कष्टकरी आणि श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे." असे निर्भीडपणे ठणकावून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांगायचे. आज आपण ज्या भौतिक गरजांचा उपभोग घेतो, त्या केवळ कष्टकरी,श्रमिकांच्या घाम गाळल्यामुळेच. यात कुठेही दुमत नाही. शेवटी कष्टाला पर्यायचं नाही.

आज यांत्रिकीकरण व संगणकीकरणाच्या युगात ही खरेच ठरते आहे. काम केल्याने माणूस कधी मरत नाही, परंतु न केल्याने नक्कीचं दारिद्रयता, उपासमार होऊन जीवनमान खालावते. शिवाय भौतिक प्रगती सोबतच देशाच्या विकासाला हातभार लागत नाही. म्हणूनच आज वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठी माणूस दूरदेशी करताना भटकंती दिसतो.

देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिकीकरणाने मोठा वेग धरला आहे. त्यात महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. राज्यातील लाखो हेक्टर भूभागावर औद्योगीकरण विस्तारलेले आहे. याच औद्योगीकरणाने लाखों लोकांना रोजगार, करोडों हातांना काम, तर अगणित कुटुंबीयांची औद्योगिक क्षेत्राच्या माध्यमातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या उपजीविका होत आहे. आजमीतिला राज्यातील संघटित व असंघटित कामगार औद्योगिक वसाहतील कारखाने व आस्थापनातून प्रत्यक्षरित्या काम करीत आहेत.

राज्यात औद्योगिक कामगारांच्या हितआणि संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. अलीकडेच राज्य मंत्रिमंडळाने कारखाने अधिनियम १९४८ मध्ये काही तरतुदी करण्यास मान्यता दिली आहे. या दुरुस्तीनुसार कामगारांच्या कामकाजाच्या वेळेबाबत दिवसाला नऊ तासांऐवजी बारा तास काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शिवाय विश्रांतीच्या काळामध्ये बदल करून सलग पाच तासानंतर तीस मिनिटे आणि सहा तासानंतर पुन्हा तीस मिनिटे, अशी विश्रांतीची तरतूद करण्यात आली आहे.

आठवड्याचे कामांचे तास अठ्ठेचाळीस तासांहून साठ तासांपर्यंत वाढविण्यात आले आहे. तसेच कामगारांच्या अतिरिक्त वेळेबाबत (ओव्हरटाईम) ची मर्यादा एकशे पंधरा तासांहून एकशे चौरेचाळीस तासांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे कामगारांना अधिकचा आर्थिक लाभ मिळेल असा दावा शासनाचा आहे. हा निर्णय राज्यातील कारखाने, खाजगी आस्थापने, शिवाय जिथे वीसहुन अधिक कामगार काम करतात त्यांना लागू होईल.

कामाचे तास वाढविल्याने कामगारांना आर्थिक मोबदला दुप्पट मिळेल असे सांगितले जाते. या निर्णयाची अंमलबजावणी कामगारांच्या परवानगीने होणार आहे.त्यामुळे कंपनी व्यवस्थापन, मालक कामगारांवर दबाव टाकून कामाचे तास वाढविण्याची परवानगी घेण्यात यशस्वी होतील. आजही असंघटित कामगारांच्या अतिरिक्त मोबदल्याचे आमिष दाखवून काम करून घेतले जाते आणि ते ही सिंगल ओव्हरटाईम देऊन.



**शशिकांत म. तोटे**
दारव्हा, जि.यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote1979@gmail.com

यामध्ये कामगारांचे शोषण होऊन कारखानदार व कंत्राटदाराचा फायदा होत असतो.अशा प्रसंगी कामगाराची इफीशियन्सी किती आहे. हा मुद्दा गौण ठरतो. कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न, वाढत्या वयासोबतच कामाच्या व्याप, सोसता सोसेना होईल. औद्योगीकरणात कामाच्या पद्धती स्थळ, काळ, यांत्रिकी व अयांत्रिकरित्या भिन्नभिन्न ठरतात.

आज औद्योगीकरण मोठ्या महानगरात स्थायिक आहे.जे नागरी वस्त्यांपासून मैलों दूर आहे. कामगारांच्या निवासस्थानापासून कारखान्यापर्यंत पोहोचण्यासाठी तासांहून अधिक वेळ लागतो. असंघटित कामगारांना स्वखचनि ट्रॅफिकच्या विळख्यातून कामाचे स्थळ गाठावे लागते. त्यांच्या येण्या-जाण्यात दोन अडीच तास खर्ची पडतात.

कामाचे तास बारा आणि येण्या-जाण्याच्या मागच्या वेळेचा अपव्यय हा कामगारांचा आहे. चोवीस तासातील सुमारे चौदा तास काम आणि कामाचे स्थळ गाठण्यात खर्ची घालायचे तर शारीरिक विश्रांती, कामानंतरचा थकवा, वयोपरोत्वे होणारी शारीरिक झीज, याबाबत कामगार कायद्याला विचार करायला भाग पाडण्यास लावले आहे.

कोणे एकेकाळी महाराष्ट्रात कामगारांच्या हितासाठी लढणारे बाबा आढाव व दत्ता सामंतां सारखे कामगार नेते होते.कामगार संघटना प्रबळ होत्या. आज राज्यातील बहुतांश कामगार संघटना राजकीय आहेत, परंतु त्या कामगारांच्या हितासाठी उदासीन का.?

आज कामगारांचे कामाचे तास वाढविण्याऐवजी त्यांचे वेतन वाढायला हवे.वेतन वाढीसाठी कामगार संघटनांचे आंदोलने, संप, निदर्शने दीर्घकाळापर्यंत चालतात. त्यांच्या मागण्या महत्प्रयासाने सुद्धा कंपनी व्यवस्थापन पूर्ण करीत नाही.

कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न हा कळीचा मुद्दा असतो. मध्यंतरी जागतिक आरोग्य संघटनेने प्रतिआठवडा पंचावन तासांहून जास्त वेळ काम करणाऱ्या कामगारांना स्ट्रोकचा धोका पस्तीस टक्यांहून वाढतो असे म्हटले होते. अतिरिक्त कामामुळे कामात विचलितपणा येतो. जो अपघातास कारणीभूत ठरतो. एकंदरीत कामाचे तास वाढविण्याचे दुष्परिणाम अनेकांनी सिद्ध केलेले आहे.

भविष्यातील संभाव्य धोके आणि ती अधिक तीव्र होऊ नये; म्हणून कामगारांच्या हितासाठी कामाचे वेळ वाढविण्या पेक्षा वेतन वाढविणे गरजेचे नितांत गरजेचे ठरते.शिवाय असंख्य हात आज कामापासून कोसो दूर आहे. त्यांना रोजगार देणे गरजेचे आहे.

आज कुशल कामगारांची कारखानदारांना गरज आहे. आज शासनाने रोजगार भरतीसाठी कारखानदारांना निर्देश देणे जरुरी असून आहे. शिवाय आहे त्या कामगारांकडून अधिक आर्थिक मोबदल्यापायी अतिरिक्त काम करून घेणे हे कामगारांच्या हितासाठी नाहीच.

# गृहमंत्र्यांनी ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्टमध्ये सहभागी असलेल्या जवानांचा सन्मान केला



**मुंबई, १४ सप्टेंबर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अलीकडेच कर्रेगुट्टालु डोंगरावर राबवलेल्या ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट या सर्वात मोठ्या मोहिमेला यशस्वी करणाऱ्या सुरक्षा दलांच्या जवानांचा सन्मान केला. सीआरपीएफ, छत्तीसगड पोलिस, डीआरजी आणि कोब्रा पथकाच्या जवानांच्या शौर्याला त्यांनी सलाम करून त्यांना देशाचा अभिमान म्हटले. शाह यांच्या धोरणामुळे जवानांचे मनोबल इतके वाढले की त्यांनी प्रत्येक संकटाला सामोरे जात नक्षलवाद्यांचा पायाभूत आधार संपवला.

नक्षलवाद उखडून टाकणारे अमित शहा यांनी स्पष्ट सांगितले की सर्व नक्षलवादी आत्मसमर्पण करेपर्यंत, पकडले जाईपर्यंत किंवा संपवले जाईपर्यंत ही लढाई सुरू राहील. शहा यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा दलांनी कठीण डोंगराळ भाग, अति उष्णता, उंच प्रदेश आणि आयईडीचा धोका असतानाही धाडसाने मोहीम राबवून नक्षलवाद्यांचे मुख्य अड्डे उद्धवस्त केले. त्यांच्या अढळ निर्धारामुळे सैनिकांमध्ये जोश निर्माण झाला आणि ते राष्ट्ररक्षणासाठी प्रेरित झाले.

नक्षलमुक्त भारताचे शिल्पकार ठरलेले शाह यांच्या कठोर रणनीतीमुळे वीर जवानांनी कर्रेगुट्टालु डोंगरावर नक्षलवाद्यांचे सामान डंप आणि पुरवठा साखळी नष्ट करून देशातील विकासाचा मार्ग मोकळा केला. त्यांच्या योजनेमुळे नक्षलवादी मागे हटत आहेत आणि वाढत्या सुरक्षा दलांच्या शक्तीसमोर टिकू शकत नाहीत.

आज अमृतकालात विकासाचा प्रकाश त्या भागातही पोहोचत आहे जिथे नक्षलवाद्यांनी अंधार पसरवला होता. नक्षलविरोधी मोहिमेमुळे पशुपतिनाथपासून तिरुपतीपर्यंत साडेसहा कोटी लोकांच्या जीवनात प्रकाश परत आला आहे. शहा यांनी जखमी जवानांच्या पुनर्वसनासाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी योजना राबवून सुरक्षादलांचा आत्मविश्वास वाढवला. त्यांच्या धोरणामुळे हे स्पष्ट झाले आहे की सैनिकांचे मनोबल वाढवणे हीच देशाच्या सुरक्षेची खरी गुरुकिल्ली आहे.

ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट मध्ये १०,००० हून अधिक सैनिकांचा सहभाग सुनिश्चित करून शाह यांनी एक अभूतपूर्व ऑपरेशन राबवले. त्यांच्या नेतृत्वाखाली २१४ नक्षलवादी अड्डे उद्धवस्त करण्यात आले,, १२,००० किलो रेशन जप्त करण्यात आले आणि माओवादी महासचिव नंबाला केशवराव ऊर्फ बसवराजू यांना संपवून नक्षलवाद्यांना मोठा धक्का देण्यात आला. शहा यांच्या ठाम धोरणामुळे सुरक्षादलांना उत्तम समन्वय आणि साधने मिळाली, ज्यामुळे नक्षलवादाचा कणा मोडला गेला. आज नक्षलवाद आपल्या शेवटच्या टप्प्यात आहे.

२१ दिवस चाललेल्या या मोहिमेत ३० हून अधिक नक्षलवादी मारले गेले आणि शेकडोंनी आत्मसमर्पण केले. आयईडी, बीजीएल शेल, कार्डेक्स स्फोटक आणि शस्त्रनिर्मिती यंत्रे जप्त करून नक्षलवाद्यांची ताकद कमी करण्यात आली.

अमित शहा यांनी व्हीलचेअरवर असलेल्या जखमी सैनिकांना भेटून त्यांचा उत्साह वाढवला आणि त्यांना नटराजाची प्रतिमा व मोराची मूर्ती भेट देऊन सन्मानित केले. यामुळे त्यांनी हे दाखवून दिले की ते फक्त गृहमंत्री नसून देशाच्या सुरक्षादलांचे खरे संरक्षक आहेत.

नक्षलवादाच्या शवपेटीत शेवटचा खिळा ठोकणारे अमित शहा यांनी स्पष्ट केले की मोदी सरकारचा निर्धार आहे की ३१ मार्च २०२६ पर्यंत भारत नक्षलमुक्त केला जाईल. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलग्रस्त भागात रस्ते, शाळा, रुग्णालये आणि रोजगाराच्या नव्या योजना राबवल्या जात आहेत, ज्यामुळे नक्षलवाद्यांची मुळे तोडली जात आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारताचा रेड कॉरिडॉर १२६ जिल्ह्यांवरून फक्त ६ जिल्ह्यांपर्यंत कमी झाला आहे तर नक्षलवाद्यांना संपवून सुरक्षा दलांच्या शहीद होण्याचे प्रमाणही कमी झाले आहे.

देशातील जनतेने पाहिले आहे की नक्षलवादाविरुद्धच्या निर्णायक लढाईत अमित शहा हे प्रेरणास्थान, नेतृत्वकर्ता आणि संरक्षक म्हणून उभे राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षादलांचे मनोबल वाढले, मोहीम यशस्वी झाली आणि नक्षलवाद शेवटच्या श्वासावर पोहोचला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली भारत आज एक मजबूत, आत्मनिर्भर आणि सुरक्षित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे.

# मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कडून अदाणी पॉवरला १६०० मेगावॅट क्षमतेचा एलओए प्राप्त

**अहमदाबाद, १४ सप्टेंबर :** देशातील सर्वात मोठी खासगी थर्मल पॉवर कंपनी अदाणी पॉवर लिमिटेड (एपीएल) ला मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (एमपीपीएमसीएल) कडून एकूण १६०० मेगावॅट क्षमतेचा ऑर्डर मिळाला आहे. हा ऑर्डर नुकत्याच पूर्ण झालेल्या टेंडर प्रक्रियेअंतर्गत देण्यात आला आहे. एपीएलला आज एमपीपीएमसीएल कडून लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) मिळाले असून त्यात ८०० मेगावॅटची अतिरिक्त क्षमता ग्रीनशू ऑप्शन अंतर्गत देण्यात आली आहे. याआधीही या बोली प्रक्रियेत कंपनीला ८०० मेगावॅटचा ऑर्डर मिळाला होता. मागील १२ महिन्यांत हा कंपनीचा पाचवा मोठा पॉवर सप्लाय ऑर्डर आहे. आतापर्यंत एपीएलला एकूण ७,२०० मेगावॅट क्षमतेचे ऑर्डर मिळाले आहेत.

अतिरिक्त ८०० मेगावॅट क्षमतेचा हा ऑर्डर ५.८३८ रुपये प्रति युनिट दराने देण्यात आला आहे, जो आधी मिळालेल्या ८०० मेगावॅटसाठी ठरवला गेला होता. याअंतर्गत एपीएल मध्यप्रदेशच्या अनूपपूर जिल्ह्यात उभारल्या जाणाऱ्या १६०० मेगावॅट (८००२) अल्ट्रा-सुपरक्रिटिकल थर्मल पॉवर युनिट मधून वीज पुरवणार आहे. हा प्रकल्प डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ओन आणि ऑपरेट (डीबीएफओओ) मॉडेल वर उभारला जाणार आहे. दोन्ही युनिट्स नियुक्तीच्या तारखेपासून ६० महिन्यांच्या आत सुरू होतील. कंपनी या प्रकल्पावर आणि संबंधित इन्फ्रास्ट्रक्चरवर सुमारे २१,००० कोटी रुपये गुंतवणूक करणार आहे.

अदाणी पॉवरचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.बी. ख्यालिया म्हणाले, आम्हाला आनंद आहे की अदाणी पॉवरला केवळ मध्यप्रदेशातील सुरुवातीचा ८०० मेगावॅट प्रकल्प मिळालेला नाही, तर ग्रीनशू ऑप्शन अंतर्गत अतिरिक्त ८०० मेगावॅट क्षमताही मिळाली आहे. हे आमच्या त्या वचनबद्धतेला बळकटी देते, ज्याअंतर्गत आम्ही राज्य आणि येथील लोकांना विश्वासार्ह, परवडणारी आणि टिकाऊ वीज उपलब्ध करून देण्यासाठी काम करत आहोत. हा प्रकल्प केवळ मध्यप्रदेशसोबतची आमची दीर्घकालीन भागीदारी मजबूत करत नाही, तर भारताच्या ऊर्जा सुरक्षिततेत आणि आर्थिक विकासात आमच्या योगदानाचेही प्रतीक आहे.

सप्टेंबर २०२४ मध्ये अदाणी ग्रीन एनर्जीसोबत मिळून कंपनीला महाराष्ट्र सरकारकडून ६,६०० मेगावॅट (५,००० मेगावॅट सौर आणि १,६०० मेगावॅट थर्मल) वीज पुरवठ्यासाठी एलओआय मिळाला होता. मे २०२५ मध्ये तिला उत्तर प्रदेश सरकारकडून १,६०० मेगावॅट क्षमतेच्या ग्रीनफिल्ड प्लांटमधून वीज पुरवठ्याचा एलओए मिळाला. ऑगस्ट २०२५ मध्ये कंपनीला बिहार सरकारकडून २,४०० मेगावॅट क्षमतेच्या नवीन पॉवर प्लांटचा एलओए मिळाला. तर गेल्या महिन्यात मध्यप्रदेशकडून ८०० मेगावॅटचा एलओए मिळाला होता, जो आता एमपीपीएमसीएलने ग्रीनशू ऑप्शन स्वीकारल्यानंतर वाढून १,६०० मेगावॅट झाला आहे.

अदाणी पॉवर भारतातील वाढत्या बेस लोड मागणी पूर्ण करण्यासाठी खासगी क्षेत्रातील सर्वात मोठा कॅपेक्स कार्यक्रम राबवत आहे. सध्या कंपनीकडे १२ थर्मल पॉवर प्लांट्स (टीपीपी) मधून १८.१५ गीगावॅट उत्पादन क्षमता आहे आणि वित्त वर्ष २०३१-३२ पर्यंत एकूण ४१.८७ गीगावॅट उत्पादन क्षमता साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे.

## अदाणी पॉवरचा २४०० मेगावॅट वीज पुरवठ्यासाठी बिहार सरकारसोबत करार

**अहमदाबाद, १४ सप्टेंबर :** भारतातील सर्वात मोठी खासगी थर्मल पॉवर उत्पादक कंपनी अदाणी पॉवर लिमिटेड (एपीएल) ने बिहार स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बीएसपीजीसीएल) सोबत २५ वर्षांसाठी पॉवर सप्लाय करार केला आहे. या करारा अंतर्गत कंपनी भागलपूर जिल्ह्यातील पीरपैंती येथे उभारल्या जाणाऱ्या नव्या अल्ट्रा सुपरक्रिटिकल प्लांटमधून २४०० मेगावॅट वीज पुरवणार आहे. हा करार ऑगस्टमध्ये बिहार स्टेट पॉवर जनरेशन कंपनीने अदाणी पॉवर लिमिटेड दिलेल्या लेटर ऑफ अवॉर्ड (एलओए) चा पुढचा टप्पा आहे. हा प्रकल्प उत्तर बिहार पॉवर डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेड (एनबीपीडीसीएल) आणि दक्षिण बिहार पॉवर डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेड (एसबीपीडीसीएल) यांच्या वतीने जारी करण्यात आला होता. अदाणी पॉवरने ६.०७५ रुपये प्रति युनिट हा सर्वात कमी दर देऊन हा प्रकल्प मिळवला आहे. सुमारे ३ अब्ज अमेरिकन डॉलर (सुमारे २५,००० कोटी रुपये) खर्च करून कंपनी या प्लांटचे (८०० मेगावॅट ३ युनिट) आणि संबंधित इन्फ्रास्ट्रक्चरचे बांधकाम करणार आहे. हा प्रकल्प डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ओन आणि ऑपरेट (डीबीएफओओ) मॉडेल अंतर्गत विकसित केला जाणार आहे.

या पॉवर प्लांटसाठी कोळशाची व्यवस्था भारत सरकारच्या शक्ति धोरणा अंतर्गत करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या बांधकामाच्या टप्प्यात सुमारे १० ते १२ हजार लोकांना थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळेल, तर संचालन सुरू झाल्यावर सुमारे ३,००० लोकांना कायमस्वरूपी रोजगार मिळेल. कंपनीचे उद्दिष्ट आहे की हा संपूर्ण प्लांट पुढील ६० महिन्यांच्या आत पूर्णपणे सुरू करावा.

# शक्ती एनर्जी सोल्युशन्स ने पुण्यात लाँच केले एआय-आधारित इन्व्हर्टर आणि भारत-रेडी सोलर रूफटॉप



**नागपूर, १४ सप्टेंबर :** आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत, शक्ती एनर्जी सोल्युशन्सने शेरेटनमधील फोर पॉइंट्स हॉटेलमध्ये चॅनल पार्टनर्स आणि डीलर्ससाठी भव्य लाँचिंग कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमात प्रमुख भागीदार आणि स्टेकहोल्डर्सनी सहभाग घेतला आणि कंपनीच्या भारताला स्वच्छ व शाश्वत ऊर्जेच्या दिशेने वेगाने पुढे नेणे या उद्दिष्टाचा पुनरुच्चार केला.

या कार्यक्रमात कंपनीने मेड इन भारत, मेड फॉर भारत या विचारातून विकसित केलेली नेक्स्ट जनरेशन सोलर रूफटॉप सिस्टिम सादर केली.

शक्ती एनर्जी सोल्युशन्सचे सीईओ, रामकृष्ण सतलुरी म्हणाले, शक्ती सोलर रूफटॉप हे उच्च दर्जाचे सोल्युशन्स असून, ते मेड इन भारत, मेड फॉर भारत या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत. ही प्रणाली खास भारतीय हवामानासाठी तयार करण्यात आली आहे, ज्यामुळे उत्तम ऊर्जा उत्पादन, अधिक टिकाऊपणा आणि विषम हवामान परिस्थितीतही उत्कृष्ट कामगिरी बजावतात. अपडेटेड मॉनिटरिंग सिस्टिममुळे ग्राहक आता रिअल-टाइममध्ये ऊर्जा उत्पादन तपासू शकतील, ज्यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि स्मार्ट एनर्जी मॅनेजमेंट शक्य होईल.

शक्ती पंप्सच्या विश्वासार्हतेमुळे, शक्ती एनर्जी सोल्युशन्स आता सौर ऊर्जा उद्योगात एक मोठा आणि विश्वासार्ह ब्रँड बनत आहे. हे ब्रँड सोलर पॅनेल, इन्व्हर्टर आणि मॉड्यूल माउंटिंग स्ट्रक्चर्स, अशा सर्व गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजेसनशक्ती इन्व्हर्टरचे प्रदर्शन, जो एक एआय-आधारित सोलर इन्व्हर्टर आहे. यात रिमोट कनेक्टिव्हिटी, प्रगत डिजिटल कंट्रोल आणि सोप्या इंस्टॉलेशनची सोय आहे. यात न्यूरल नेटवर्क तंत्रज्ञानाचा वापर केला आहे, ज्यामुळे तो व्होल्टेजमधील बदल आणि पॉवर फ्लक्चुएशननुसार स्वतःला जुळवून घेतो आणि भारतीय घरांसाठी अधिक कार्यक्षमता व घरात अखंडित वीज देतो.

या लाँचिंगमुळे संवाद आणि सहकार्यासाठी एक मंच तयार झाला, जिथे चॅनल पार्टनर्स आणि डीलर्सनी आपले विचार मांडले आणि उत्तर प्रदेश तसेच इतर राज्यांमध्ये सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे वचन दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी रामकृष्ण सतलुरी म्हणाले, शक्ती एनर्जी सोल्युशन्समध्ये आमचे ध्येय केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे नाही, तर समाजाला स्वच्छ, विश्वासार्ह आणि स्मार्ट ऊर्जा सोल्युशन्सने सक्षम करणे आहे. आम्हाला विश्वास आहे की, आमच्या भागीदारांच्या सहकार्याने आम्ही भारतात या स्वच्छ ऊर्जा क्रांतीचे नेतृत्व करू.

# कॅम्पसने बोल्ड न्यू स्नीकर पोर्टफोलिओ सादर करण्यासोबतच महिलांसाठीच्या श्रेणीचा विस्तार

**नागपूर, १४ सप्टेंबर :** भारतातील आघाडीच्या स्पोर्ट्स आणि ॲथलेझर ब्रँडपैकी एक कॅम्पस ॲक्टिव्हवेअर लिमिटेडने नागपूरमध्ये वार्षिक रिटेलर मीट २०२५ चे आयोजन केले होते. यात १९३ हून अधिक रिटेल भागीदार सहभागी झाले होते. इंडिया चप्पल स्टोअरच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाची संकल्पना मूव्ह टुगेदर, ग्रो टुगेदर अशी होती. कॅम्पसचा ब्रँड ज्या मूव्ह युअर वे संकल्पनेभोवती फिरतो, त्यातच याची मुळे रुजली आहेत. आणि विस्तृत रिटेल नेटवर्कसह उत्तम निर्मितीसह एकत्र प्रगती करण्याचा विश्वास बळकट करणारी अशी ही थीम आहे.

ब्रँड आणि भागीदारांमधील विश्वास आणि अनौपचारिक संबंध लक्षात घेता या बैठकीत ब्रँडच्या नवीन कल्पनांवर प्रकाश टाकण्यासोबतच धोरणात्मक क्षेत्रे निश्चित करण्यात आली. सर्वाधिक मागणी असलेल्या फॅशन-फर्स्ट स्नीकर्स, महिलांचे स्नीकर्स आणि कॅम्पसचे प्रमुख उत्पादन एअर कॅप्सूल प्रो सारख्या वाढती मागणी असलेल्या विभागांमधील ग्राहकांच्या वाढत्या गरजा योग्य प्रकारे पूर्ण करण्यासाठी किरकोळ विक्रेते सज्ज आहेत.

आम्ही डिझाइन केलेल्या प्रत्येक उत्पादनाला ग्राहकांपर्यंत पोहोचल्यावरच अर्थ मिळतो. आणि आमचे किरकोळ विक्रेते ते शक्य करतात, असे कॅम्पस ॲक्टिव्हवेअर लिमिटेडचे पूर्णवेळ संचालक आणि सीईओ श्री. निखिल अग्रवाल म्हणाले. केवळ उत्पादनांची ओळख करून देणे, किंवा संकल्पना मांडणे यापेक्षा ही बैठक वेगळी होती. सामायिक गती, ग्राहकांचा विकसित होत असलेला दृष्टिकोन आणि आम्ही एकत्र करत असलेल्या प्रवासाचा हा उत्सव आहे. ट्रेंडिंग स्नीकर्सपासून ते महिलांच्या ॲथेलायझर पर्यंत, आमचे भागीदार देशभरातील आमच्या चळवळीचे महत्त्वाचे घटक आहेत.

भारतातील दैनंदिन जीवनशैलीला अनुरूप असा एक वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ या ब्रँडने सादर केला. यात शैली तर आहेच पण उत्तम कार्यक्षमता आणि आराम यांचे मिश्रण असलेले डिझाइन आहेत. शहरी फॅशनवर स्नीकर श्रेणीचा प्रभाव वाढत असतानाच यांच्या पोर्टफोलिओमध्ये ठळक, ठसठशीत, नजरेत भरतील अशा पर्यायांसोबतच रोजच्या वापरासाठी योग्य उत्पादनांचा समावेश होतो. तरुण भारतीय ग्राहकांमधील वाढत्या मागणीचे निदर्शक असलेले क्युरेटेड, ट्रेंड-फॉरवर्ड डिझाइनसह महिलांसाठी वेगळी स्टाईल आहे. विशेष म्हणजे, या लाइनअपमध्ये सर्वांसाठी अत्यंत सुरेख अशी पादत्राणे तर आहेतच पण मुलांसाठी ट्रेंडी, आरामदायी तसेच टिकाऊ असे कलेक्शन देखील आहे.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर, ग्राहकांच्या गरजांची जाणीव आणि त्यांच्या अपेक्षांबर हुकूम उत्पादन निर्मिती यामुळे कॅम्पसवर ग्राहकांचा दृढ विश्वास आहे. यामुळेच यांच्याशी २३,०००+ किरकोळ विक्रेते जोडले गेले आहेत. वाढत्या डिजिटल फूटप्रिंटसह, एक विश्वासार्ह साथीदार म्हणूनही ते आपले स्थान भक्कम करत आहेत.

भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी स्पोर्ट्स आणि ॲथलेझर ब्रँड बनण्याच्या आपल्या स्वप्नाकडे वाटचाल करत असतानाच रिटेलर मीट २०२५ हा कॅम्पससाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. जो विश्वासावर आधारित आहे तसेच नावीन्यपूर्णतेने प्रेरित अशा सामूहिक चळवळीचे प्रतीक म्हणून समोर आला आहे.

# ही भूमिका म्हणजे माझ्या आईला वाहिलेली आदरांजली आहे



**मुंबई, १४ सप्टेंबर :** इंद्रायणीच्या रूपात मराठी घराघरांत पोहोचलेली आणि लाडकी ठरलेली बाल कलाकार सांची भोईर आता १७ सप्टेंबरपासून सुरू होणा-या कलर्सवरील बिंदी या मालिकेतून हिंदी टेलिव्हिजनवर पदार्पण करत आहे. आपल्या कारकिर्दीच्या अगदी प्रारंभीच या जबरदस्त अभिनेत्रीने जटिल व्यक्तिरेखा कौशल्याने साकार करून आपले कसब दाखवले आहे. त्यानिमित्त तिच्याशी झालेली बातचीत.

**या मालिकेविषयी आम्हाला सांग.**

उ. बिंदी एका लहान मुलीची गोष्ट आहे, जी तुरुंगात आपली आई काजल हिच्या छत्रछायेत वाढली आहे. आपल्या आईच्या प्रेमाच्या छायेत राहिल्यामुळे तुरुंगातही तिच्यावर कधी भीतीचे सावट आले नाही. पण, एक दिवस देशाच्या कायद्याला अनुसरून काजल (मैय्या)ला बिंदीला आपल्यापासून दूर तुरुंगाच्या बाहेर पाठवावे लागते. बाहेर आल्यावर बिंदीला एक मोठे सत्य समजते: आपल्या वडिलांनीच माफिया डॉन दयानंदशी हातमिळवणी करून आपल्या आईची फसवणूक केली आहे. बिंदी शिक्षण घेऊन स्वतःला सक्षम बनवण्याचा निर्धार करते, जेणेकरून आपल्या आईची सुटका करता यावी! पण तिचे वडील आणि दयानंद प्रत्येक टप्प्यावर तिची अडवणूक करतात. आपल्या आईला वाचवण्यासाठी हा बिंदीचा लढा आहे आणि ती दाखवून देते की एक लहान मुलगी देखील किती मोठा पराक्रम करू शकते.

**तुझ्या व्यक्तिरेखेविषयी आम्हाला सांग.**

उ. बिंदी म्हणजे काळोख्या तुरुंगात आलेला एक प्रकाशझोत आहे. ती आपल्या मैयाचे विश्व आहे. ती चुणचुणीत, कनवाळू स्वभावाची आणि काहीशी निरागसही आहे. तुरुंगाच्या चार भिंतींच्या बाहेरचे जग किती कठीण असू शकते याची तिला अजिबात कल्पना नाही. तिची स्वप्नं खूप साधी आहेत.

**हिंदी टेलिव्हिजनवर ही तुझी पहिली भूमिका आहे. कारकिर्दीच्या अगदी प्रारंभिक टप्प्यात इतक्या दमदार व्यक्तिरेखेचे भावनिक ओझे तुला जाणवते आहे का?**

उ. मी खूप रोमांचित आहे. हिंदी टेलिव्हिजनवर पदर्पणातच कलर्स वाहिनीने मला मुख्य भूमिका दिली, ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. याचा अर्थ मी बिंदीला न्याय देऊ शकेन हा या टीमचा विश्वास आहे. मला वाटते आहे की मी फक्त एक कहाणी सोबत घेऊन चालत नाहीये, तर बिंदीमध्ये स्वतःला शोधणाऱ्या युवा प्रेक्षकांची जबाबदारी देखील वाहात आहे.

**बिंदी कडवटपणा येऊ न देता लढा देण्याचे ठरवते. तुझ्या मते, आजच्या युवा प्रेक्षक वर्गाला तिचे हे वागणे किती पटेल?**

उ. बिंदी हे दाखवून देते की, दयाळू राहण्याने काहीच बिघडत नाही आणि जीवनातील वाईट अनुभव देखील दयाळू दृष्टिकोनाने हाताळता येतात. मला वाटते आजचे तरुण सामाजिक दृष्ट्या अधिक जागरूक आणि संवेदनशील आहेत, त्यांना ही वृत्ती पटेल. त्यांना दयाळू स्वभाव ही कमजोरी नक्कीच वाटणार नाही.

**आपल्या आईपासून दुरावल्यामुळे आपले विश्व उद्धवस्त झालेली एक मुलगी साकारत असताना तुझ्यासमोर सर्वात मोठे आव्हान कोणते होते?**

उ. दुरावण्याचे दृश्य सर्वात कठीण होते. माझे माझ्या आईशी देखील खूप घट्ट नाते आहे, त्यामुळे एक मुलगी म्हणून आपल्या आईपासून तिचे मूल दुरावण्याची कल्पना खूप क्लेशदायक होती.


**बिंदी शिक्षणाचा आधार घेऊन अन्यायाला तोंड देते. तुझ्या दृष्टीने, तरुण प्रेक्षकांसाठी हा संदेश किती उपयुक्त आहे?**

उ. हा खूपच संबद्ध संदेश आहे. आपल्या देशात कितीतरी लोक गरीबी, असमानता आणि भेदभावाचा सामना करत आहेत, आणि त्यांच्याकडे असलेले एकमेव शस्त्र म्हणजे शिक्षण. बिंदी हेच वास्तव पडद्यावर जिवंत करते. मालिका बघणाऱ्या प्रत्येक मुलाला ती सांगते, तुझे पेन, तुझी पुस्तके आणि तुझे ज्ञान तुझी नियती बदलू शकतात. हा खूप सशक्त संदेश आहे.

**प्रेक्षकांना तू काय संदेश देशील?**

उ. सर्व प्रेक्षकांनी बिंदीच्या प्रवासात सहभागी व्हावे असे मला वाटते. ही एका आईच्या प्रेमाची आणि मुलीच्या हिंमतीची कहाणी आहे. ही कहाणी भावनिक आहे आणि प्रेरणादायक देखील आहे. ही मालिका पाहून तुम्हाला कौटुंबिक नात्यांचे मोल जाणवेल. तर मग, १७ सप्टेंबर रोजी बिंदीचा प्रीमियर आणि त्यानंतर दररोज रात्री ८:३० वाजता ही मालिका बघायला विसरू नका फक्त कलर्स आणि जिओ हॉटस्टारवर.

# शब्दकोडे क्रमांक २२१८



**आडवे शब्द :-**


१) अनावर राग येणे (वा.प्र.)
८) अकरावी रास
९) गर्दभ
१०) पर्ण
११) कत्तल
१३) डोक्यावर हळूच मारलेली चापट
१५) उसनवार
१६) देशाचे नाणे
१७) शरीर
१९) मृत्तिका
२०) हिंदीत शरीर
२१) सर्वस्व
२४) नगण्य किंमत
२५) हरीणाची शिकार
२८) आश्चर्य
३०) मनाची घालमेल, तडफड
३१) कर्णेंद्रिय
३२) एक अधिक एक चतुर्थांश
३३) चलाख, हुषार
३५) आंबट, गोड चवीचे काटेरी फळ
३७) हस्त
३८) रानरेडा
४०) धुंदी, कैफ
४१) घर
४२) फोडणीचे वरण
४३) पुन्हा
४४) छाया
४५) देवाण घेवाण(हिं.)
४६) पायाने अधु असलेली
४७) विद्या
४९) रव्याचा एक गोड पदार्थ
५१) गाजावाजा
५२) एकश्वासरोग
५४) विळखा, मिठी
५५) सिंह
५७) दृष्टीभेट
६०) मनालाटोचणारे दुःख
६१) पटाईत
६३) पुरुष
६४) वांती
६६) गाय
६७) वारा
६८) दोन मैल
६९) अर्धा शेर

**उभे शब्द :-**

१) झीज सोसण्याची पराकाष्ठा करणे
२) दाट, निबिड, खोल
३) वात्रट
४) लहान बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५) दुर्दशा
६) अतिशय खरडपट्टी काढली (वा.प्र.)
७) वडिलांची बहीण
८) कर्णभुषण
११) निरुपाय
१२) सोन्याचे हरिण
१४) पडणे
१८) वाहन
१९) मनुष्य
२२) नंतर
२३) श्रीमंत
२६) येरझार, जाणे-येणे, हेलपाटा
२७) यज्ञ
२९) वाईट सवय
३२) कांबळी विणणारी जमात
३४) तृषित
३६) सदोदित
३९) अर्धा नारळ, गुडघ्याचे वर्तुळाकार हाड
४१) चुन्याचे पाणी
४२) हुकूमा, आज्ञा
४३) पान
४४) लाक्डाची एक उत्कृष्ठ जात
४६) उपकार
४७) अर्धवर्तुळाकार
४८) एक गड्डा भाजी
५०) अरण्य
५१) हत्तींचा राजा
५२) हिंदीत भेग, दुही
५३) मऊ
५४) सत्वांश
५६) ढीग
५८) जन्म
५९) एक गळीत धान्य
६२) बारा वर्षाचा काळ
६५) पुरुष

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कोटेक हेल्थकेअर कंपनीने सेबीकडे दाखल केला आयपीओसाठी अर्ज

**मुंबई, १४ सप्टेंबर :** भारतामध्ये कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑर्गनायझेशन (सीडीएमओ) क्षेत्रातील विविध डोस फॉर्म्सच्या संख्येनुसार दुसऱ्या क्रमांकाची कंपनी असलेल्या आणि २४ वेगवेगळ्या औषध-निर्मिती प्रकारांमध्ये कार्यरत असलेल्या कोटेक हेल्थकेअर लिमिटेडने (स्रोत: एफ अँड एस अहवाल) सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे (सेबी) आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. ५ रुपये दर्शनी मूल्य असलेल्या २,९५० दशलक्ष रुपयांच्या इक्विटी शेअर्सचा फ्रेश इश्शू आणि ६० लाख इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल यांचा या ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसमध्ये समावेश आहे. कंपनी कॉन्ट्रॅक्ट डेव्हलपमेंट अँड मॅन्युफॅक्चरिंग ऑर्गनायझेशन (सीडीएमओ) म्हणून काम करते. ती औषधांचे सूत्रीकरण विकसित करते, लोन लायसन्सिंग उपलब्ध करून देते आणि पेटंट संपलेली औषधे तयार करते. यात गुंतागुंतीची जनरिक औषधेही येतात. ही औषधे मॉडिफाइड-रिलीझ आणि सस्टेन्ड-रिलीझ या प्रगत औषध-वितरण पद्धतींनी तयार केली जातात. कंपनी संस्थात्मक ग्राहकांनाही आणि खासगी ग्राहकांनाही सेवा पुरवते. इंजेक्टेबल्स, गोळ्या, कॅप्सूल्स, मलमे, डोळ्यांचे थेंब, अँप्युल्स, व्हायल्स, द्रवरूप व कोरडी सिरप्स आणि इन्फ्युशन्स अशा विविध डोस स्वरूपांमधील औषधांचा आणि सेवांचा कंपनीच्या उत्पादन संचात समावेश आहे.

आपल्या समकक्ष कंपन्यांच्या तुलनेत कोटेक ही सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या कंपन्यांपैकी एक आहे. वित्तीय वर्ष २०२३ ते २०२५ या कालावधीत तिच्या महसुलात ५२.७२ चक्रवाढ दराने वार्षिक वाढ झाली आहे (स्रोत: एफ अँड एस अहवाल). या काळात कंपनीने उच्च मूल्याच्या ग्राहकांवर, विशेषतः उच्च मूल्याची उत्पादने घेणाऱ्यांवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी धोरणात्मक बदल केला.


**आज का अंदाज**

सोमवार १५ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 6 | 9 | 0 |
| 139 | 123 | 234 | 235 |
| 256 | 259 | 450 | 479 |
| 689 | 457 | 144 | 389 |
| 32 | 62 | 94 | 04 |
| 34 | 68 | 95 | 08 |
| 38 | 61 | 97 | 08 |

**मुंबई बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 7 | 8 |
| 238 | 239 | 269 | 125 |
| 580 | 590 | 458 | 279 |
| 337 | 356 | 188 | 468 |
| 35 | 45 | 70 | 80 |
| 33 | 44 | 79 | 89 |
| 31 | 41 | 76 | 86 |

१५ सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 53 | 83 |
| 19 | 49 | 52 | 82 |
| 17 | 47 | 56 | 86 |

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
0 8 9 2 6

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.

प्रो. बालाजी कुमार
9822486034


# राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला तुमच्या व्यवसायात दुप्पट नफा होईल. आज भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. लहानसहान गोष्टींवरून वाद होऊ शकतो. त्यामुळे शांत राहा.

**वृषभ :** आजचा दिवस प्रगतीचा असेल. तुमच्या विचारांमध्ये स्पष्टता येईल. तुम्ही योग्य निर्णय घेऊ शकाल. आर्थिक लाभाचे योग आहेत. मित्रांसोबत वेळ घालवल्यास तुम्हाला आनंद होईल.

**मिथुन :** तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवले तर हळूहळू तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल. कामाचा ताण वाढल्यामुळे थोडा थकवा जाणवेल. नवीन कामाची सुरुवात करण्यासाठी योग्य दिवस नाही.

**कर्क :** नवीन लोकांशी ओळख होईल, ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. कुटुंबासोबत आनंदी क्षण घालवाल. आर्थिकदृष्ट्या दिवस चांगला आहे, तुम्हाला अपेक्षित लाभ मिळू शकतो.

**सिंह :** आजचा दिवस शुभ असेल. आज सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात संतुलन राखणे महत्त्वाचे आहे. तुम्ही तुमच्या बोलण्याने लोकांवर छाप पाडू शकता. प्रवासाचे योग आहेत.

**कन्या :** आज आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. कामाच्या ठिकाणी थोडे तणावपूर्ण वातावरण असू शकते. तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करा. आर्थिक व्यवहार करताना सावध रहा.

**तूळ :** अभ्यासात यश मिळेल. कुटुंबासोबत वेळ घालवल्यास शांतता मिळेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल. आर्थिक स्थिती सामान्य राहील. आरोग्यावर लक्ष केंद्रित करा.

**वृश्चिक :** महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. आध्यात्मिक बाबींमध्ये मन रमवल्यास शांती मिळेल. कुणावरही लगेच विश्वास ठेवू नका. आरोग्याच्या दृष्टीने दिवस चांगला आहे. तुम्ही उत्साही राहाल.

**धनु :** आज कामावर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. थोडा जास्त प्रयत्न केल्यास तुम्हाला यश मिळेल. आर्थिक स्थिती सामान्य राहील. कौटुंबिक वाद टाळण्यासाठी शांत राहण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. आज तुम्ही तुमच्या व्यवसायात काही बदल करू शकता, ज्यासाठी तुम्हाला लवकरच सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कुंभ :** आज तुम्हाला तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. कोणत्याही गोष्टीवर घाईने प्रतिक्रिया देऊ नका. कामाच्या ठिकाणी आज तुमच्या कामाचे कौतुक होईल. गुंतवणूक करताना काळजी घ्या.

**मीन :** आज तुम्हाला नवीन संधी मिळतील. ज्यामुळे तुमच्या करिअरला नवी दिशा मिळेल. तुम्ही केलेल्या कामाचे कौतुक होईल. वरिष्ठांकडून तुम्हाला सहकार्य मिळेल. प्रेमाच्या नात्यात गोडवा येईल.

# कॅलिडोस्कोप



## एका मुलीसाठी धावते रेल्वे!

संपूर्ण जगच नफा-तोट्यावर सुरू आहे; पण जपानमध्ये रेल्वेने असे काही केले आहे, की ते सर्व देशांसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे. जपानमधील होक्काइदो बेटावर क्यू शिराताकी स्टेशन आहे. या स्टेशनची गोष्ट एकदम प्रेरणादायी आहे. २०१६ पर्यंत या स्टेशनवर केवळ एकच विद्यार्थिनी रेल्वेत बसायची. तिचे शिक्षण थांबू नये, यासाठी हे रेल्वे आणि स्टेशन बंद करण्यात आले नाही. कारण त्या विद्यार्थिनीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी रेल्वे हेच एकमेव चांगले साधन होते.

एका वृत्तानुसार, या भागात रहिवाशांकडे कार आणि इतर दळणवळणाची साधने आली होती. काही मध्यमवर्गीयांना मात्र रेल्वेशिवाय पर्याय नव्हता; पण त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी होती. मालवाहक रेल्वेच्याही फ`ऱ्या घटल्या होत्या. त्यामुळे क्यू शिराताकी स्टेशन सुनसान झाले होते; पण या भागातील मुलींना शिक्षणासाठी हाच एकमेव जलद पर्याय असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांना कळाले. मग त्यांनी हे स्टेशन बंद करण्याचा निर्णय पुढे ढकलला. पुढे या स्टेशनवरून एकच मुलगी काना हराडा ही शिक्षणासाठी शहरात जात होती. तिच्यासाठी ही रेल्वे लाईफलाईन ठरली होती. तिच्या एकटीसाठी रेल्वे येथे थांबत होती.

या एका मुलीसाठी हे स्टेशन सुरू होते. येथे एका मुलीसाठीच रेल्वे थांबत होती. या स्टेशनवर कानासाठी दिवसातून दोनदाच रेल्वे थांबत होती. काना शाळेत जाताना आणि ती शाळेतून परत येत होती, तेव्हाच रेल्वे येथे थांबत होती. जर हे रेल्वे स्टेशन बंद केले असते, तर काना हिला ७० मिनिटं चालून दुसऱ्या रेल्वे स्टेशनवरून तिच्या शाळेसाठी रेल्वेचा प्रवास करावा लागला असता, ही बाब अधिकाऱ्यांना माहिती होती. या रेल्वे स्टेशनवरून चार रेल्वे ये-जा करत होत्या. त्यातील दोनच तिच्या नियोजीत वेळेत धावत होत्या.

काना हिला या दोन रेल्वेचाच आधार होता. त्यामुळे तिला इतर कोणत्याही स्पर्धेत अथवा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होता येत नव्हते. शाळा सुटताच तिला धावत स्टेशन गाठावे लागत असे, कारण तिच्यासाठी ही रेल्वे काही सेकंद अधिक थांबत असे. तिच्या शिक्षणासाठी हे स्टेशन सर्वात विश्वासू साधन ठरले होते; मार्च २०१६ मध्ये काना पदवीधर झाली. तिचे शैक्षणिक वर्ष संपले. तेव्हा क्यू-शिराताकी स्टेशन हे कायमचे बंद झाले. त्या वेळी जगभरात जपानच्या रेल्वे प्रशासनाचे आणि क्यू शिराताकी स्टेशनवरील रेल्वे कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या कौतुकाच्या बातम्या प्रसारीत झाल्या.



## गुमनाम है कोई


इजिप्तमध्ये असंख्य ममी आहेत. हजारो वर्षांपासूनच्या या ममी पिरॅमिडमध्ये जपून ठेवण्यात आल्या आहेत. या ममीज म्हणजे जगातलं एक आश्चर्यच म्हणता येईल. ममीवर आधारित बरेच चित्रपट आले. या चित्रपटांमधून बरंच काही भयावह दाखवण्यात आलं. ब्रिटनमध्येही असंच काही तरी घडलं. इथे एका पेटीत ममी ठेवली होती. या पेटीतून चित्रविचित्र आवाज यायला सुरूवात झाली. मग शास्त्रज्ञांनी हा आवाज ध्वनिमुद्रित करायचा निर्णय घेतला. रेकॉर्ड झालेला हा आवाज ऐकून शास्त्रज्ञांनाही धक्काच बसला. ब्रिटनमधल्या लीड्स सीटी म्युझियममध्ये एक ममी ठेवण्यात आली आहे. निसियामून असं या ममीचं नाव आहे. ही ममी तीन हजार वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं. इजिप्तचा राजा फॅरो रामसेस ११ च्या दरबारात काम करणाऱ्या एका पुजाऱ्याची ही ममी असल्याचं बोललं जातं. हा पुजारी राजासाठी खबरी म्हणून काम करायचा. तसंच तो त्याला धार्मिक गाणीही ऐकवायचा. या ममीच्या वरून हवा गेल्यानंतर तिच्या तोंडातून विचित्र आवाज येत असे. हे बघून शास्त्रज्ञांची उत्सुकता चाळवली. त्यांनी हा आवाज रेकॉर्ड करायचं ठरवलं. मग त्यांनी ममीच्या गळ्याचं सीटी स्कॅन केलं. मग थ्रीडी प्रटर तंत्रज्ञानाने ममीचं स्वरयंत्र तयार केलं. मग ममीच्या गळ्यातून आवाज काढण्यात आला. त्यावेळी ममीच्या गळ्यातून कण्हण्याचा आवाज आला. ममीवरून हवा गेल्यानंतर येणाऱ्या आवाजाशी हा आवाज तंतोतंत जुळला. ममीच्या जीभेचा काही भाग गायब असल्याचं सीटी स्कॅन दरम्यान लक्षात आलं. गेल्या तीन हजार वर्षांमध्ये ममीची जीभ सडून गेल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या या आवाजाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

## क्रूझवर जायचंय? निर्वस्त्र व्हा, पैसेही मोजा!

हे जग विचित्र लोक आणि रंगांनी भरलेले आहे. 'सोशल मीडिया'वर एका अशा जहाजाची खूप चर्चा आहे, जिथे कपडे घालून नाही, तर कपडे काढून प्रवेश मिळेल. हो, या क्रूझवर लग समानतेला इतके प्राधान्य देण्यात आले आहे, की तुम्हालाही आश्चर्य वाटेल. इतकेच नाही, तर येथे तुम्ही कपडे घालून आलात, तर मोठे भाडे द्यावे लागेल. कपडे काढून टाकल्यानंतरच प्रवेश दिला जाईल. मग तो पुरुष असो वा महिला; न्यूयॉर्क पोस्टच्या एका वृत्तानुसार, ज्यांना कपड्यांशिवाय पार्टी करायला आवडते, ते या क्रूझवर येऊन स्वप्न पूर्ण करू शकतात.

'बेअर नेसेसिटीज' नावाची एक पर्यटन कंपनी आहे. ती लोकांना कपड्यांशिवाय प्रवास करण्याची आणि वेळ मजेत घालवण्याची व्यवस्था करते. या जहाजाचे नाव 'द बिग न्यूड बोट' असे आहे. ती ९६८ फूट लांब आहे. त्यावर लोक पार्टी, लंच आणि डिनरदेखील करू शकतात. येथे जोडप्यांना विशेष प्राधान्य दिले जाते. या क्रूझचे अनेक फोटो 'सोशल मीडिया'वर व्हायरल होत आहेत. त्यात लोक त्यांचा वेळ चांगला घालवताना दिसत आहेत. तथापि, येथे काही नियम आणि कायदे आहेत. गेमग आणि पोहताना कपडे घालू शकता. याशिवाय, दुपारच्या जेवणाच्या वेळी आणि रात्रीच्या जेवणाच्या वेळी प्रायव्हेट पार्ट झाकावे लागतील. या आनंदासाठी ४३ लाख रुपयांपर्यंत खर्च करावा लागेल.

या क्रूझवर जाण्यासाठी तेरा ते पन्नास हजार डॉलर्स



खर्च करावे लागतील. या बोटीवर कंपनी ११ दिवसांसाठी कॅरिबियन समुद्राच्या टूरवर घेऊन जाईल. तिथे संपूर्ण वेळ कपड्यांशिवाय राहावे लागेल.



## बबलमध्ये बसा, वन्यप्राणी पाहा

प्राण्यांना जंगलात मुक्तपणे विहार करताना बघणं कोणाला आवडणार नाही... जंगल सफारीदरम्यान विविध प्राणी न्याहाळता येतात. हे प्राणी आपल्या घरात अगदी निवांत फिरत असतात. हा अनुभव खूप अनोखा असतो. हे प्राणी बघण्यासाठी जीप कवा बसमधून फिरावं लागतं. पण थायलंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना पारदर्शी बबलमध्ये बसून वन्य प्राणी न्याहाळता येणार आहेत. इथल्या अनंतरा गोल्डन ट्रँगल एलिफंट कॅम्प अँड रिसॉर्टमध्ये पारदर्शी बबल्स तयार करण्यात आले आहेत. या तंबूरुपी बबल्समध्ये बसून आजूबाजूचे हत्ती बघता येतील. हा जगातला पहिलाच प्रयत्न असल्याचा रिसॉर्टचा दावा आहे. या बबल्समध्ये मोठ्या आकाराचा बेड आणि लिव्हिंग रुम आहे. अर्थात हा जगावेगळा अनुभव घेण्यासाठी एका रात्रीचे ३५ हजार रुपये मोजून दोनजण बबलमध्ये राहू शकतील. हे बबल्स वातानुकुलीत आहेत. अशा बबल्समध्ये बसून वन्य प्राणी बघण्याचा अनुभव भन्नाट असेल यात काहीच शंका नाही.

## महात्मा गांधींची स्तुती केल्याने विद्वानाला अटक

पाकिस्तानातील झेलम येथील रहिवासी इस्लामिक विद्वान अभियंता मोहम्मद अली मिर्झा यांना पाकिस्तान पोलिसांनी अटक केली. त्यांच्यावर अनेक धार्मिक नेत्यांचा आणि इस्लामच्या आदेशांचा प्रचार करणाऱ्या लोकांचा अपमान केल्याचा आरोप आहे. अलिकडेच मोहम्मद अली मिर्झा यांनी महात्मा गांधी यांचे वर्णन मोहंमद अली जिनांहून चांगले नेते म्हणून केले होते. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या गांधीस्तुतीवर अनेक धार्मिक गट संतप्त झाले. या गटांनी सरकारकडून त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली.

मोहम्मद अली मिर्झा यांचे युट्युबवर ३१ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले, की त्यांना सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याच्या कलम ३ अंतर्गत ३० दिवसांसाठी ताब्यात ठेवण्यात आले आणि नंतर तुरुंगात पाठवण्यात आले. धार्मिक संघटनांचा आरोप आहे, की अली मिर्झा यांनी प्रेषित मुहम्मद यांच्याबद्दल वादग्रस्त टिप्पणी केली. त्यामुळे



लोकांच्या भावना दुखावल्या. तथापि, त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे, की त्यांचे शब्द विकृत पद्धतीने सादर केले गेले आहेत. मिर्झा यांनी दुसऱ्या समुदायाची भाषा उद्धृत केल्याचा आरोप होता.

मिर्झा हे व्यवसायाने अभियंता आहेत. 'सोशल मीडिया'वर ते एक धार्मिक नेते आणि विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांचे युट्यूब चॅनेल खूप लोकप्रिय आहे. तिथे ते धर्म आणि समाजाबद्दल त्यांचे स्पष्ट मत देतात. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे ते अनेकदा वादात सापडतात. कट्टर धार्मिक वातावरण असलेल्या पाकिस्तानसारख्या देशात बरेच लोक मिर्झा यांच्या विचारसरणीला आव्हान मानतात. या कारणास्तव, ते सतत कट्टरपंथीयांच्या निशाण्यावर असतात. मिर्झा यांचे समर्थक आणि विरोधक आता समाजमाध्यमांच्या कॉमेंट बॉक्समध्ये भांडू लागले आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, जो पैगंबरांचा अपमान करतो त्याला तुरुंगात जावे लागेल. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, या व्यक्तीची विधाने विकृत करून प्रस्तुत केली आहेत आणि एक कट रचला गेला आहे; पण अल्ला मिर्झा यांच्यासोबत आहे, तर अन्य एका वापरकर्त्याने लिहिले, मोहम्मद अली मिर्झाने स्पष्टवक्तेपणामुळे अनेक शत्रू बनवले आहेत.

## या देशांकडे नाही लिखित संविधान

भारतात लोकशाही आहे. या देशाच्या नागरिकांना संविधानाने विविध स्वातंत्र्यं बहाल केली आहे. भारताचं संविधान लिखित स्वरुपात आहे. आपल्या देशाचा गाडा संविधानानुसारच हाकला जातो. पण काही देशांमध्ये लिखित संविधान नाही. मग या देशांचा गाडा कशा प्रकारे हाकला जात असावा? जाणून घेऊ.

ब्रिटिशांनी भारतावर राज्य केलं. पण या ब्रिटनकडे स्वत:चं संविधान नाही. वाचून आश्चर्य वाटलं असेल. पण हे खरं आहे. या देशात काही नियम तयार करण्यात आले होते. या नियमांना आधारभूत मानून इथे शासन चालवलं जातं. या नियमांना संविधानाइतकंच महत्त्व आहे. ब्रिटनमधले कायदे वेळ आणि परिस्थितीनुसार बदलता येतात. इथल्या संसदेकडे हे अधिकार आहेत.

सौदी अरेबियामध्येही चित्रविचित्र प्रथा आहेत. इथल्या नियम, कायद्यांविषयी आपण जाणतोच. या देशालाही संविधान नाही. इथला राज्यकारभार कुराणातल्या वचनांनुसार चालतो.



इस्रायलकडेही स्वत:चं संविधान नाही. स्वातंत्र्यानंतर इस्रायलमध्ये संविधान तयार करण्याच्या घडामोडींना वेग आला होता. पण संसदेत होणाऱ्या गदारोळामुळे हे शक्य झालं नाही. इथे अलिखित संविधानाला मान्यता देण्यात आली आहे.

न्यूझीलंडमध्येही लिखित संविधान नाही. इथे अलिखित संविधान आहे. त्यानुसार इथलं शासन चालतं.

## मद्यपानाला इथे आहे परवानगी

आपल्या देशात बजेटला खूप महत्त्व आहे. बजेट सादर करणारा मंत्री हुशार असावा, त्याला अर्थशास्त्राचं ज्ञान असावं अशी आपली अपेक्षा असते. बजेटमुळे काय स्वस्त होणार, काय महागणार, कोणाला काय मिळालं यावर बरीच चर्चा होत असते. निर्मला सीतारामन या भारताच्या अर्थमंत्री आहेत. विविध देशांमध्ये बजेट सादर होतं. पण ब्रिटनमधलं बजेट खऱ्या अर्थाने अनोखं म्हणता येईल. इथे बजेट सादर करणाऱ्या मंत्र्याला चान्सलर म्हटलं जातं. कोणत्याही देशाची संसद म्हणजे लोकशाहीचं पवित्र मंदिर. अशा मंदिरात मद्यपान करून येणं चुकीचं आहे. पण ब्रिटनमध्ये चान्सलर मद्यपान करून बजेट सादर करू शकतो. त्याला तशी परवानगी असते. ब्रिटनची संसद म्हणजे हाऊस ऑफ कॉमन्सच्या नियमावलीत या बाबीचा समावेश आहे. मद्यपान करून बजेट सादर करण्याचा अधिकार फक्त चान्सलरला असतो. वर्षातला फक्त एकच दिवस चान्सलर मद्यपान करून संसदेत येऊ शकतो. त्यानंतर त्याला अशी परवानगी नसते. हा नियम ब्रिटनमध्ये अनेक दशकांपासून आहे. इथल्या लोकांना हा प्रकार अर्थहीन वाटतो. इतकंच नाही, तर इथे बजेट सादर करण्यासाठी १०० वर्षं एकाच ब्रीफकेसचा वापर करण्यात आला होता. १८६० मध्ये विलियम ग्लॅडस्टोन यांच्यासाठी ही ब्रीफकेस तयार करण्यात आली होती. स्कारलेट असं या ब्रीफकेसचं नाव



होतं. १९६५ पर्यंत याच ब्रीफकेसमध्ये बजेट असायचं. १९६५ मध्ये तत्कालीन चँसेलर जेम्स कॅलेघन यांनी स्वत:साठी नवी ब्रीफकेस तयार करून घेतली आणि स्कारलेटला बाद केलं.

## कबरीतील हाडे आणि कवट्यांची चोरी!

इंग्लंडमधील दफनभूमीतील अनेक कबरी खोदण्यात आल्या आहेत. त्यातील हाडे आणि मानवी कवट्या गायब झाल्याने खळबळ उडाली आहे. यामागे गुन्हेगारांची टोळी असल्याची माहिती समोर येत आहे. ब्रिटनमधील या प्रकारामुळे काहीजण त्यांच्या नातेवाइकांच्या कबरींचे संरक्षण करण्याची मागणी करत आहे.

इंग्लंडमध्ये 'निच शॉप्स' आणि ऑनलाईन रिटेलर्स प्लॅटफॉर्मवर मानवी कवटी आणि हाडांची राजरोस विक्री केली जात आहे. इतकेच नाही, तर या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर किळसवाणा प्रकारही सुरू आहे. आकुंचित झालेल्या मानवी खोपड्या, लहान मुलांच्या कवट्या, मानवी चामड्यांच्या बॅग, वॉलेट, मास्कचीही विक्री येथे होत आहे. सुपरनॅचरल सोसायटीचा भाग असणारे अनेक विचित्र लोक अशा व्यक्तीची मागणी करत आहेत.

इंग्लंडचे प्रसिद्ध न्यायवैद्यक शास्त्रज्ञ डेम सू ब्लॅक यांनी हा ट्रेंड अत्यंत धोकादायक असल्याचे म्हटले आहे. हा ऑनलाईन बाजार 'बॉडी स्नॅचग'ला म्हणजे मृतदेह चोरी करण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याचे ते म्हणाले. या गुन्ह्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. कब्रस्थानात जाऊन अनेक जण कबरी खोदत असल्याने त्यांनी चता व्यक्त केली. चोरट्यांसाठी हे स्वस्तात कमाईचे साधन झाल्याचे ते म्हणाले.

पक्ष्यांच्या घरट्यांची विक्री बेकायदेशीर असेल तर मग



मानवी अवशेषांची विक्री गुन्हा कसा ठरत नाही, असा सवाल त्यांनी केला. एखाद्या मृतदेहाच्या दातांची माळ गळ्यात घालणे समाज कसा स्वीकार करू शकतो, असा सवाल त्यांनी केला. मृत्यूनंतर तरी कुणाच्या शरीराची विटंबना करू नये. त्यांना तसेच शांततेत जगू द्यावे असे ते म्हणाले. तर अशा घटकांची खरेदी-विक्री करणाऱ्यांवर आता थेट कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. अनेकजणांनी कबरींच्या रक्षणासाठी रात्रीची गस्त वाढवावी आणि सुरक्षा रक्षक नेमावेत, सीसीटीव्ही बसवावेत, अशा मागण्या केल्या आहेत.

## चपला घालूनच आत या!

एका मोठ्या ऑफिसच्या बाहेरच्या नेमप्लेटवर 'आयपीएस ऑफिसर' लिहिले असते. आत जाण्यापूर्वी प्रत्येकजण असा विचार करत असतो, की आता त्यांना त्यांचे बूट आणि चप्पल काढावे लागतील; पण नंतर दारावर लटकलेली एक ओळ सर्वांना थांबवते. आयपीएस अधिकाऱ्याने दारावर एक अनोखी चिठ्ठी चिकटवली आहे. पाहुण्यांनी त्यांचे बूट आणि चप्पल काढू नयेत, असा फलक त्यावर आहे!

या आयपीएस अधिकाऱ्याचा हा फलक 'सोशल मीडिया'वर धुमाकूळ घालत आहे. किशन सहाय नावाच्या एका आयपीएस अधिकाऱ्याने त्याच्या ऑफिसच्या बाहेरील भागाचा फोटो क्लिक करून 'सोशल मीडिया'वर पोस्ट केला. येथे, त्याच्या नेमप्लेटच्या अगदी खाली एक कागद चिकटवला आहे त्यावर लिहिले आहे... पाहुण्यांनी बूट/चप्पल काढू नयेत. सोशल मीडियावर हा फोटो शेअर करताना अधिकाऱ्याने लिहिले, 'घराबाहेर येणाऱ्याला बूट काढायला सांगणे अपमानास्पद वाटते, जरी तो अगदी लहानसा अपमान असला तरी. तुमच्या घरी आलेल्या पाहुण्याला




थोडासाही अपमान करणे सामान्य सौजन्याच्या विरुद्ध आहे. हेच मी पाच वर्षांपासून गेटवर लिहिले आहे.

किशन सहाय जयपूरमध्ये पोलिस महासंचालक आहेत. त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर शेअर करण्यात आली आहे. ती आतापर्यंत लाखो लोकांनी पाहिली आहे. अनेकांनी पोस्ट लाईक केली आहे. 'सोशल मीडिया'वरील वापरकर्ते याबद्दल वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका युजरने लिहिले मी तुम्हाला मनापासून सलाम करतो सर. दुसऱ्या युजरने लिहिले, असे अधिकारीच पोलिस खात्याचा आदर वाचवत असतात. दुसऱ्या युजरने लिहिले सगळेच तुमच्यासारखे नसतात सर, मी तुमच्या विचारसरणीला सलाम करतो.

# ऑईल मिलर्सच्या समस्या सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबध्द : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

विकसीत महाराष्ट्रासाठी ऑईल मिलर्स असोसिएशनने दिलेले योगदान मोलाचे आहे. अलीकडच्या काळात भारताने एक वेगळी प्रतिमा निर्माण केली असून भारतीय पासपोर्टसाठी जगात ओढ निर्माण झाली आहे.ऑईल मिल असोसिएशनने विकसीत भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे गरजेचे आहे. आपल्या समस्या व अडचणी राज्य शासन केंद्र शासनाकडे मांडण्यास कटिबध्द असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.




मध्य भारत ऑईल मिलर्स असोसिएशनच्या वतीने कोराडी येथील नैवद्यम नॉर्थ स्टार हॉटेल येथे ऑईल मिलर कॉन्क्लेव्हचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर, विदर्भ कॉटन असोसिएशनचे अध्यक्ष भावेश शाह, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत मोहता, विदर्भ ऑईल असोसिएशनचे अध्यक्ष विपिन अग्रवाल तसेच असोसिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

या उद्योगात सुधारणा आवश्यक असून त्याबाबत केंद्र शासन व राज्य शासन प्रयत्नशिल आहे. कापूस महामंडळ, आईल मिलच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन केंद्राकडे पाठपूरावा करणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. नवीन उद्योजक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादनात वाढ करीत आहेत. ही बाब अभिनंदनीय असल्याचे यांनी सांगितले.

तेल गिरण्या कामगारांच्या अडचणी सोडविण्यासाठी अशा कान्क्लेव्ह महत्वपूर्ण भूमिका पार पाडतात. कामगारांच्या समस्याचे निराकरण होते. मला या क्षेत्रातील जाण असल्यामुळे आपल्या समस्या समजून घेता येतात. शासनस्तरावर पणन मंत्र्यांशी चर्चा करुन कामगाराचे प्रश्न सोडविण्यात येईल, असे आश्वासन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले.

सौर उर्जेबाबत विद्युत विभागाशी चर्चा करुन प्रश्न सोडविण्यात येईल. ऑईल मिलच्या मालकांनी कामगाराचे अडचणी स्थानिक पातळीवर सोडविल्यास उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग महत्वाचा असून महिला कामगारांना रात्रपाळीमध्ये ठेवण्यास शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या परिषदेत मध्य प्रदेश, गुजरात, तेलंगणा आदी राज्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. कुशल कामगार, तेलाची गुणवत्ता, मात्रा, शुध्दीकरण, सौर उर्जा, गिरणी मालकांचे प्रश्नाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विविध उत्पादनाचे स्टॉल लावण्यात आले.

## शिंदेंची शिवसेना भाजपला डावलून छोट्या पक्षांसोबत युती करण्याच्या तयारीत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

राज्यात सध्या महायुतीचे सरकार आहे. त्यात भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सहभागी आहे. राज्यस्तरावर जरी महायुती असली तरी स्थानिक स्तरावर मात्र या तिन्ही पक्षात विस्तवही जात नसल्याची स्थिती आहे. कधी शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी, तर कुठे राष्ट्रवादी विरुद्ध भाजप हा वाद पाहायला मिळत आहे. त्यात आता भर म्हणून की काय शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्येही असाच वाद समोर आला आहे. हा वाद नागपूर जिल्ह्यात झालेला पाहायला मिळाला आहे.

प्रदीर्घ काळानंतर राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची तयारी सुरू झाली असून लवकरच होणाऱ्या या निवडणुकांसाठी ग्रामविकास विभागाने शुक्रवारी जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर केले. यानुसार ठाणे, रत्नागिरी, धुळे, अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर, लातूर, वाशीम आदी १७ जिल्हा परिषदांमध्ये महिलाराज येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना सर्व पक्ष सक्रिय झाले आहेत यातच शिंदे सेनेचे मंत्री असलेले आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये भाजपने निवडणुकीत धोका दिल्यास वेगळी चूल मांडण्याची चर्चा करण्यात आली. त्यामुळे भाजपाने शिवसेनेमध्ये सारे काही अलबेल नाही अशी चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे.

जि. प. अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर होताच शिंदेसेना कामाला लागली आहे. निवडणुकींच्या तयारीसाठी शनिवारी रविभवन येथे शिंदेसेनेची बैठक झाली. तीत राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, उपनेते आ. कृपाल तुमाने, पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव, जिल्हाप्रमुख संदीप इटकेलवार व विनोद सातंगे, शहरप्रमुख सुरज गोजे यांच्यासह युवासेना व महिला आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

बैठकीत निवडणुकीतील पुढील धोरण, संघटनात्मक बांधणी आणि पक्षवाढीसंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा झाली. जिल्हा परिषद निवडणुकीत सक्षम उमेदवारांना संधी दिली जाईल. इच्छुक उमेदवारांनी आतापासून संघटनेसोबत मिळून नियोजन करण्याची सूचना आ. तुमाने यांनी केली.

## शाळेच्या वाहतूक प्रभारीसह महामार्ग कंत्राटदारावर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

कोराडी मार्गावरील मानकापूर उड्डाणपुलावर शुक्रवारी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांमध्ये झालेल्या अपघातात गाडीचा चालक आणि एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला. त्यामुळे भानावर आलेल्या यंत्रणेने अखेर अक्षम्य निष्काळजीपणा दाखल्या प्रकरणात प्राणांतिक अपघाताला जबाबदार ठरल्यावरून पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले. पोलिसांनी गुन्हा दाखल केलेल्यांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणारा बसचालक, विजय मोरे, टाटा मॅजिक वाहनाचा चालक राजेश यादव, भवन्स शाळेच्या वाहतूकीचे कामकाज पाहणारे प्रभारी, ऑरिएंटल नागपूर बैतूल महामार्ग लिमी.

कंपनी खंभाराचेचे कंत्राटदार राजनेशकुमार सिंग, स्थानिक साईट प्रभारी श्रीराव, वं पननीचे इतर संबंधित अशा सहा जणांवर सुरक्षेशी निगडीत दिशा दर्शक फलकांच्या सुरक्षा मानकांचे उल्लिंघन केल्या प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले.



मानकापूर उड्डाणपुलावर टाटा मॅजिक स्कूल व्हॅन आणि आणि आणखी एक शाळेतल्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या गाड्यांत भिषण अपघात झाला. यात शाळेच्या वाहनातील विद्यार्थी सान्वी देवेंद्र खोब्रागडे, श्रीजा कुणाल सुर्यवंशी, हृदया कुणाल सुर्यवंशी, स्वयं दिपक ठाकरे, यश विनोद मेश्राम, काव्या संजय केदार, प्रियांशिका राकेश शेंडे, आदिराज देवेंद्र खोब्रागडे, जी. पूर्वी या विद्यार्थ्यांसह स्कूल व्हॅन चालक रितीक घनश्याम कनोजिया हे जखमी झाले. त्यापैकी विद्याथीर्नी सान्वी खोब्रागडे आणि चालक रितीक कनोजिया या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मानकापूर उड्डाणपुलावर शुक्रवारी स्कूलबस व स्कूलव्हॅन समोरासमोर धडकल्याने दोघांचा मृत्यू झाला. यातील स्कूलव्हॅनचा परवाना व योग्यता तपासणी झाली नसल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनात आला आहे. त्यामुळे भविष्यात या स्कूलव्हॅनची नोंदणी रद्द होण्याचे संकेत आहेत. आरटीओच्या पथकाने अपघातग्रस्त जागेची पाहणी केली. पथकाला उड्डाणपुलावरील एकाच बाजूची वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनात आले.

## डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :

उद्घाटन समारंभ सुलभ करण्यासाठी आणि स्टेज पँडल सुरक्षितपणे काढून टाकण्यासाठी, उड्डाणपुलाचा एक कॅरेजवे (बोले पेट्रोल पंप स्क्वेअर ते युनिव्हर्सिटी कॅम्पस स्क्वेअर) एक दिवसासाठी बंद ठेवण्यात आला होता. स्टेज स्ट्रक्चरची साफसफाई झाल्यानंतर हा मार्ग आता १४ सप्टेंबर रोजी सकाळी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. दुसरा कॅरेजवे (युनिव्हर्सिटी कॅम्पस स्क्वेअर ते बोले पेट्रोल पंप स्क्वेअर) उद्घाटनाच्या दिवशीच वाहनांच्या वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्यानुसार, डॉ.श्रीकांत जिचकर उड्डाणपुलाचे दोन्ही कॅरेजवे आता वाहतुकीसाठी पूर्णपणे खुले आहेत, ज्यामुळे कॉरिडॉरमध्ये वाहनांची सुरळीत आणि सुरक्षित हालचाल सुनिश्चित होते.

## आमची लढाई पत्रकारांच्या हक्कासाठी : संदीप काळे

■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव, दि. १४ :

पत्रकार हा समाजाचा कणा आहे. मात्र आज मीडिया क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. डिजिटल, सोशल मीडिया, आंतरराष्ट्रीय पत्रकारिता या सगळ्या क्षेत्रांत नवे ट्रेंड्स, नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अशा काळात संघटनाशिवाय पत्रकारांचे प्रश्न सोडवणे अशक्य आहे. आमची लढाई पत्रकारांच्या हक्कासाठी आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या संस्थांनी एकत्र येऊन पत्रकारांना जगभर जोडण्याचा आणि त्यांचे हक्क सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला असल्याचे त्यांनी नमूद केले. व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमचा दोन दिवसीय राज्यस्तरीय केडर कॅम्प अमळनेरच्या मंगलग्रह मंदिर परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला. पत्रकारांना सशक्त करण्यासाठी, त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि बदलत्या मीडिया परिदृश्यात सज्ज



करण्यासाठी हा कॅम्प महत्त्वाचा ठरला. राज्यभरातून सुमारे २५० प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवून व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनात्मक चळवळीला नवी ऊर्जा दिली. कॅम्पचा समारोप संस्थेचे संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते झाला.

कॅम्पच्या दोन दिवसांत पत्रकारितेतील बदलते पैलू, आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हाने, संघटनाच्या गरजा आणि व्हॉईस ऑफ मीडिया तसेच व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरमने केलेले प्रयोग यावर सखोल विचारमंथन झाले. प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी तळागाळातील पत्रकारांना प्रशिक्षण देण्याची गरज अधोरेखित केली. महिला पत्रकारांचे प्रश्न, स्थानिक पत्रकारांची आव्हाने, डिजिटल युगातील कौशल्ये, आंतरराष्ट्रीय नेटवर्किंग, पत्रकारांसाठी आरोग्य विमा व कायदेशीर मदत या मुद्द्यांवर ठोस चर्चा झाली.

## एमओएस युटिलिटी आणि नॅस्डॅकची धोरणात्मक भागीदारीची घोषणा

भारतातील एक फिनटेक इनोव्हेटर एमओएस युटिलिटी लिमिटेड (एनएसईः एमओएस) आणि एक आघाडीचा इंडोनेशियन फिनटेक प्लॅटफॉर्म नॅस्डॅक (प्रतीकः एफएएएस) वर सूचीबद्ध डिजीएशिया कॉर्पने विस्तारित धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे जी पेमेंट्सच्या पलीकडे ब्रँचलेस बँकिंग, एआय-चालित पायाभूत सुविधा आणि 30 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या संधींना लक्ष्य करून आर्थिक समावेशन उपायांमध्ये विस्तारित केली आहे.

एमओएसचे तंत्रज्ञान इंडोनेशियामध्ये डिजीएशियाच्या ब्रँचलेस बँकिंगचे प्रमाण वाढवण्यासाठी एकत्रित केले जाईल, दहा लाखांहून अधिक व्यापाऱ्यांना वित्तीय सेवा एजंट म्हणून समाविष्ट केले जाईल आणि वंचित समुदायांपर्यंत पोहोच वाढवली जाईल. डिजीएशिया आणि एमओएस प्रगत एआय क्षमतांचा सह-विकसित करतील, ज्यामध्ये एआय एजंट परफॉर्मन्स स्कोअरिंग उच्च-संभाव्य एजंट्स ओळखण्यासाठी भविष्यसूचक मॉडेल्स, कॅश मॅनेजमेंट एआय एजंट स्तरावर रोख टंचाई कमी करण्यासाठी तरलता अंदाज आणि एआय संभाषण सहाय्यक बहुभाषिक व्हॉइस आणि चॅट इंटरफेस समाविष्ट आहे जे एजंटना पेमेंट,बचत आणि सूक्ष्म-कर्ज अनुप्रयोगांद्वारे ग्राहकांना मार्गदर्शन करण्यास मदत करते.

डिजीएशिया कॉर्पचे सह-सीईओ प्रशांत गोकर्ण म्हणाले, एमओएससोबतची आमची भागीदारी पेमेंटपेक्षा जास्त आहे - ती एआय-संचालित शाखारहित बँकिंग परिसंस्था तयार करण्याबद्दल आहे जी दहा लाखांहून अधिक इंडोनेशियन व्यापाऱ्यांना सक्षम करते आणि संपूर्ण आशियामध्ये डिजिटल व्यापार आणि समावेशक वित्तपुरवठ्याचा पाया घालते.

MOS™ DIGITAL BANO, TARRAKI KARO

लोकार्थ

■ ■ ■

## युरो प्रतीक सेल्स लिमिटेडचा आयपीओ १६ सप्टेंबर रोजी उघडणार




युरो प्रतीक सेल्स लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १ रु. दर्शनीमूल्याच्या इक्विटी शेअरसाठी २३५ रु. ते २४७ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीची प्रारंभिक सार्वजनिक ऑफर (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, १६ सप्टेंबर २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ६० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ६० इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ पूर्णपणे प्रमोटर आणि प्रमोटर ग्रुप सेलिंग शेअरहोल्डर्सद्वारे ४५१.३२ कोटी रुपयापर्यंतच्या विक्रीसाठीचा प्रस्ताव आहे. त्यात कर्मचारी आरक्षण भागात अर्ज करणा?या पात्र कर्मचा?यांसाठी आरक्षण समाविष्ट आहे.युरो प्रतीक सेल्स लिमिटेड ही कंपनी १९ जानेवारी २०१० रोजी स्थापन झाली. मुंबई येथे मुख्यालय असलेली ही कंपनी ॲसेट-लाईट बिझनेस मॉडेलवर काम करते, ज्यामध्ये उत्पादन डिझाइन आणि विकासावर भर दिला जातो. ३१ मार्च २०२५ रोजी ३० हून अधिक उत्पादन प्रकारांमध्ये (स्रोतः टेक्नोपॅक रिपोर्ट) आणि ११३ कॅटलॉग पसरलेल्या ३,००० हून अधिक डिझाइन्सच्या पोर्टफोलिओसह गेल्या चार वर्षांत लाँच केलेले, युरो प्रतीक उद्योगात एक जलद-फॅशन ब्रँड म्हणून काम करते.

## हुरून इंडियाच्या पाचव्या आवृत्तीची घोषणा




एएसके प्रायव्हेट वेल्थ आणि हुरून इंडियाने नुकतीच एएसके प्रायव्हेट च्या पाचव्या आवृत्तीची घोषणा केली आहे. या आवृत्तीनुसार भारतातील युनिकोर्न, गॅझेल आणि चित्त्यांच्या शोधात महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे अधोरेखित करण्यात आलेले आहेत. भारतातील ७३ युनिकोर्न,४६ गॅझेल आणि १०४ चित्ते (गेल्या वर्षी १०६) आहेत.

मालिका उद्योजक दिव्यांक तुराखिया यांनी स्थापन केलेले ए आय टेक २०२५ मध्ये भारतातील सर्वात वेगवान युनिकोर्न बनले आहे. तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीत युएसडी १. ५ अब्जचे मूल्यांकन नोंदवले गेले आहे. युनिकोर्न आणि फ्युचर युनिकोर्न रिपोर्ट २०२५ मध्ये ५४ नवीन प्रवेशकर्ते, ज्यात १२ गझेल,आणि ४२ चित्ते आहेत.

या रिपोर्ट मध्ये ११ नवीन युनिकॉर्नचे स्वागत करण्यात आले आहे. ज्यात ए आय टेक,नवीन टेक्नॉलॉजीस,निवृत्ती कॅपिटल,व्हेरिटास फायनान्स,रॅपीडो,यांचा समावेश आहे. ऑनलाईन गेमिंग विधेयक २०२५ च्या प्रमोशन आणि रेगुलेशनच्या परिणामानंतर ड्रीम ११ ,एमपीएल, गेम्स क्राफ्ट गेम्स २४ एक्स ७ झुपी आणि विंझो सारख्या मणी गेमिंग स्टार्टर्स अप आता यादीतून बाहेर पडलेल्या आहेत. या रिपोर्टमध्ये गॅझेल आणि चिंता संस्थापकांचे निर्मिती करणाऱ्या टॉप ६ आयआयटी कंपन्यांचा समावेश आहे.

■ ■ ■




## ओप्पो एनको बड्स 3 Pro ची विक्री फक्त १,७९९ रुपयांमध्ये सुरू

ओप्पो इंडियाचा नुकताच लॉंच झालेला ओप्पो एनको बड्स 3 Pro फिलपकार्ट आणि ओप्पो इंडिया ई-स्टोअरवर उपलब्ध आहे. १,७९९ रुपयांच्या किमतीत, हे इअरबड्स लांब बॅटरी, इमर्सिव्ह ऑडिओ आणि उत्तम कामगिरी देतात, जे मल्टीटास्किंग आणि गेमिंगसाठी परिपूर्ण आहेत.

ओप्पो एनको बड्स 3 Pro हे कॉम्पॅक्ट, वैशिष्ट्यपूर्ण व्हर आहेत जे दीर्घकाळ टिकणारे कार्यप्रदर्शन आणि उत्कृष्ट आवाज देण्यासाठी बनवले आहेत. ओप्पो एनको बड्स 3 Pro ची हायपर टिकाऊ बॅटरी आणि TUV Rheinland बॅटरी हेल्थ सर्टिफिकेशनसह 54 तासांपर्यंत प्लेबॅक देते (एका चार्जवर १२ तासांपर्यंत, फक्त बड्स) जे दीर्घकाळ टिकणारी बॅटरी-क्षमतेची हमी देते. ते फक्त १० मिनिटांच्या चार्जिंगसह ४ तासांपर्यंत प्लेबॅक देतात, ज्यामुळे ते प्रवासात संगीत ऐकण्यासाठी परिपूर्ण बनतात.

टायटॅनियम प्लेटिंग आणि उत्कृष्ट बास ट्यूनिंगसह १२.४ मिमी एक्स्ट्रा-लार्ज डायनॅमिक ड्रायव्हर खोल, संतुलित आणि मनोरंजक ऑडिओ प्रदान करतो. इनको मास्टर कस्टमायझ करण्यायोग्य इक्वेलायझर (३ प्रीसेट + ६ बँड एद) वापरकर्त्यांना त्यांच्या आवडीनुसार आवाज फाइन-ट्यून करण्याची परवानगी देतो.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## हैदराबाद गॅझेट जीआर विरोधात ओबीसी आक्रमक १० ऑक्टोबरला नागपूरमध्ये महामोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. या शासन निर्णयामध्ये आधी पात्र शब्द होता तो वगळून पुन्हा नवीन शासन निर्णय काढण्यात आला तो ओबीसींच्या हक्कावर गदा आणणारा आहे. या विरोधात विदर्भातील सर्व ओबीसी संघटना रस्त्यावर उतरणार आहे. १० ऑक्टोबर रोजी विदर्भातील सर्व ओबीसी संघटनांचा नागपुरात महामोर्चा निघणार, अशी घोषणा काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

विदभार्तील ओबीसी संघटनांची दुसरी बैठक आज नागपुरात पार पडली. सरकारच्या शासन निर्णयानंतर मराठवाड्यातील भरत कराड या तरुणाने आत्महत्या केली. सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाज मध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली आहे.




याविरोधात रस्त्यावरील लढाई लढण्याची तयारी ओबीसी संघटनांनी आजच्या बैठकीत दर्शवली. त्यानंतर नागपुरात १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महामोर्च्याची घोषणा करण्यात आली आहे. जे कोणी या शासन निर्णयाविरोधात आहे त्या संघटना आणि नेत्यांना या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन आम्ही करतो असे काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

यावेळी माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ असो की, ओबीसी कार्यकर्ता असो ज्यांचा या शासन निर्णयाला विरोध आहे जे कोणी पक्षाची पादत्राणे बाहेर ठेवून या लढ्यात सहभागी होतील, त्या सगळ्यांचे या मोर्चात स्वागत असेल. या महामोर्चात कोणत्याही पक्ष किंवा संघटनेचा बॅनर नसणार, तर ओबीसी कार्यकर्ताच या मोर्चाचे निमंत्रक आणि आयोजक असणार आहे.

नागपुरात १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महामोर्चाची सुरुवात यशवंत स्टेडियम इथून होणार असून, मोर्चाचा समारोप संविधान चौकात होईल. सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाचे नुकसान होणार नाही हे असत्य सरकार सांगत आहे. त्यामुळे याविरोधात लढण्याची वेळ ओबीसी संघटनांवर आली आहे. या मोर्चाच्या माध्यमातून राज्य सरकारला ओबीसी संघटना इशारा देत आहे सरकारने काढलेल्या शासन निर्णयाविरोधात वकील संघटना देखील एकटवल्या असून नागपूर खंडपीठात सोमवारी याचिका दाखल होणार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. सरकारच्या निर्णयामुळे मराठवाड्यात एक तरुणाने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना झाली.

## अल्पवयीन मुलीवर लॉजमध्ये अतिप्रसंग

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १४ :

एका ३३ वर्षीय नराधमाने १४ वर्षीय मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. अल्पवयीन मुलीचा विश्वास संपादन करून त्यांनी तिला लॉजवर नेले आणि तिच्यावर अतिप्रसंग केल्याचा धक्कादायक प्रकार भंडाऱ्यातून समोर आला आहे.

प्रेमाच्या जाळ्यात ओढून एका तरूणाने अल्पवयीन मुलीला फसवलं. तसेच शारीरिक संबंध ठेवले. इतकेच नाही तर, लॉजवर नेत बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणानंतर पीडितेनं पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. प्रकाश सुखदेवे (वय वर्ष ३३) असे आरोपीचे नाव आहे. आरोपी आणि पीडित दोघेही मोहाडी तालुक्यातील रहिवासी आहेत. आरोपीनं आधी पीडित मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं. नंतर विविध ठिकाणी नेत तिच्यावर शारीरिक संबंध ठेवला. नंतर आरोपीनं मुलीला भंडारा शहराजवळील जमनी दाभा येथील साई लॉजवर नेलं. तिकडे आरोपीनं पीडितेच्या मनाविरूद्ध शारीरिक संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला.

## सिएमआर मिलिंगमध्ये २०२३ पासून सातत्याने अनियमितता करणाऱ्या विशाल राईसमिलर्सवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करा

### देसाईगंज सिटिझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १४ :

तालुक्यातील कुरुड येथील विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम मुरजमल डेंगानी हे सिएमआर मिलिंग मध्ये २०२३ पासून सातत्याने अनियमितता करीत असून नुकतेच गडचिरोली येथील शासकीय गोडाऊन मध्ये त्यांच्याच राईसमिलचा खराब तांदूळ आल्याने येथील गोदाम व्यवस्थापकाने खराब तांदूळ बदलून मागितल्याची गंभीर बाब चव्हाटावर आली आहे.

यावरून विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी हे शासनाला वारंवार निकृष्ठ दर्जाचा तांदूळ पुरवठा करून फसवणूक करीत असल्याची गंभीर बाब लक्षात घेता सदर राईसमिलर्सला कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकून तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी देसाईगंज सिटिझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की विशाल राईसमिल कुरुडचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांनी २०२३ मध्ये करारनामा अट क्र. ७(ब)नुसार ७ दिवसाचे आत धानाची उचल करून १० दिवसाचे आत तांदुळ जिल्हा पुरवठा अधिकारी कडे जमा करणे बंधनकारक असतांना मे.विशाल राईसमिल यांनी शेवटचा डिओ दि.४ मे २०२३ ला दिलेला आहे.तसेच दि.१ जुलै २०२३ रोजी पर्यंत तांदूळ जमा करून तांदुळ जमा करण्यास सुमारे २ महिणे विलंब झाल्याचे महाराष्ट्र सहकारी आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांनी गठित केलेल्या चौकशी समितीच्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे.

तसेच डेंगानी यांनी २९१८.८८ क्विंटल तांदूळ कमी जमा केलेला असुन उशिरा जमा केलेल्या व जमा न केलेल्या तांदळाबाबत काय कारवाई केली याची माहिती दिलेली नाही.अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय दि.२१ नोव्हेंबर २०२२ मधिल अट क्र.५.१५ नुसार प्रती क्विंटल धाना करीता किमान ०.८ युनिट वीज खर्च होते.त्यानुसार मे.विशाल राईसमिल यांनी ६०४९५.५३ क्विंटल धान भरडाई करीता ४८३९६ युनिट वीज खर्च करणे आवश्यक होते.परंतु प्रत्यक्षात ९३७६ युनिट वीज खर्च केलेला असुन तब्बल ३९०२० युनिट कमी वीज खर्च केल्याचे स्पष्ट अहवालात नमूद करण्यात आले आहे.त्यानुसार माहे नोव्हेंबर, डिसेंबर-२०२२,जानेवारी, मार्च, एप्रिल व मे २०२३ मध्ये भरडाई साठी लागणाऱ्या विद्युत युनिट पेक्षा कमी वीज खर्च केल्याचे स्पष्ट नमुद केले आहे.

दरम्यान गडचिरोली येथील शासकीय गोडाऊन मध्ये दि.३१ जुलै २०२५ रोजी आकाश गोडाऊन नैनपुर (देसाईगंज)येथुन पाठविण्यात आलेला विशाल राईसमिल कुरुड यांचा तब्बल ४५० कट्टे खराब तांदूळ टीपी नंबर ३४३२४७ वाहन क्र.एमएच-३४ एम-६१३३ ने आणलेला दि .२ ऑगस्ट २०२५ रोजी पकडण्यात आला असता येथील गोदाम व्यवस्थापक यांनी आकाश अग्रवाल गोडाऊन वडसा व विशाल राईसमिल कुरुड यांना पत्र दिले आहे.

यावरून विशाल राईसमिलचे संचालक पुरुषोत्तम डेंगानी हे शासनाला वारंवार निकृष्ठ तांदळाचा पुरवठा करून शासनाची फसवणूक करून या माध्यमातून कोट्यावधिचा आर्थिक नुकसान करीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे विशाल राईसमिलला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकून संचालक पुरुषोत्तम डेंगानी यांचेवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न, नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.याबाबत काय कारवाई केली जाते,याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.